# । सहस्त्र विचार समर्थाचे ।

## श्री रामदास स्वामीचे



श्री रामचंद्र सोनार

# lgL«k fopkj leFkkps

Jh jkenkl Lokeh



Ykgkui.kkikl u eyk HkfDrph vkoM fuekk.k dj.kkÚ;k ekÖ;k ieG vkbl oMhykl Eg.kts ft th o nknkuk J)kiold vi.k

nklHkDr--- jkepæ ek] lkukj]

17]fo|kfogkj dkyuh] vk;]Vh]vk;] lekj]

dGck jkM] dkYgkiij]] 416007

# lgL«k fopkj **समर्थ रामदासाचे**

“श्री समर्थ कृपासिंधु उचंबळला आणि कल्पाकोटी उपेगा आला” असे दासबोध नुसते श्रवण केले तरी तात्काळ ज्ञान स्फूर्ती होते, आणि विशेष म्हणजे या ग्रंथात श्री समर्थाचा निवास आहे. ग्रंथाचा ध्यास घेतला तर त्यातुन समर्थाचे दर्शन होते. प्राणी मात्राचे सर्व आशा आकांक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्य या दासबोधात आहे. अध्यात्माचा तर तो मेरुमणी आहे. आध्यात्म प्रत्यक्ष आपल्या जीवनात कोणत्या साधनाने आणता येईल, याची आचारसंहिता आपणास दासबोधात सापडते. चित्तवृत्ती स्थिर दाखविणारा हा एक ग्रंथ आहे. तसेच जीवनातील नैराश्य घालवून चैतन्य उत्पन्न करणारा ग्रंथ आहे.

श्री समर्थ मोठे साक्षात्कारी व ब्रह्मज्ञानी पुरुष होते. सच्चिदानंद स्वरुप परमात्याचा अनुभव घेतलेले महामानव होते. त्याच्या जीवनामध्ये अध्यात्मिक अनुभवाची श्रीमंती ओसंडून वाहत होती. त्यांनी ती आपल्या ग्रंथाव्दारे मराठी जनतेस मुक्त हस्ताने वाटली.

“भक्ताचेनि स्वार्थ याने । कृपा केली दासरथीने ।

समर्थ कृपेची वचने । तो हा दासबोध ।।“

याच दासबोधांतून एक हजार वचने (विचार) घेऊन हे एक लहानसे पुस्तक तयार केलेले आहे. ही सर्व समर्थाचीच कृपा आहे. जे काही आहे ते सर्व त्यांचेच आहे. मी ते सर्व संकलन केलेले आहे. ते कृपया आपण गोड मानून घ्यावे ही विनंती.

संकलक

रामचंद्र सोनार कोल्हापूर

मोबा. 9422047369

## लेखक परिचय(दोन शब्द)

महाराष्ट्रामध्ये ज्ञानदेवापासून निलोबरायापर्यंत अनेक संत होऊन गेले त्यांना आपण संताची मांदियाळी असे संबोधतो. ही मांदियाळी आज अखेर चालुच आहे. सर्वांच्यामध्ये एकच धागा प्रकर्षाने अनुभवायला मिळतो तो भक्तिचा. भगवंत आणि भक्ति या दोन गोष्टी नाहीत त्या एकच आहेत. याच संत परंपरेत स्वामी रामदास होऊन गेले. शुकासारखे वैराग्य ज्याचे, त्यानी 'दासबोध' ग्रंथ निर्माण केला. आपल्या तपस्वी बाण्याने सारा महाराष्ट्र उजळून काढला. हजारो जणास देशभक्तिच्या प्रेरणा मिळाल्या. महाराष्ट्रास छत्रपती शिवाजी महाराज मिळाले. दासबोध खूपच मोठा ग्रंथ आहे. त्यात अनेक विचार उपदेशपर आहेत याच विचारांतून लेखकानी एक हजार विचार निवडले आहेत त्या विचारांचे मनन, निधियास करावे ही त्यांची प्रामाणिक इच्छा आहे.

माझे स्नेही श्री. रामचंद्र सोनार हे एक आदर्श व्यक्तिमत्व आहे. त्यानी दासबोधाची अनेक पारायण शिवथर (महाड जिल्हा) येथे जावून कलेली आहेत. ज्ञानेश्वरीचे पारायणे विश्वपंढरी, कोल्हापूर येथे आम्हांसोबत केलेली आहेत. हे 'विश्वपंढरी' अध्यात्मक मासिकाचे नियमित लेखक आहेत. मासिकातून दासबोध, ज्ञानेश्वरी, पंतजली योगसुत्रे यावर अध्यात्मक लेख प्रसिध्द झालेले आहेत. ते ज्ञानेश्वरी मंडळाचे सदस्य आहेत. ते आळंदी पावस, शिवथर येथे पारायणास जात असतात त्यानी चारोधाम यात्रा केलेल्या आहेत.

लेखक उत्तम उद्योजक होते. कोल्हापूर येथे स्वत:चा चांगला कारखाना आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचे मशिन आहे. मुलगा इंजिनिअर झाल्यानंतर कारखाना त्याचेकडे सोपवून ते अध्यात्मिक मार्गासलागले आहेत. ते वाचन, लेखन, तीर्थयात्रा, पारायणेयात वेळ घालवितात. तसेच त्यांनी एका पानावर (रोल) संपूर्ण ज्ञानेश्वरी हस्ताक्षराने लिहीली. ते रोल एका बॉकक्समध्ये बसविले व ज्ञानेश्वरी वरुन वाचता येईल अशी योजना केली. रोल फिरवून ज्ञानेश्वरी वाचता येते. तसाच दुसरा बॉक्स सज्जनगड येथील देवस्थानास दिला. त्यांनी तो त्याच्या मुख्य ग्रंथालयात सर्वांसाठी वाचण्यास ठेवला आहे. आपण तो पाहू शकता.

लेखक एक उत्तम योगाशिक्षक आहेत. योगाचे शिक्षण श्री. रामदेव बाबा हरिव्दार यांचेकडे घेतलेले आहे. गेले 14 वर्षे ते योगाचे वर्ग मोफत चालवितात. तसेच जागतिक योगदिनानिमित्त त्यांनी सार्वजनिक ठिकाणी (शाळा, कॉलेज पेट्रोलपंप) योग वर्ग, शिबीर घेतलेले आहे. योगावर पुस्तक लिहून ते विद्यार्थ्यांना कमी किंमतीत दिलेली आहेत.

योग आणि अध्यात्म या दोन्ही गोष्टी त्याच्या जीवनाचे आधार आहेत. त्यांच्याकडून अशीच 'समर्थ सेवा' घडत राहो ही इच्छा व्यक्त करुन दोन शब्द पुरे करतो.

**श्री. विलासराव सावंत**
**कार्यकारी संपादक**
**"विश्वपंढरी" मासिक कोल्हापूर.**



**लेखक** **: संपर्क पत्ता**

**नांव** :रामचंद्र मारुती सोनार

**पत्ता** : विद्याविहार कॉलनी, प्लॉट 17

आय.टी.आय. समोर कळंबा रोड.

श्री. हॉस्पिटल जवळ कोल्हापूर 416007

**मोबा.नं.** : 9422047369

**जन्म** : 02-06-1938

**व्यवसाय** : प्रवीण टूल्स कारखाना

वाय.पी.पोवार नगर

कोल्हापूर. सध्या निवृत्त

**साहित्य** : 1. श्री. रामचरित मानस (मराठी)

ओवीमध्ये- तुलसीदास ग्रंथावरून पुस्तक

2 ज्ञानेश्वर माऊलीचे सहस्त्र विचार

3. तुकारामांचे सहस्त्र विचार

4. समर्थ रामदासाचे सहस्त्र विचार

5. विश्वपंढरी मासिकाचे (कोल्हापूर) लेखक.

# अनुक्रमणिका


| अ. नं. | दशक | दशकाचे नांव | विचार क्र. | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| 1 | पहिला | स्तवनाचा | 1 ते 50 | 08 |
| 2 | दुसरा | मुर्खलक्षणांचा | 51 ते 103 | 15 |
| 3 | तिसरा | स्वगुण परीक्षा | 104 ते 150 | 22 |
| 4 | चवथा | नवविधा भक्ति | 151 ते 198 | 27 |
| 5 | पाचवा | मंत्राचा | 199 ते 266 | 34 |
| 6 | सहावा | देवशोधन | 267 ते 313 | 44 |
| 7 | सातवा | चौदा ब्रह्मांचा | 314 ते 379 | 51 |
| 8 | आठवा | मायोध्दवनाम | 380 ते 438 | 59 |
| 9 | नववा | गुणरुप | 439 ते 487 | 67 |
| 10 | दहावा | जगज्जोतिनाम | 488 ते 536 | 75 |
| 11 | अकरावा | भीमदशक | 537 ते 582 | 84 |
| 12 | बारावा | विवेक वैराग्य | 583 ते 632 | 92 |
| 13 | तेरावा | नामरुप | 633 ते 678 | 102 |
| 14 | चौदावा | अखंड ध्यान नाम | 679 ते 734 | 110 |
| 15 | पंधरावा | आत्मदर्शक | 735 ते 783 | 119 |
| 16 | सोळावा | सप्ततिन्वयाचा | 784 ते 813 | 130 |
| 17 | सतरावा | प्रकृति पुरष | 814 ते 860 | 136 |
| 18 | अठरावा | बहुजिनसी | 861 ते 898 | 145 |
| 19 | एकोणिसावा | शिकवण | 899 ते 953 | 153 |
| 20 | विसावा | पूर्णदशक | 954 ते 1000 | 164 |

## दशक पहिला : स्तवनाचा विचार1 ते 5

## समास पहिला - ग्रंथारंभ लक्षण मंगलचरण 1/1

1. श्री समर्थ सांगतात या ग्रंथाचे नांव दासबोध आहे. त्यामध्ये गुरुशिष्याचा संवाद आहे व त्यामध्ये भक्तिमार्गाचे स्पष्ट विवेचन आहे. - 2

2.दासबोधामध्ये अनेक विकल्पाचे व भ्रमाचे चुकीचे म्हणजेसमजुनी निवारण केले आहे. संशय छेदून टाकले आहेत, अपेक्षाना व प्रश्नाना समाधानकारक उत्तरे दिलेली आहे. नास्तिक माणसे सुध्दा या भक्तिमार्गाने मोक्षापर्यंत पोचतात. - 34

3.दुष्ट अभिमानाने मत्सर निर्माण होतो मत्सराने तिरस्कार प्रकट होतो, त्यांतून क्रोध निर्माण होतो ते लोक अहंकाराने विकृत होतात त्यासाठी अहंकार बाजूस सारणे हे उत्तम होय. - 23

4. अभ्यासी माणसाचे अनेक दोष नष्ट होतात. अपवित्र माणसे पवित्र होतात, उत्तम गति लाभते, देहभावाने अनेक कठीण प्रसंग दासबोधाच्या अभ्यासाने टळतात. संशय, भ्रम, संसारातील दु:खे, निराशा नष्ट होतात. - 36

5.दासबोधाच्या अभ्यासाने जीवाची अवनीती थांबते. मनाला खरी विश्रांती व समाधान मिळते. - 37

## दशक पहिला विचार 6 ते 8

## समास दुसरा - गणेश स्तवन 1/2

6.सर्व सिध्दीची फळे देणारा, अज्ञान दूर करणारा, भ्रम नाहीसा करणारा, मूर्तिमंत ज्ञान असणारा जो गणपति त्याला मी नमस्कार करतो. - 1

7.गणपतीस नमन करुन कोणतेही काम सुरु केल्यास त्यांत अडथळे, संकटे, कटकटी निर्माण होत नाहीत. त्याच्या स्वरुपाचे चिंतन केल्यास मनास समाधान वाटते. - 7

8.गणपतीस चार हात आहेत. एका हातात परशु, दुसऱ्यात कमळ, तिसऱ्यांत अंकुश आणि चौथ्यांत मोदक आहेत. कमरेला पितांबर व पोटावर वेढा घातलेला नाग आहे. - 17

## दशक पहिला विचार 9 ते 13

## समास तिसरा - शारदा स्तवन 1 / 3

9.वेदांची आई, ब्रह्मदेवाची कन्या, नादाचे जन्मस्थान वाणीची स्वामीनी आणि महामाया अशी शारदा तिला मी नमस्कार करतो. आदिपुरुष ईश्वराची भार्या आहे. - 4

10.शारदा म्हणजे मोक्षाचे वैभव व मंगळांत मंगळ अशी अमृतरुपीसतरावी जीवनकलाच आहे. लावण्यखाण. शारदा जीवाला शांति देणारी सत्वगुणची लीला आहे, अव्यक्त ईश्वराला व्यक्त बनविते, संकल्पनाचा विस्तार करणारी ईच्छाशक्ती तीच आहे. ती स्वयंभू एकच माया आहे.- 17

11. शारदा ब्रह्मादिकाचीआई आहे. विष्णु, शिव तिच्या पोटी जन्मतात. विश्व रचना तिचाच विस्तारआहे.- 15-

12.शारदा परमार्थाचे मुळ आहे, केवळ आत्मविद्याच आहे. शारदा म्हणजे ईश्वराची निवांत, निर्मळ आणि निश्चल अवस्था होय, ध्यानास मदत करणारी, आत्मचिंतन शिकवणारी आहे. - 17

13.परत्मा स्वरुपाला “मी आहे” अशी ज्ञानमय शुध्द जाणीव होय हे शारदेचे स्वरुप समजावे. ती ज्ञानमय आहे. - 21

## दशक पहिला विचार - 14 ते 17

## समास चवथा - सद्‌गुरुस्तवन 1 / 4

14.सद्‌गुरुच्या स्वरुपाला माया स्पर्श करु शकत नाही. आपले सगळे ज्ञान मायेच्या कक्षेतीलअसते. त्यामुळे सद्‌गुरु आपल्यासारखे अज्ञानींना कळणे शक्य नाही. त्याचे वर्णन करता येणार नाही.-1

15.विश्वाला भरुन उरणारा, विश्व मुळ, सर्वोत्तम पुरुष मोक्षाची विजय पताका आणि दिनाचा मित्र असतो अशा सद्‌गुरुचा जयजयकार असो - 8

16.सद्‌गुरु सूर्यासारखा आहे म्हणावे ते बरोबर नाही. सर्याच्या प्रकाशाला मर्यादा आहेत. पण सद्‌गरुनां मर्यादा नाही. सद्‌गुरु अमृतासारखा आहे म्हणावे ते बरोबर नाही. स्वर्गात नित्य अमृत पिणारे देव अखेर मृत्युचे मार्गाने जातात. सद्‌गुरु ज्याचे वर कृपा करतात तो खऱ्या अर्थाने अमर बनतो. -24

17. सद्‌गुरु चिंतामणी म्हणाले ते बरोबर नाही. ज्याच्या मनांत चिंता असे त्यास चिंतामणीचे महत्त्व वाटते. सद्‌गुरु शिष्याच्या मनांत कसली चिंताच उरु देत नाही. - 26

## दशक पहिला विचार 18 ते 23

## समास पाचवा - संत स्तवन 1 / 5

18.स्वत:पाशी असलेली आत्मवस्तु आपणास पाहता येत नाही. सूर्यप्रकाशांत लहानांत लहान, मोठयांत मोठी वस्तु दिसतात पण साधकाला आत्मज्ञान प्राप्त होत नाही. ते संताचे कृपेने प्राप्त होते. - 5

19.वाणी, मन व बुद्धि यांच्या शक्तिच्या पलीकडे संत आहेत. आत्मस्वरुपापुढे साऱ्या शंका मावळतात, प्रयत्न वाया जातात. क्षीण होऊन जातो. - 9

20. सत्यसंगाने स्वानुभव येतो व ती वस्तु कळते. संतामुळे आत्मवस्तु कशी ते समजते. संताचा महिमा सांगणारा माणूस या जगांत नाही. - 13

21.संत परमानंदाचे स्थान, संतोषाचे मूळ, अखंड सुख व विश्रांती व कायमची तृप्ती असते. भक्तीचे पर्यवसान झाले की संतपण येते. -17

22.संत तीर्थाप्रमाणे धर्माला जागवितात. संताचे अंत:करण म्हणजे आत्मस्वरुपाचा व पुण्य साठविण्याचा पवित्र ठिकाणाच होय. -18

23.जे परब्रह्म हृदय विश्वाहून निराळे आहे. वेद व श्रुति ज्याला जाणू शकत नाहीत ते परब्रह्म संत कृपेने साधकांच्या अंत:करणात प्रकट होते. -24

## दशक पहिलाविचार 24 ते 27

## समास सहावा - श्रोतेजन स्तवन 1 / 6

24.श्रोते - मूर्तिमंत शांति असलेले आणि सत्वगुणाने भरलेली आहेत व ते दासबोध ऐकतात. - 4

25.भाग्यवान व ऐश्वर्यसंपन्न पुरुष आपल्यासमोर जे येईल त्याचा अव्हेर करत नाहींत. ते गुणग्राही असतात स्विकारतात. त्यांतील गुणाचे सेवन करतात. - 11

26. समर्थ सांगतात - माझे श्रोते परमेश्वर स्वरुप आहेत. ओबडधोबड शब्दाने त्या परमेश्वराची पूजा करण्याचा मी प्रयत्न करतो. -14

27. समर्थ सांगतात - वाघ, सिंहाचे पिल्ले त्यांच्यासमोर खेळतात त्याचप्रमाणे तुम्हा संताचे मी लेकरु आहे व आपणास दासबोध सांगत आहे. - 20

## दशक पहिला विचार 28 ते 32

## समास सातवा - कवेश्वर स्तवन 1 / 7

28.कवि म्हणजे वेद रुपाने अवतरलेला परमेश्वरच होय, कवीला सरस्वति पूर्ण वश असते, कवि कलांना जीवंत ठेवतो. - 2

29.कवि शब्दरुपी रत्नाचे समुद्र असतात. मुक्त पुरुषांच्या अवस्थेची सर्वांगीण कल्पना कवीच करु शकतात ते अध्यात्म ग्रंथाची खाण असतात. ते बोलके जीवन चिंतामणीच असतात. - 5

30. कवीच्या प्रतिभेचे मुमुक्षला ज्ञान दृष्टी येते. स्वकर्तव्याची जाणीव होते. मनोजयाचे उपाय समजतात. धार्मिकांना नीतीचे वळण लागते. - 11

31. मोठ्या कवीमुळे जगाचा उद्धार झाला. व्यास, वाल्मिकी इत्यादी महाकवि त्यांनीच लोकांना विवेक शिकविला. - 23

32.कवि अत्यंत शुद्ध परब्रह्माचे ऐश्वर्य होय. दृश्य विश्वाला अंतर्यामीपणाने सांभाळणारा जो विराट पुरुष त्याची ध्यानावस्था म्हणजे कवि होय. कवि म्हणजे साकार झालेली भक्ति. - 32

## दशक पहिला विचार 33 ते 36

## समास आठवा - सभास्तवन 1 / 8

33. अध्यात्मिक सभेत मुक्ति सुलभ होते. तेथे ईश्वर आपण होउुन प्रेमाने तिष्ठत उभा राहतो. - 1

34. अध्यात्म सभेत योगी, तपस्वी, विव्दान, वेदज्ञ, शास्त्रज्ञ तत्वज्ञानी, संत, सज्जन, महाकवी, सिध्द, साधू सर्वज्ञ लोक येतात. - 13

35. अध्यात्म सभेत परमार्थाची आवड असणारेच लोक बसतात. त्यामुळे खरा परमार्थ ऐकावयास मिळतो. त्यामुळे त्यांचा उध्दार होतो. - 21

36. अध्यात्म सभेत धीराची, सत्वगुणी, उत्तम गुणांनी भरलेली, परत्माप्रेमी मंडळी जमतात. नित्य नवा स्वानंद मिळतो. - 22

## दशक पहिला विचार 37 ते 42

## समास नववा - परमार्थस्तवन 1 / 9

37. मानवी जीवनात उत्तम साध्य, फळ म्हणजे परमार्थ व ते साधकाचे ध्येय आहे. तो फार सोपा आहे व संत समागमाने सहज प्राप्त होतो. - 2

38. परमार्थ कधी बदलत नाही, कमी जास्त होत नाही. झिजत नाही किंवा दिसत नाही, असे होत नाही तो गुरुकृपने साध्य होते. - 10

39. परमार्थामुळे आत्मानात्म विवेकाने माया अस्तंगत होते, नाहींसे होते. सार काय व असार काय हे कळते. आपल्या हृदयामध्यें ब्रह्म स्वच्छपणे अनुभवास येते. - 14

40. प्रपंच खोटा वाटतो, मायेचा पसारा कल्पमय वाटतो विवेकामुळे शुध्द आत्मस्वरुपाचे दर्शन होते हे केवळ परमार्थामुळे शक्य होते. - 14

41. सिध्द, साधू आणि महात्मे यांना परमार्थ विसावा देतो. सात्विक परमार्थामुळे ब्रह्मदिका विश्रांती मिळते, समाधान लाभते, सात्विक सामान्य माणसांनी संतसंगती धरल्यास त्यांना विसावा आणि समाधान मिळते. - 20

42. परमार्थाने संसार नीटपणे होतो. व परलोकाचा, धार्मिक मार्ग दाखवितो व साधकानाआधार देतो. भवसागरातून पार पडण्याचा मार्ग दाखवितो - 23

## दशक पहिला विचार 43 ते 50

## समास दहावा - नरदेहस्तवन 1 / 10

43 .नरदेह प्राप्त झाल्यामुळे कोणी नवविधा राजमार्गास गेले, कोणी योगी, ज्ञानी होऊन वैकुंठास, कैलासास गेले तर कोणी अहंकार सोडून आत्मानंदाने समाधान पावले. – 19

44.निर्व्यंग नर देह मिळाल्यास तो परमार्थास लावावा नाही तर मायेच्या जाळयांत अडकून भ्रमात पडणार. – 33

45.घर माझे म्हणजे योग्य नाही. ते शाश्वत नाही. ते खोटे आहे जगात आपली वस्ती दोन-चार दिवासाचीच असते. ती कुठे तरी करावी – 50

46.देह आपला म्हणावा तेही खरे नाही. घराप्रमाणे तो देखील अनेका साठी जन्मास आला. माणसाच्या डोक्यात उ वाघर करतात, व राहतात. – 51

47. देह वाघ घेऊन जाऊ शकतो, चोर देहास त्रास करु शकतात. तरी देह परमार्थी लावण्यांत सार्थक आहे न लावणारे मुर्ख होत. - 59

48.शरीर पुष्कळाचे आहे. मूर्ख माणूस त्यास उगाच आपले म्हणतो. – 60

49.देह परमार्थासाठी झिजवला तरच त्याचे सार्थक झाले असे समजावे नाहीतर नाना प्रकारच्या आघातांनी तो वाया जातो व मृत्यू पावतो. -61

50. परमार्थातातील सुखाची कल्पना संसारातील मूर्खांना येत नाही. -62

**दशक पहिला समाप्त.**

---

## दशक दुसरा  विचार 51 ते 55

## समास पहिला - मुर्खलक्षण 2/1

51. तीन डोळे व एक दांत असलेल्या ओंकाररुप गजाननाला मी नमस्कार करतो देवा तुम्ही कृपादष्टीने सर्व भक्ताकडे पहावे -1

52.आईबापास जो उलटतो, बाइलवेडा, परस्त्रीवर प्रेम करतो, कुल न पाहतो लग्न करतो तो मूर्ख समजावा तो कामवासनी व अज्ञानी असतो. -10

53.जो रोगी असून औषध घेत नाही. पथ्य पाळत नाही. कुजूषपणा करतो. नेहमीवाचाळपणा करतो, आपल्या वाटयास येईल ते आवडत घेत नाही. तो एक अज्ञानी व वेडा असतो. तो मूर्ख समजावा - 28

54. चंचल बुध्दीचा, स्वार्थी, पैशाला सर्वस्व मानणारा, नास्तीक, कामी दुर्जन संगतीत राहणारा, रागाने स्वत:चे नुकसान करणारा तो मूर्ख समजावा. - 37

55.हलक्या लोकांच्या तोंडी लागणारा, मत्सरी, वेळ वय वाया घालविणारा, विश्वासघातकी, भ्रष्टाचारी, चिंताग्रस्त तो मूर्ख होय. - 56

## दशक दुसरा  विचार 56 ते 60

## समास दुसरा - उत्तम लक्षण 2/2

56. प्रवासात वाट विचारल्याशिवाय जाऊ नये, ओळखण्याशिवाय फळ खाऊ नये, दिसली वस्तू उचलू नये, फार वाद घालू नये, कपटी वागू नये, कुल विचारुनच लग्न करावे - 3

57.विचार केल्याशिवाय बोलू नये, नीतीने वागावे, पाप मार्गाने पैसा कमऊ नये, निंदा व्देष करु नये. - 7

58.प्रसन्नता सोडू नये. आळसात सूख मानू नये, विश्वासघात करु नये. स्वच्छ रहावे, अति आहार करु नये, फार झोपू नये. खोटी साक्ष देऊ नये. - 23

59.धूम्रपान करु नये, मादक पदार्थ घेऊ नये, निरोद्योगी राहू नये. शिवी देऊ नये, चोरी करु नये, कंजुषपणा करु नये. -28

60.दुसऱ्यास मदत करावी, सात्विक वागावे, शरणागत्तास शिक्षा करु नये, खोटया मार्गाने जाऊ नये. विवेकाने सत्याने वागावे. 41

## दशक दुसरा विचार 61 ते 65

## समास तिसरा - कुविद्या लक्षण 2/3

61.कुविद्या ही अतिशय हीन व वाईट असते माणसाने त्याचा त्याग करावा ती ऐकणे म्हणजे त्याचा त्याग घडतो. कुविद्या म्हणजे अवगुणच. -3

62. कुविद्या म्हणजे काम, क्रोध, मत्सर, लोभ, दंभ, तिरस्कार गर्व, अहंकार, व्देष, विषाद विकव्य. - 4

63. कुविद्येचा माणूस हीन, कंजुष, आळशी, खादाड, दुर्बळ लबाड, मूर्ख, वाचाळ, वेडपट असतो. -10

64. कुविद्येचा माणूस पापी निर्दय, उध्दट, विषयासक्त दृष्ट वृत्तीचा आणि ढोंगी असतो. 17

65. कुविद्येचा माणुस संशयी, कलहप्रिय, व्यसनी, घाणेरडा लोचट, स्वार्थी, भांडखोर, दृष्टी, अशिक्षित, भाग्यहीन भक्तिहीन, ज्ञानहीन, विवेकहीन असतो. -37

## दशक दुसरा विचार 66 ते 70

## समास चौथा - भक्ति निरुपण 2/4

66. भगवंताची भक्ति उत्तमच आहे ती पूर्व पुण्याई मुळेच मिळते. त्यामध्ये संताचा समागम अति उत्तम, आयुष्य सार्थकी लागते. -3

67. भक्तिमुळे परलोक प्राप्त होतो. त्यासाठी दया, धर्म करावा किंवा सोपे भगवंताचे भजन करावे. अंतर्यामी भगवंतावर खरे प्रेम असावे. -6

68.मनुष्य जन्माचे सार्थक करावे, आत्महित करुन घ्यावे. त्यासाठी नरदेह भक्तास योग्य आहे. त्याप्रमाणे तन, मन, धन आपण भगवंतास लावावे. -13

69.जो भगवंताची भक्ति करत नाही, तो जिवंत असून मेल्यासारखे जगतो. जो स्नान, संध्या, देवपूजा, जप, मंत्र, ध्यान, मानसपूजा कांहीच करत नाही. त्यास मोक्ष प्राप्ती होत नाही. -18

70.जो स्वधर्माचरण करीत नाहीत, स्वच्छंद राहतो, जात, वैराग्य, योग् जाणत नाही. अशी माणसे प्रेतासमान आहेत. ज्यांना पूर्व पुण्याई असे तेवढीच भगवंताची भक्ति घडते. त्यास जे कर्म करतात त्याचे फळ मिळते. -27

## दशक दुसरा विचार 71 ते 75

## समास पांचवा - रजोगुण लक्षण 2/5

71.देह सत्व, रज व तम गुणंचा आहे. सत्वगुणामुळे भक्ति होते, रजोगुणामुळे पुन: जन्म येतो, तमोगुणामुळे खालच्या योनीत जातो. -2

72.घर माझे, संसार माझा, असा जो ठरवितो तो रजोगुणी होय. तो पापपुण्याचा विचार करत नाही. तो दानधर्म, जप, लय ध्यानाचा विचार करत नाही. -12

73.मीच थोर, सुंदर, बलाढय असे रजोगुणी समजतो तो मत्सरी, कपटी. स्वार्थी, लोभी असतो. -18

74.दुसऱ्याचे वैभव आपले व्हावे अशी इच्छा करतो तो रजोगुणी होय, तो दुसऱ्याची निंदा, अवाळी करतो, वाद करतो. -25

75.जो कलावंत असतो, खेळात पैसा घालवितो मद्यपी असतो तो रजोगुणी समजावा. त्याला गावाच्या भानगडी आवडतात. - 28

## दशक दुसरा विचार 76 ते 80

## समास सहावा - तमोगुण लक्षण 2/9

76.जो दु:ख येताच अतिशय क्रोधी होतो. बेफाम पिशाच्यासारखा वागतो, ज्याला दुसऱ्याचे प्राण घ्यावे वाटते तो तमोगुणी समजावा. -5

77.जो दुसऱ्यास शस्त्राने जखम करतो, जो गोंधळ तो संशयी असतो, जो अतिशय झोपतो, आत्महत्या करतो, पैशासाठी कोणाचाही वध करतो तो तमोगुणी होय. -12

78.जो दुसऱ्याचे दुष्टबुद्धीने नुकसान करतो, मत्सराने लढाई करतो ज्याच्या मनांत कायम व्देष असतो, सत्कर्मे आवडत नाहीत, ज्यास पापाचे भय नसते तो तमोगुणी होय. -18

79.ज्याला भक्ति, तीर्थ व देव मुळीच आवडत नाही. जो पिशाचबाधा करुन घेतो, निर्दयपणे वागतो तो तमोगुणी ओळखावा. -23

80.मानेला गळ अडकून लोंबळण्याचे नवस करणे, आगीतून चालणे, जीब टोचून घेणे, डोळ्यावर खापर ठेवून त्यात विस्तव ठेवणे. आपल्या अंगास चटके घेणे अगर टोचून घेणे हे सर्व तमोगुणाचे लक्षण आहे. -33

# दशक दुसरा  विचार 81 ते 87

# समास सातवा - सत्वगुण लक्षण 2/7

81.जो संसारी दु:ख नाहीसे करतो, भगवंताच्या दर्शनाचा मार्ग दाखवितो. उत्तम गती देतो व परमानंदाचा अनुभव देऊन जन्तममृत्यूचे निवारण करतो तो सत्वगुण होय. -6

82.ज्याचे अंत:करण निर्मळ असते. बाह्यांग स्वच्छ असते. जो सर्व प्रकारचे व्रते, दाने, सेवा करतो, अन्न भोजने करतो, तपस्वी लोकास शांती देतो, तो सत्वगुणी होय. -21

83.जो देवासाठी उपवास करतो, जेवण, व पानतंबाखू, मध सोडतो, नित्य जप आणि ध्यान करतो, अभिमान सोडतो, अंतर्यामी नित्य देवाचे ध्यान करतो, ज्याला देहाचे विस्मरण होते तो सत्वगुणी होय. - 39

84. ज्याची आत्मस्वरुपाच्या विचारांनी बुद्धी भरुन जाते, वाईट संशय नाहीसे होतात, वागण्यांत शांती, क्षमा आणि दया असते तो सत्वगुणी होय. - 52

85.भगवंतासाठी सर्व सुखे जो सोडतो, देहाचे प्रेमसुद्धा जो सोडतो, तहानभुक विसरतो, त्याचे मनांत बाह्य वास्तुवर वासना नसते तो सद्‌गुणी होय. - 60

86. श्रवण, मनन आणि निदिध्यास या साधनमार्गाने जाऊन ज्याला शुध्द आत्मज्ञान होते व समाधान प्राप्त होते तो सत्वगुणी होय. -61

87.ज्याला अहंकार नाही, जो इंद्रिये आपल्या ताब्यात ठेवतो. जो पूजा अभिषेक, नामस्मरण करतो, तो सत्वगुणी होय त्याच्या ठिकाणी ईश्वराचा अंश असतो. -78

## दशक दुसरा विचार 88 ते 93

## समास आठवा - सद्विधा निरुपण 2/8

88.उत्तम पुरुष अति सुंदर, चतुर, बलवान, सौम्य श्रीमंत व उदार असतो. तो महाज्ञानी असून उत्तम भक्त असतो, तो विरक्त, मोठा तपस्वी असून अति शांत असतो. - 5

89.उत्तमपुरुष निर्लोभी असून मोठ्या आदराने वागवितो व श्रेष्ठ असून लीन असतो, तो धार्मिक असतो तो शूर, विवेकी असून नियम पाळतो. - 7

90. उत्तम पुरुष तत्वज्ञानी, अनासक्त, विव्दान असून सज्जन असतो, तो पुण्यशील चारित्रवान असतो. तो धूर्त, नियमितपणे वागणारा, कौशल्याने वागणारा पटपट काम करणारा असतो. -13

91.उत्तम पुरुष उपासना करणारा असून इंद्रिये ताब्यात ठेवणारा असतो. तो संगीत जाणतो, मोबदला न घेता लोकास सन्मार्गास लावतो. -19

92.उत्तम पुरुष पैसा आणि बायका बाबतीत अत्यंत पवित्र असतो तो अंत:करणाने निष्कलंक, सरळ, निर्मळ व पवित्र असतो. त्याची कशातही आसक्ती नसते त्याचे जीवन आंत बाहेर पवित्र असते. -20

93. उत्तम पुरुष यशवंत व किर्तीवंत, शक्तिवंत व सामार्थ्यवंत असतो. तो अत्यंत सत्यवान, कुलशीलवान ऐश्वर्य संपन्न, वैराग्य संपन्न असतो. - 29

## दशक दुसरा विचार 94 ते 98

## समास नववा - विरक्त 2/9

94.वैराग्यामुळे परमार्थ साधतो, आत्मसुख मिळते, स्वरुपाचा अनुभव येतो, आणि मोक्षासह सर्व भाग्य व ऐश्वर्य जीवनात दिसू लागते, इच्छा अपेक्षा पूर्ण होतात. तो जगात प्रख्यात होतो. -6

95.वैराग्यामुळे विवेक जागृत होतो. त्याने आध्यात्म वाढते. ब्रह्मज्ञानाची अनुभूती येते. त्याने निष्कामता जीवाशी घट्ट राहते, नितीमत्ता येते, वृत्ती क्षमाशील होते. - 11

96.विरक्ताने स्नान संध्या, जप, ध्यान, तीर्थयात्रा, भजन, नित्यनेम व अंत:करण शुध्द होते. सर्वांना सुख लागेल असा प्रपंच होतो. -21

97.विरक्ताने काळाची पावले ओळखावी, प्रसंग पाहून हुशारीने वागावे, त्याने एकांगी असू नये ज्ञानाचा सर्व अंगाचा विचार करावा. -29

98. विरक्ताने अगदी खरोखर वैरागय संपन्न असावे. तो भगवंताचा भक्त असावा, त्यास आसक्ति, बंधन नसावे साधक वृत्तीने रहावे व निंदकास वंदन करावे -38

## दशक दुसरा विचार 99 ते 103

## समास दहावा - पढतमूर्ख 2/10

99.शहाणे असून मूर्खासारखे वागतात त्यांना पढतमूर्ख म्हणतात. जो विज्ञान आहे व लोकास ब्रह्मज्ञान सांगतो. पण जो वासना आणि प्रयत्नाने अवगुण बाळगतो तोही पढतमूर्खच श्रोत्यांनी प्रयत्नाने अवगुण सोडता येतात नंतर माणूस सुखी होतो -3

100.जो स्वधर्माची निंदा करतो, सर्वांना नावे ठेवतो शब्दाने मन दुखवतो, घमेंडी असतो, क्रोधी असतो तोच पढतमुर्ख होय परंतु प्रयत्नाने ते अवगुण सोडावे. -10

101. परमार्थ न साधता संसारात गुंतून राहतो, स्त्रीयामध्ये राहतो. विनाकरण स्तुती करतो. मत्सर करतो, तो पढत मुर्ख होय हे अवगुण प्रयत्नाने जावू शकतात. -20

102.ज्यास वैराग्य नाही, भजन पूजन नाही. तीर्थ क्षेत्र वेद आणि शास्त्र मानीत नाही. पाठीमागे तो निंदा करतो तो पढतमुर्ख होय. प्रयत्नाने हे अवगुण जातात. -25

103.जो सद्गुरुला विसरतो, प्रपंचासाठी परमार्थ वारतो सद्गुदुची किंमत ठेवत नाही, स्वार्थी व कुंजूष असतो तो पढतमर्ख समजावा प्रयत्क्नाने हे दोष जातात -35

## दशक तिसरा विचार 104ते 107

## समास पहिला - जन्मदु:ख निरुपण3/1

104.जीव पूर्वी जन्माचीकर्मे भोगासाठी जन्म घेतो,असे वेद म्हणतो, कर्म भोगण्यासाठी शरीर लागते. जन्म म्हणजे कुविद्या, अज्ञान वासना होय. - 2

105.जन्म म्हणजे स्वरुपापासून बाहेर काढणारी अवस्था होय. मी देह आहे ही सुक्ष्म कल्पना जीवाला जन्म घालते. अविधेमुळे, वासनेमुळे जन्म येतो. -8

106.गंगेचे पाणी प्याले तर त्याचे मूत्र बनते, मळ, मूत्र आणि ओक यावरच देह जगतो. वाढतो 25

107. गर्भात असता मूळ “सोह सोह” अशी आत्मबुध्दि असते बाहेर येताच “कोहे कोहं” अशी देहबुध्दी होते. -47

## दशक तिसरा विचार 108 ते 112

## समास दुसरा - स्वगुण परीक्षा (अ) 3/2

108.द्रश्यरुप सृष्टि, दु:खाचे मुळ आहे. जन्म घेण्यापासून शेवटपर्यंत दु:खच असते. भोगावयाचे असते -1

109. ब्रह्मदिक देव अथवा प्रत्यक्ष लक्ष्मीला देखील सख्या आईप्रमाणे मुलाची समजुत काढता येत नसे. -12

110. आई कुरुप असो, गरीब असो आईपाशीच मुलाचे सर्व सुख केंद्रित असते. -15

111. वय वाढत जात असता नैसर्गिक शारीरिक आपत्ती येतात रोग होतात, विविध तापाने माणसास त्रास होतो -33

112. लोक बायकोसाठी भक्ति सोडतात, सामुज्यमुक्ति स्त्रीपुढे तुच्छ मानतात व परमार्थ बुडवितात.

## दशक तिसरा विचार 113 ते 115

## समास तिसरा - स्वगुण परीक्षा (ब) 3/3

113. पहिली बायको वारल्यानंतर दुसरे लग्न केले तर आणखी दु:ख वाढते. गरीबी वाढते, भक्ति विसरतो व देवाला खोटे मानू लागतो. - 7

114. देह क्षीण झाला, नाना रोग उद्भवतात, तारुण्य संपले वर दु:ख वाढत जाते, मुले झाले नाहीत, झाली, पण मरुन गेली. दु:खहि दु:ख झाले. - 36

115. मुल होण्यासाठी मंत्रतंत्र केले, चेटकीचे प्रयोग केले, वेडा झाला दु:खहि दु:ख झाले. पाप कर्मे केली - 46

## दशक तिसरा विचार 116 ते 120

## समास चवथा - स्वगुण परीक्षा (क) 3/4

116.घरखर्च वाढतो. मिळकत कमी होते. कर्जबाजारी होतो. कर्जबाजारी होतो. आपण अन्न खातोतेच आपणास खाते, अंगीलागत नाही. - 11

117. प्रपंचात सर्व आपले सुख पाहतात, दुसऱ्याच्या दु:खाची जाणीव ठेवत नाहीतशेवटी कोणीच उपयोगी पडत नाही. - 20

118. प्रपंचातील सर्व नाते केवळ सुखासाठीच असतात. आई सोडून. शरीरास जिने जन्म दिला ती आई मात्र मिळणार नाही. - 38

119.आई डाकिणी जरी असली तिची मुलावर माया असते, हजार बायका केल्यातरी अशी माया मिळणार नाही, जी प्रांपचिक माणसे आई बापाशी भक्ति भावाने वागतात ती धन्य होत. -41

120. आपला देह दुसऱ्याचा ताबदोर केला ईश्वरासाठी त्याचा वापर केला नाही. केवळ एका कामवासनेसाठीच जन्मभर कष्ट केले आणि आयुष्याच्या शेवटी एकटयासच जावे लागते. -48

## दशक तिसरा विचार 121ते 124

## समास पाचवा - स्वगुण परीक्षा (ड) 3/5

121. तारूण्य गेले, बळ गेले, संसार करण्याची हौस गेली. शरीर, संपत्ति नाश पावली ज्याना वाढविले तेच शत्रू होतात. परंतु शेवटी कठीण प्रसंग येतो - 48

122. जन्मभर स्वार्थच मागे लागला पण सर्व व्यर्थ गेले. सुखासाठी श्रम केले परंतु अखेरीस दु:ख यातना आणि मरणानंतर यम यातना सोसाव्या लागणार. -51

123. जन्म सर्व दु:खाचे मुळ आहे. प्राणी जन्मला की दु:ख सुरु होते. माणसाने स्वत:चे कल्याण करुन घ्यावे. प्रत्येकाने भगवंतास शरण यावे. -53

124. म्हातरपण येते अंत:काळी जीवास पश्चाताप होतो. पुन्हा जन्म मरण व संसार यातना येतात, भगवंताच्या भक्ति शिवाय यातून सुटका नाही.- 56

## दशक तिसरा विचार 125

## समास सहावा - अध्यात्म ताप 3/6

125.देह, इंद्रिये व प्राण यांच्यामुळे सुख दु:ख होतात तो आध्यात्मिक ताप असे नांव आहे उदा. सर्व प्रकारचे रोग, थंडी, उकाडा, भूक, झोप अति संभोग - 27

## दशक तिसरा विचार 126 ते 127

## समास सातवा - आधिभौतिक ताप 3/7

126. बाह्य पदार्थाच्या संयोगाने जे सुखदु:ख निर्माण होते. त्यास आधि भौतिक ताप म्हणतात. उदा. ठेंच लागणे, मुंगी, डांस चावणे -6

127. कुरुप, क्रुर स्वभावाची बायको मिळणे, मुलगा मुर्ख असणे, बाहय कारणाने यातना होणे, छळ करणे यास आधिभौतिक ताप म्हणतात. -54

## दशक तिसरा विचार 128 ते 130

## समास आठवा आधिदैविक ताप 3/8

128. माणसांना त्याच्या चांगल्या वाईट कर्मानी मरणानंतर स्वर्गनरक असे अनेक भोग भोगावे लागतात. त्यांना आधिदैविक ताप असे म्हणतात अविचाराने जो अनेक दोष करतो त्यामुळे त्यास यमयातना भोगावे लागतात. -3

129. मरणोत्तर लोकांत पापपुण्याची शरीरें असतात. मनुष्य मेल्यावर त्याचा सुक्ष्म देह त्याच्या पापपुण्यानुसार त्या शरीरात जातो मग त्याला पापाची पुण्याची फळे भोगावी लागतात. - 16

130. जे वेदाज्ञा पाळीत नाहीत, हरिभक्ति करीत नाहीत त्याना यमयातना भोगाव्या लागतात. -18

## दशक तिसरा विचार 131 ते 135

## समास नववा मृत्यूनिरुपण 3/9

131.जन्माला आल्यापासून काळ सारखा बरोबर असतो जसे ज्याचे कर्म असते तसे माणूस स्वदेशी अथवा परदेशी देह ठेवतो. बलाढय महाराजे सुध्दा मृत्यूपुढे टिकत नाहीत. - 6

132. हटयोगी, राजयोगी, विरक्त, बाल, तरूण, शहाणा, पुण्य पुरुष हरिदास, सत्कर्म करणारा सर्वांना मृत्यू ओळखत नाही. 35

133. माणूस अति थोर, प्रत्यक्ष विष्णु आणि शंकर असोत किंवा भगवंताचा अवतार असले तरी मृत्यू त्याची पर्वा करत नाही.. -40

134. हा मृत्यूलोक आहे ही जाणीव ठेवून माणसाने आपले सार्थक करुन घ्यावे. मृत्युने देह नेला तरी किर्ती रुपाने स्वत: लोकामध्ये उरावे.-44

135. ब्राह्मण गेले, संसारी गेले, असे सारे गेले पण संत मात्र टिकले. परंतु आत्मज्ञानी होऊन जे स्वस्वरुपाशी एकरुप झाले तेवढे मात्र ठिकते. 59

## दशक तिसरा विचार 136 ते 150

## समास दहावा - वैराग्य निरुपण 3/10

136. मृत्यूचा नेम नाही. आशा व ममता सूक्ष्म देहाच्या बेडया आहेत या देहास जखडून ठेवतात, दु:ख देतात, संकटात टाकतात. -2

137. देहाभिमानाची वृत्ती, कामवासना, तिरस्कार वृत्ती जात नाही. मद, मत्सर कमी होत नाहीत. तोपर्यंत मनुष्य मोहीत अवस्थेतअसतो. - 4

138. बुडत असताना माणूस माझे माझे म्हणत राहतो आयुष्य वाया जात असून कुळाचा अभिमान, प्रपंचाचे माझेपण सोडीत नाही. -6

139. जे भाविकपणाने भगवंतास शरण जातात, त्यांना स्वानंद भोगावयास मिळतो. संसार दु:ख बाधत नाही. त्यांना भगवंताची मदत खात्रिने मिळते इतर लोक दु:खात मरतात. -9

140. यज्ञ म्हणजे सेवा, पूजा करणे, ज्याला देव मनापासून आवडतो त्याच्या संकटाचे ओझे देवावर पडते भगवंत दासाचे संसारदु:ख नाहीसे करतो. -11

141.ज्याची आराधना तसेच त्याला देव समाधान देतो, भाव किंचीत जरी उणा झाला, मंद झाला तर देव लगेच दुरावतो, त्याची प्रचिती मंदावते. -15

142. ईश्वर दर्शनानें पावन झालेले पुरुष आपण स्वत: तरतात व लोकांच्याही उपयोगी पडतात, तारतात. ते अभक्त भक्त होतात. -27

143. मानवी जीवन हे रत्नांनी भरलेली पेटी आहे असे समजावे त्या पेटीत ईश्वर भजनाची उत्तम रत्ने भगवंतास अर्पावी आणि आनंद लुटावा. 27

144. जो ईश्वराचा पक्का आधार धरुन संसाराची वासना सोडतो त्यांना देव आंत बाहेर संभाळतो, त्याची वृत्ती प्रपंच संभाळतो. 29

145. ज्याचा जीव अत्यंत आत्मीयतेने ईश्वरामध्ये गुंतलेला असतो ते भक्त स्वानंदाचा सोहळा लुटतात, त्याच्या आनंदाचा ठेवा अक्षय असतो पण तो सामान्य व्यवहारामध्ये दृश्य नसतो. -31

146. एकास मोठे रत्न मिळाले त्याने ते न जाणता कवडी मोलाने घलविले, तसे आत्मघातकी अभाविक माणूस कवडी मोलाने जीवन घालवितो, तसे ईश्वर न जोडणारे करंटे आहेत. - 34

147. पूर्वकर्माच्या ऋणानुबंधाने प्रपंचातील माणसे एके ठिकाणी गोळा होतात, जन्माला येतात, आपले शरीरसुध्दा खरे नाही. एका भगवंतावाचूर खरोखर आपले कोणी नाही. भावबळाने त्याला घट्ट धरा. -63

148. आत्मरुपातील श्री राम सोडून जे देह सुखाची वासना करतात ते दुरात्मा समजा, ते आपल्या कर्माची फळे भोगतात. - 59

149. आंतबाहेर आनंदन भरलेला राम सोडून जो नित्य इंद्रिय सुखाची इच्छा करतो, त्यास कधीही समाधान मिळणार नाही. त्यासाठी भगवंताचे भजनी लागावे. खरे सुख मिळेल, दु:खाचे मूळ असलेले सगळे स्वजन दूर करा. -63

150. ज्याची देहसुखाची वासना विसरली तो खरा सुखी होय. एकनिष्ठेने भगवंताचे भजन करणाऱ्यास आपोआप सुख लाभेल. - 71

## दशक चवथा विचार 151 ते 156

## समास पहिला श्रवण भक्ति 4/1

151. ईश्वर हा बिंब तर जीव हा प्रतिबिंब प्रत्येकाच्या अंत:करणात असतो. ईश्वर आहेच या दृढ विश्वासांतून भक्ति जन्म घेते. परमार्थ सांगण्याची शक्ति (आत्मविद्येचा प्राण) आपणास गणपतीने आपणास द्यावी. -1

152.श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवा, अर्चन, वंदन दास्य सख्य आणि आत्मनिवेदन हे नऊ भक्तिचे प्रकार आहेत. पहिला प्रकार श्रवण - भगवंताची कथा पुराण, वेद, प्रवचन आध्यात्मिक विषय ऐकावे. -7

## 153. मुद्रा -

1) खेचरी - भुकुटीमध्ये नजर करुन आकाशांत मत स्थिर करणे.

2) भूचरी - नाकाच्या शेंड्यावर नजर ठेवून त्याचे पुढे चार बोटे असलेला अवकाशात मन स्थिर करणे.

3) चाचरी - इष्ट देवतेवर मन गुंतवुन कोणत्यातरी एका गोष्टीवर नजर स्थिर न ठेवणे.

4) अगोचरी - चिदा काशांत मन स्थिर करुन पदार्थ पाहून न पाहणे.

5) षण्मुखी - दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या सारे बंद करुन आंतील सोऽ हं ऐकून तेथे मन स्थिर करणे.

6) महामुद्रा - डाव्या पायाची टाच शिवणीवर दाबावयाची उजवा पाय लांब ठेवाण्याचा त्याचा अंगठा धरावयाचा प्राणायाम करीत उजव्या गुडघ्यास डोके लावयाचे. ()

7) शाम्भवी - मन रिकामे करावयाचे डोळे उघडे ठेवून दृष्टी समांतर ठेवून गुरुमंत्र पहावयाचा अथवा ऐकणयाचा, हळू हळू डोळे मिटतात. इत्यादी मुद्रा करत. नाना प्रकारची आसते समजूत करावयाची. शरीरातील स्वाधिष्ठान मणिपूर, अनाहत, विशुध्द आणि आज्ञा ही चक्रे जागृत करावयाची पाताळे यांची माहिती घ्यावी. - 14

154. चंद्र, सूर्य, तारे, एकवीस स्वर्ग, सात, पात हे पाताळे याची माहिती घ्यावी. -16

155. संगीत, राग, चौदा विद्या, चौसष्ट कला वेद, चार देह, औषधे, सिध्दी, पंचमहाभूत सर्वा विषयी ऐकत जावे. -22

156. सर्व गोष्टी ऐकाव्या तत्वांश रहस्य शोधावे असार सोडून द्यावे. भगवंताचे सगुण चरित्र, मंत्र-तंत्र, आरत्या, उत्सव ऐकत जावे. -32

## दशक चवथा विचार 157 ते 161

## समास दुसरा - कीर्तन भक्ति 4/2

157. संसाराकडे पाठ करुन जीवाने हृदयस्थ भगवंताकडे तोंड फिरवले की भक्तीचा जन्म होतो. भगवंताच्या सगुण चरित्राच्या कथा सांगाव्या अखंड वाणी बोलती ठेवावी -2

158. किर्तन भक्ति - ग्रंथाचे पाठांतर करावे. तात्पर्य मुखाने सांगावे आपल्या स्वानंदसुखाचा स्वार्थ साधण्यासाठी पुन: पुन: हरिकथा केल्यावाचून कधीही राहू नये. -4

159. भगवंतास स्वत:स किर्तन आवडते. त्यासाठी टाळ, मृदुंग, गायन, नृत्य, तानाविना यासह भगवंताचे किर्तन करावे. कथेतील मागील पुढील भाग संबंध न तुटता किर्तन करावे. -11

160. भगवंताच्या सगुण चरित्राचे कथेला किर्तन नांव आहे. अव्दैताचे विवेचन आणि प्रतिपादन करणे यास निरूपण म्हणतात.

161. किर्तनभक्ति - कीर्तनाने वाणी पवित्र होते, कीर्तनाने माणूस भगवंतास योग्य होतो, तो शीलवान, चरित्रवान बनतो, किर्तनाने एकाग्रता साधते, संशय नाहीसे होतात. -29

## दशक चवथा विचार 162 ते 166

## समास तिसरा - नामस्मरण भक्ति 4/3

162. नाम म्हणजे दृश्याला दृश्सपणाने धारण करणारी परमात्म शक्ति. म्हणून नाम हे मूर्त व अमूर्त याना जोडणारी साखळी बनते ही तिसरी भक्ति आहे. नामस्मरणाने समाधान प्राप्त करुन घ्यावे. -2

163. सर्वकाळी नामस्मरण करावे, सुखभोगांत विसरू नये, वाटेल तो प्रसंग असो आपले नाम मात्र सोडू नये. -10

164. नामस्मरणाने संकटे नाहींशी होतात, माणूस थोर पदास चढतो. अनेक दु:खे नामस्मरणाने नाहीसे होतात. अंतकाळी जीवाला उत्तम गती मिळते. -13

165. नारायणाच्या नामाने अजामेळ पवित्र होऊन गेला. नामस्मरण करणारा माणूस भगवंतापर्यत पोचू शकतो. -19

166. अखंड नामस्मरणाने अंत:करण स्थिर होते. महापापाचे मोठे डोंगर जपाने नष्ट होतात. पापी माणसाचे अंत:करण निर्मळ होऊन जाते. उध्दार होतो. नामस्मरणात भगवंताचे रुप आठवावे. -25

## दशक चवथा विचार 167 ते 172

## समास चवथा - पादसेवन भक्ति 4/4

167. ज्याच्या निकट संगतीत आपण राहतो त्याचा परिणाम आपल्या देहावर व मनावर होतो. संताची संगत धरावी. भगवंताच्या प्राप्तीसाठी काया, वाचा, मने सद्‍गुरुची सेवा करावी हीच पादसेवन भक्ति. - 2

168. सद्‍गुरु परमात्मा दाखवितो, आत्म साक्षात्कार करुन देतो. सत्य, असत्य, चांगले वाईट, ग्राहय, अग्राहय समजावून सांगतात, त्याचे वाणीने परमात्माचे ज्ञान होते. - 5

169. दृश्याशी सर्वस्वी विलीन झाले, ‘मी’ नाहिसा झालेला अनुभव येतो. ज्ञेयाबरोबर ज्ञाता नाहीसा होतो. या संगत्याग निवेदन म्हणजे देवाला मीपण अर्पण करणे. 7

170. वासना क्षय पावली की दृश्याची किंमत राहत नाही. (संगत्याग) जीव हश्याला चिकटला ते सुखाखेरीज आत्मस्वरुपाचा अनुभव येत नाही. निवेदन - अहंकार मीपण त्यागणे, विदेहस्थिती - ज्यामानाने देहाचे प्रेम कमी होते त्यामानाने दृश्याचे प्रेम कमी होते.अलिप्रपणा - न दुषित झालेला, व मुळ स्थिती, वासना

रहित असणे. उन्मणी - स्वस्वरुमात ‘मी पण’ अनुभवणे, शुध्द मी लीन होणे. फक्त परमात्मा उरणे. -8

171. मीपण सर्व ठिकाणी व्याप्त आहे. सर्व मानवी कल्पना बाजूस ठेवून तिला कसे पहावे हे सद्‌गुरुकडून शिकावे. 12

172. सद्‌गुरुच्या सेवेशिवाय भगवंताकडे नेणारा दुसरा मार्ग नाही. सद्‌गुरु देतात ते कर्मकांडाने मिळत नाही गुढ गोष्टी आकलन सद्‌गुरुशिवाय शक्य नाही. 20

## दशक चवथा विचार 173 ते 176

## समास पांचवा - अर्चन भक्ति 4/5

173. देव, ब्राह्मण, साधुसत, संन्यासी, आत्मज्ञानी, गाय या सर्वांची पूजा करावी ही पाचवी भक्ति होय. - 1

174. मत्स, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, विष्णुचे अवताराची व गणेश, शारदा, विठ्ठल, जगन्नाथ, हनुमंत यांची पूजा पांचवी भक्ति होय. -9

175. संध्यातील चोवीस देवता केशव, नारायण, माधव, गोविंद,विष्णु, मधुसुदन, त्रिविक्रम, वामन, श्रीधर, ऋषिकेश पद्मनाथ, दामोदर, संकर्षण, वासुदेव, प्रद्‌युम्न, अनिरध्द पुरुषोत्तम, अधोक्षज, नरसिंह, अच्युत, जर्नादन, उपेंद्र या सर्वांची पूजा पांचवी भक्ति होय. -12

176. काया, वाचा, मत, वित्त म्हणजे पैसा, जीव व प्राप्त भगवंताच्या पायी अर्पण करुन पूजा करणे यास अर्चनभक्ति म्हणतात.

## दशक चवथा विचार 177 ते 181

## समास सहावा - वंदन भक्ति 4/6

177. नम्रता अंगी आली तर अभिमान फार क्षीण होतो. ज्या जीवास आपण पाहू त्याचे अवगुणाकडे दुर्लक्ष्य करुन त्याचे गुणच पाहावे व त्याच्यातील अनंताला वंदन

करावे, नमस्कार ही सहावी भक्ति आहे. संत, साधू आणि सज्जन यांना नमस्कार करीत जावा. -2

178. शंकर, विष्णू आणि सूर्य यांच्या दर्शनाने पापे नाश पावतात. त्याचे प्रमाणे विशेष करुन मारुतीला नित्यनिमाने नमस्कार करावा. - 6

179. विव्दान, याज्ञिक, पंडीत, ज्ञानी, भक्त, योगी आणि पवित्र माणसे यांना नमस्कार करावा. या सर्वामध्ये भगवंताचे वास्तव्य आहे. अशी भावना ठेवावी त्यामुळे अंर्तयामीपणाने राहणारे स्वरुप अनुभवास सुलभ येते.12

180. नमस्काराने आपले अवगुण कमी होतात. मोठी चूक घडली तरी नमस्कार घातल्याने त्याबद्दल क्षमा होते, दुसऱ्याच्या मनांतील किल्मिष नाहीसे होऊन प्रेम निर्माण होते. -15

181. नमस्काराने कृपा उचंबळते. अंत:करणांत दया येते प्रसन्नता येते, देवभक्तांना वंदन केल्याने पाप उरत नाही, नमस्कारात कष्ट नाही. खर्च नाही. साधन सामुग्री लागत नाही. जन्ममरणाची पीडा जाते. नेहमी मनापासून नमस्कार करा. -23

## दशक चवथा - विचार 182 ते 185

## समास सातवा - दास्य भक्ति 4/7

182. भगवंत माझा आहे मी त्याचा दास आहे. देवाचे दास होणे म्हणजे सातवी भक्ति होय. देवाची सेवा, पडेल ते काम स्वत: करावे. -2

183. देवाकडे येणाऱ्या सर्वांचा आदर, सेवा करावी, आपल्या वाट्यास आलेले काम त्वरीत करावे. मंदीरातील उत्सव जयंत्या महोत्सव कार्य न विसरता करावेत. -18

184. देवासाठी येण्याऱ्यांची सेवा - पाय धुण्यासाठी, स्नानासाठी पाणी ठेवावे, आसने, पिण्याचे पाणी ठेवावे, आसने, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, झोपण्याची उत्तम व्यवस्था, सुगंधी फुले, गंध, धूप नैवेद्य, फळे इत्यादी वस्तू ठेवावी. -23

185. देवाचे वैभव वाढवावे, सद्गुरुचे वाढवावे, प्रत्यक्ष न करता आले तरी मानस पूजेत करावे, दुसऱ्याबद्दल चांगले बोलावे, ऐकणाराचे समाधान होईल. -27

## दशक चवथा - 186 ते 190

## समास आठावा - सख्यभक्ति 4/8

186. भगवंताची अनुरक्ति+ देहसुखाची विरक्ति + प्राणी मात्रांबद्दल करुणावृत्ती =सख्यभक्ति. देवाशी अतिशय मैत्री करावी, स्नेह जोडावा, प्रेमाने, आपलेपणाने त्याला बांधून ठेवावे ही आठवी साख्यभक्ति होय. -2

187.भजन, निरुपण, किर्तन, गायन भगवंतास आवडते, तेच करावे. देहावरील आसक्ति सुटून ती भगवंतावर स्थिर झाली की भक्ति जन्मास येते. देवास भक्ताच्या हृदयातील प्रेम आवडते. -4

188.मी देवासाठी आहे. "प्रपंचाती अडचणी सोडून भक्त सतत देवाचेच चिंतन करतो.एकाग्रतेने भगवंताकडे सर्व भक्तिने भजावे, चित्त ढळू देऊ नये. -7

189. देवाशी जे सख्य करावयाचे ते मनापासून करावे. देवाने शरण आलेल्यास ठार मारले असे कधीही झालेले नाही. उलट देव संकटापासून सरंक्षण करतात. -25

190. आपल्या अंतरीच्या सर्व गोष्टी देवास सांगण्यासाठी भगवंताशी व सद्गुरुशी सख्य जोडावे. जसा देव तसाच सद्गुरु असे शास्त्र सांगते. -32

## दशक चवथा - विचार 191 ते 195

## समास नववा - आत्मनिवेदन भक्ति 4/9 व 4/10

191. भक्ति ही ज्ञानाची जननी आहे. आत्मनिवेदन करावे नि+विद् म्हणजे सर्मपण करणे. आपण स्वत:ला सर्वस्वी भगवंताला समर्पण करणे. त्याच्या हाती सोपविणे. -2

192. खरा देव कोणता ते ज्ञानाने, आत्मनात्मा विचाराने जाणावा मी ज्ञान झाले की भगवंत कळतो. देह + मन + आत्मा = माणूस आत्मा खरा 'मी' होय. तो नाहीसा होणे हेच आत्मनिवेदन. -9

193. सो s हं म्हणजे तो आत्मा आहे. आत्मा अव्दैत आहे. देहांहकार असत्य आहे. आत्मवस्तु मानवी कल्पनांच्या पलिकडे आहे. तिला निर्गुण म्हणतात. -19

194. भक्ताने आपला संपूर्ण मीपण भगवंताला वाहणे आणि त्याच्याशी संपूणपणे एकरुप होऊन जाणे यास आत्मनिवेदन असे म्हणतात, स्वरुपाशी तादात्म पावणे यामध्ये समाधानाची गुरुकिल्ली आहे. भक्त ज्ञानी बनतो. -23

195. आत्मनिवेदन सर्व भक्ति श्रेष्ठ आहे. ही साध्य नाही तर जन्म मरण चुकणाार नाही. ती आचरली तर सायुज्य मुक्ती मिळते. -26

## दशक पांचवा मंत्रांचा विचार 199 ते 206

## समास पहिला - गुरुनिश्चय 5/1

199. परमात्मस्वरुप सतशिष्याला रोखठोक मिळते. ते शिष्यास अनुभवास येते, ते अतिशय गुढ व अत्यंत समाधान देणारे आहे. आणि शिष्य स्वत: ते बनतो. -4

200. आत्मज्ञान सद्गरुवाचून प्राप्त होत नाही. तो पर्यंत जन्ममृत्यू चुकत नाहीत. दु:ख मात्र भोगावे लागेल. ब्रह्मज्ञानी सतपुरुष सद्स्वरुपास पोहोचू शकतात. -20

201. भगवंताचे दर्शन असे व्हावे वाटत असेल त्यांनी संताची संगत धरावी संत हाच सद्गुरु होऊ शकतो. - 23

202. काही लोक कर्म कांड, तीर्थ यात्रा करतात, स्तवन कीर्तन करतात. एक लाख लिंगाची पूजा करतात. त्याने भगवंताचे दर्शन होत नाही. - 30

203. सद्गुरुची कृपा झालेखेरीज आत्मज्ञान होत नाही. यम यातना चुमत नाहीत. प्रत्यक्ष योगाच्या अभ्यासाने नाही. -34

204. जोपर्यत ब्रह्मज्ञान होत नाही तोपर्यंत ध्यान, धारणा मुद्रा, भक्ति, भाव आणि भजनव्यर्थ होय.प्रपंचात काय आणि परमार्थात काय विवेक आणि ज्ञान यानांच खरी किंमत आहे. -36

205. ज्याप्रमाणे डोळ्यांत अंजन घालताच गुप्त धन दिसते तसे सद्गुरुच्या उपदेशाने ज्ञानदृष्टी येते. -38

206. श्रीराम, श्री कृष्ण अवतार पुरुषांनी मनापासून गुरु सेवा केली, सद्गुरुवाचून कल्यांतीमोक्ष नाही. -44

## दशक पांचवा मंत्रांचा विचार 207 ते 218

## समास दुसरा - गुरुनिश्चय 5/2

207.जो आत्मज्ञानी असतो व तो ज्ञान आपणास देतो तो खरा गुरु होय. काही सामान्य लोक चमत्कार करणारास साधू, गुरु ज्ञानी समजतात हा गैरसमज आहे. भारतीयास मोठा शाप आहे. -3

208.जो ब्रह्मज्ञाचा उपदेश करतो, अज्ञान नाहीसे करतो व परत्माम्याशी ऐक्य करतो तो खरा सद्गुरु होय. त्यांच्या इतर करामती असतील तरच सद्गुरु असे. नसतील तर तो सद्गुरु नसे. -9

209. लोकांना मायेच्या जबड्यांतून, दु:खातून सोडवतो तो सद्गुरु होय, देहबुध्दीमुळे लोकांना त्यातून बाहेर पडता येत नाही त्याना अविद्येपासून सोडवितो तो सद्गुरु होय. -12

210. अविद्येमुळे वासना निर्माण होते, कर्म भोगण्यासाठी जन्म घ्यावा लागतो. टाळण्याचे मोठे काम सद्गुरु करतो. -14

211. केवळ उपदेशाने सद्गुरु जीवाला प्रत्यक्ष ब्रह्मरुप बनवितो, त्याचे संसाराचे संकट नाहीसे करतो. त्याच्या शब्दांना मोल असते. शब्द जीवाच्या शरीरात

घुसतात व अंतरंगात बदल घडवून आणतात. त्यांच्या शब्दांनी शक्तिपात होतात. -16

212. जो आदराने स्वधर्माचे आचरण करतो, वेदाचे विरुध्द आत्मज्ञानाला सोडणारे मिथ्या भाषण, तयाला माहित नसते सर्वांचे संशय मुळासकट सद्‌गुरु नष्ट करतात. -19

213. सद्‌गुरुची मुक्तावस्था ही आत्मज्ञानातून प्रकट होणारी अति मानवी अवस्था असते. वासनेच्या अधीन होऊन बेशरमपणें इंद्रियभोग भोगण्याची हीनमानव पशुवृत्ती नसते. -20


214. इंद्रिय सुख घेण्यासाठी जग धडपडते परंतु ते खरे नाही. असे मनाला पटवून इंद्रियांना आवर घालण्याची शक्ति व युक्ति शिकवण्याचे प्रधान कार्य सद्‌गुरु करतात. -22

215. वासनेनी वेडी झालेले अनेक ज्ञानी माणसे परमार्थ न साधता फुटक गेली. इच्छा तृप्तीसाठी मूर्ख बिचारे मरुन गेली. ज्याला कशाचीही यत्किंचत वासना नाही असे संत वेगळेच असतात ते नेहमी शाश्वत अक्षय भगतंताबद्दलच बोलतात.-38

216.भगवंत सर्वाचा कधी नाहिसा होणारा ठेवा आहे. देहाची सुखाची ललसा संपत नाही. त्यामुळे भगवंताचा मार्ग बरोबर सांपडत नाही. दृश्य सुखांत अडकल्याने अदृश्यास भगवंताचे सुखसापडत नाही ते समजण्यास सद्‌गुरुखेरीज मार्ग नाही. -39

217. वासना दु:ख निर्माण करते तरी वासना ठेवाचीच झाली तर ती भगवंताच्या दर्शनाची ठेवावी. - 42

218. ज्ञानाला व्यवहाराची जोड फार अवश्य आहे सद्‌गुरु अनेकाचे पालनपोषण काळजी घेतात व आपल्या आचरणाची काळजी घेतात. -56



# दशक पांचवा विचार 219 ते 224

# समास तिसरा - शिष्यलक्षण 5/3

219. साधना, सद्‌गुरु, सतशिष्य, सत् कर्माचरण, सद्वासना स्वधर्माचरण सत्संग आणिनित्यनेमयामुळे आत्मज्ञानउदयपावते. -14

220. ज्यांनी संसारत दु:ख भोगले त्याच्याच अंगी परमार्थ बाणतो. त्याच्याच अंत:करणात वैराग्याचा उदय होतो. परमार्थावर विश्वास निर्माण होतो सद्‌गुरुवर श्रध्दा बसते. -36

221. सद्‌गुरु देवापेक्षा कोटीपटीने पूर्णपणे आधिक श्रेष्ठ आहे. त्याचे स्वरुप कल्पनातीत असते. ज्याच्यावर सद्‌गुरुची कृपा असते त्यास ब्रह्मज्ञान होते व त्याचेवर कोणची सत्ता चालत नाही. -47

222. सद्‌शिष्य मानवतेकडून देवत्वाकडे जातो, त्याचा सद्‌गुरुवर शुध्द अढळ श्रध्दाअसते, तो मोक्षाचा हक्कदार होतो. मोठा निर्मळ व पवित्र होतो. -53

223. इंद्रियासक्त माणसाला आत्मज्ञान पचत नाही. इंद्रियभोगामध्ये अडकलेल्या माणसास परमार्थ साधत नाही. भगवंत भक्त होऊ शकणार नाही. -68

224. याच्यां मनात बायका मुलाची चिंता असते अशा माणसात भगवंत भेटणे शक्य नाही. परंतु प्रपंच करावयास काहीच हरकत नाही. तो खुशाल करावा परंतु त्याबरोबरच थोडा परमार्थदेखील वाढवावा तो अगदीच बुडवावा हे काही योग्य नाही. - 103

# दशक पांचवा मंत्रांचाविचार 225 ते 229

# समास चवथा - उपदेश लक्षण 5/4

225. कर्ममार्ग, उपासनामार्ग, (पंतजली) आठ पायऱ्या व सहा चक्राचे भेदन हे परमार्थसाठी सांगतात.आठ पायऱ्या - यम, नियम, आसन, प्राणायाम, धारणा ध्यान आणि समाधी.

226. परमात्सासाठी कोणी सगुणाचा उपदेश करतात, कोणी निर्गुणाचे निरुपण करतात तर कोणी तीर्थाटन करावे असा उपदेश करतात. -26

227. आत्मज्ञानावाचून सर्व प्रकार व्यर्थ असतात. आत्मज्ञानासारखे दुसरे पवित्र नाही आधी आत्मज्ञान प्राप्त करुन घेतले पाहिजे. -32

228. माणूस कोणत्याही वर्णाचा असो त्याच्या अंगी जर आत्मज्ञान स्थिरावले असेल तर या जगांत परमेश्वर जन्मोजन्मी त्याचा दास होतो. ब्रह्मदेवास आत्मज्ञान कळत नाही. तेथे जीवात्म्याला न कळणे नवल नाही. -34

229. तीर्थयात्रा, स्नान, दात इत्यादी साधनाने पुष्कळ पुण्य मिळते. पण आत्मज्ञानाची पुण्याई या सर्वाहुन कोटी पटीने अधिक असते. -35

## दशक पांचवा विचार 230 ते 233

## समास पाचवा - बहुधाज्ञान ज्ञान निरुपण 5/5

230.जोपर्यंत सरळ, स्वच्छ, व निर्मळ आत्मज्ञान होत नाही तोपर्यंत इतर सर्व काही निरर्थक होते. आत्मज्ञान झाल्यावाचून मनाची तळमळ शांत होणार नाही. -1

231.विद्याज्ञान, संगात शास्त्राचे ज्ञान, वेदाचे अध्यापन हे ज्ञान नव्हे, माणसांची परीक्षा करतां येणे हे खरे ज्ञान नव्हे, त्यासाठी आत्मज्ञान पाहिजे. -6

232.चौसष्ट कला, गायन कला, चित्रकला, संगीत कला, नृत्यकला या सर्वकला, चौदा विद्या आणि सगळ्या सिध्दी हे ज्ञान नव्हे फक्त आत्मज्ञानच खरे ज्ञान. -31

# दशक पांचवा विचार 234 ते 247

## समास सहावा - शुध्दज्ञान निरुपण 5/6

234. मुख्य ईश्वरास ठरवावे, आपल्यामधील खरा मी तो आपले खरे स्वरुप ते ओळखावे. नित्य अनित्य निश्चित ठरवावे याला ज्ञान म्हणतात. खरा मी आत्मस्वरुप आहे. तेच ब्रह्म आहे. स्वरुप कायम टिकणारे आहे. -2

235. देहबुध्दीच्या तीन अवस्था ओलांडून तूर्या ही चौथी अवस्था सर्वसाक्षीची असते, म्हणून तिला आत्मज्ञान म्हणतात. परतू या अवस्थेमध्ये साक्षीत्वाने पदार्थ ज्ञान असते यासाठी ते पूर्ण ज्ञान होऊ शकत नाही. दृश्यरहित शुध्द स्वरुप जाणणें याचे नांव आत्मज्ञान.- 7

236. दृश्य ज्ञेयपणाने ज्ञात्याहून वेगळे राहते तेच व्दैत होय. आत्मज्ञान संपूर्ण अव्दैत असते. तूर्या आत्मज्ञान नव्हे. - 9

237. शुध्द परमात्मस्वरुप आहे तेंच आपण आहोत असा जो साक्षात अनुभव येतो त्याचे नांव शुध्द स्वरुप ज्ञान होय असे समजावे. -10

238. सर्वोत्तम ब्रह्म सर्वाचा आत्मा आहे. विश्वाचे मूळ आहे. अतिसूक्ष्म आहे आणि नित्य आहे, ते तू आहेस माझ्यातून सर्व व्यक्त दशेस येते, माझ्यामध्ये जगते आणि माझ्यातच लय होते. ते अव्दयब्रह्म मीच आहे आपण परमात्म स्वरुप आहोत. -13

239. मुळ स्वरुपातून विश्व व्यक्त होते व पुन्हा त्याच स्वरुपात लय पावते या आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले की अज्ञान जाते भ्रम, बध्दता जाते. -16

240. अज्ञानाचा मल नसलेले अगदी शुध्द आत्मस्वरुप या दृश्य चराचराचे मूळ आहे. असा प्रत्यक्ष अनुभव येऊन जे ज्ञान होते त्यास वेदांतामध्ये शुध्द ज्ञान असे म्हणतात. -18

241.आपल्यातील खरा मी कोण आहे याचा शोध करु जाता आत्मज्ञान होते. आत्मा सर्वव्यापी असल्याने आपण आत्मज्ञानेमुळे सर्वज्ञ बनतो. सर्वत्र मित्र व्यापून आहे. “मी” देहबुध्दी जाते. -20

242. मोठे मोठे सिध्द, मुनी आणि महान अनुभवी या सर्वांच्या अंतरंगाची जी अवस्था म्हणजे आत्मज्ञान. ज्या ज्ञानाच्या आनंदाने महादेव निरंतर डोलत असतो. -26

243.आत्मज्ञान वेदशास्त्राचे तात्पर्य आहे. जे योग्य प्रमाणांनी निश्चित केलेला निर्णय आहे. जे साक्षांत अनुभवाला येते. जे सूक्ष्म विचाराने योग्य ठरते, आत्मज्ञान श्रध्दावंताना, भाग्यवंताना साधुसंताना, सज्जनांना प्राप्त होते. -28

244. मी देहच आहे भ्रम होतो. या भ्रमातून सुटण्यासाठी एक उपाय करावा. आपण एकांतांत बसावे, स्वस्वरुपाने लीन व्हावे, तेथे विसावा घ्यावा हा अभ्यास करीत गेल्याने परमार्थ स्थिर होतो. आत्मज्ञानाचा उत्कर्ष होतो. -58

245. परमार्थाचे अखंड श्रवण, मनन केल्याने समाधान मिळते अज्ञान जावून वैराग्य येते, वासना राहत नाहीत, इंद्रिय भोगाचा विट येतो मन विरस होते, आत्मज्ञान होते. - 61

246. इंद्रिय भोगासाठी आपण आत्मज्ञान गमावतो, अविद्येमुळे भ्रम होतो तो नाहीसे होण्यास ज्ञान हाच उपाय आहे. अविद्या सोडावी व सद्विद्या धरावी. -64

247. अविद्या झोप आहे. त्यामुळे मिथ्या दृष्य दिसते व मनुष्य घाबरतो. दृश्य मिथ्या आहे पटते, विरक्ती येते त्यालाचा जागेपण म्हणतात. -67

## दशक पाचवा विचार -247 ते 251

## समास सातवा बध्दलक्षण - 5/7

248. बध्दाचे लक्षण - सारासार विचार व स्वधर्म न कळणे, भूतदर्या नसणे, भक्ति, ज्ञान, वैराग्य ध्यान, मोक्ष, साधन, देव, संत कळत नाही. -12

249. बध्दाला मी कोण हे ज्ञान असत नाही. आत्मज्ञानाचा अभाव असतो. तीर्थ, व्रत, दान आणि पुण्य त्याच्याकडे नसते. -18

250. ज्याच्या मनात परमार्थाबद्दल अनादर असतो व प्रपंचाबद्दल अति आदर असतो. निंदा, झोप, अधर्म ज्याच्या ठिकाणी असतो तो बध्द असतो. -27

251. जो सदासर्वकाळ द्रव्याचे चिंतन करतो, स्त्रीचे ध्यान करतो, जो तीर्थ, यात्रा, दान, पूजा ध्यान करत नाही तो बध्द असतो. -47

## दशक -पाचवा विचार 252 ते 254

## समास आठवा - मुमुक्ष लक्षण 5/8

252. आपण लोकांस फसविणे, निंदा करणे, थापा मारणे, खोटया मार्गाने पैसे मिळविणे याचा ज्यास खरा पश्चाताप झालेला आहे जो उपदेशाने आत बाहेर बदलेला आहे त्यास मुमुक्ष म्हणतात. -23

253. जो मनापासून पुण्यमार्ग आचरण्याचे ठरवितो. सत्संगाची इच्छा करतो, आणि जो संसाराबद्दल विरक्त होतो तो मुमुक्ष होय. -26

254. जो अहंभाव दूर ठेवतो. प्रापंचिक स्वार्थ सोडतो, परमार्थाची उत्कट इच्छा करतो. संत होण्याची इच्छा करतो तो मुमुक्ष असतो. -43

# दशक पांचवा विचार 255 ते 261

## समास नववा - साधक निरुपण 5/9

255. ज्याला परमार्थ ऐकण्याची आवड असते. आत्मज्ञान स्थिर होण्यासाठी साधन करतो. तेच तू आहेस याची गोडी असते. चिंतन मनन करुन जो गुढ व खरा अर्थ बरोबर समजतो तो साधक असतो. -5

256.मी देहच आहे ही मिथ्या भावना, विवकाने बाजूस सारतो, मी आत्माच आहे ही सत्य भावना दृढपणे धरण्याचा अभ्यास करतो. निरंतर श्रवण मनन करतो तो साधक असतो. -8

257. जो कोणत्याही मार्गाने वृत्तीचा निरोध साधतो. प्राण व अपान एकवटतो, श्वासावर प्रणवा जपतो. सुषुम्ना खुली करतो, मन हृदयकाशात कोंडतो. धारणेच्या बळाने प्रणवाच्या तीन मात्रा अर्थ मात्रेत बिलील करतो आणि देहासकट कोणत्याही दृश्याशी आपलेपणा न ठेवता जो राहतो. तो साधक असतो. -22

258. विवेकाच्या सामर्थ्याने जो मीपणाने अंतर्धान पावतो. अभिमान मावळतो. जो देहाभिमान मागे टाकतो. स्वत: आपला मी खरा शोधून काढतो. दृष्टा असून सर्व दृश्याचा साक्षी आहे हे देखील ज्याचे सुटते तो साधक असतो. -36

259. जो कामवासनेतून सुटतो, लोक लाजेला पराभूत करतो. क्रोधापासून लांब राहतो. मद व मत्सर टाकून देतो. वैराग्याच्या जोरावर परमार्थ खूप वाढवतो. तो साधक असतो. -36

260. जो प्रपंच्यातून निसटतो, आपल्या विकल्पाचा वध करतो भवसागर मारुन टाकतो. पंचमहाभूतामध्ये आपसांत असणारा विरोध तो नाहीसा करुन टाकतो तोच साधक होय. -40

261. साधक मोहाला उभा चिरतो, दु:खाचे दोन तुकडे करतो, शोकाचे तुकडे करुन बाजूला फेकून देतो. मोह, दु:ख आणि शोक याना संपूर्ण नाहीसे करतो, तो आत्मज्ञानी होतो. -45

## दशक पांचवा विचार 262 ते 266

## समास दहावा - सिध्दलक्षण निरुपण 5/10

262. सिध्दपुरुष स्वत: संपुर्णपणे ब्रह्मरुप होतो. त्याचे सर्व संशय नाश पावतात. “मी परमात्मस्वरुप आहे अगदी नि:संशयपणे त्या वाटते. -10

## दशक सहावा देवशोधन विचार 267 ते 271

## समास पहिला - देवशोधन 6/1

267. जो शहाणा आहे त्याने जेथे रहावयाचे तेथे वरीष्टांस भेटावे असे केल्याने प्रपंचांत त्रास होत नाही व ब्रह्मांडनायकाची भेट घेतल्यावाचून जीवन सुखमय होणे शक्य नाही हे लक्षात ठेवावे. -7

268.प्रत्येकाने खरा देव ओळखावा व आपल्या जन्माचे सार्थक करुन घ्यावे. देव कसा ओळखावा हे कळत नसेल तर संताची संगत धरावी. -15

269. जो देहाने लोकांत वावरतो परंतु लोकांना दिसत नाही अशा दृश्याच्या अतीत असणाऱ्या स्वरुपाबद्दल सारखे सांगतो, जो आत्मज्ञानी असतो तोच खरा साधु संत होय. -19

270. पोट भरण्याच्या विद्याला आत्मविद्या म्हणू नये, सर्व व्यापक परमात्मा ज्या अनुभवाने प्राप्त होते ते खरे आत्मज्ञान. त्यासाठी आत्मज्ञानी संताकडेच जावयास पाहिजे. -24

271. देहबुध्दीच्या माणसाकडून देहबुध्दीचा माणूस विदेही होऊ शकत नाही. त्यासाठी आत्मज्ञानी शोधून काढावा. -30

## दशक सहावा विचार 272 ते 278

## समास दुसरा-ब्रह्मपावन निरुपण 6/2

272. धान्य काढून टाकलेले भूस खाता येत नाही. तसे ज्या उपदेशात ब्रह्मज्ञान नाही त्याला अर्थ नाही. -2

273. पंचमहाभूतापासून झालेले सर्व नाशवंत आहे. ज्याच्यामध्ये फरक पडत नाही, नाशवंत नाही ते गुणातीत ब्रह्म होय. -8

274. जे जे रुप आणि नाम आहे ते ते सगळे भ्रमरुप आहे. नामरुपाचे पलिकडे असणारे ते परमात्मस्वरुप रहस्य आहे ते स्वानुभवाने ओळखावे. -13

275. अध्यात्म श्रवणाने परब्रह्म प्राप्त होते. जितके गांव तितके देव परंतु खरा देव निर्गुण आहे असा अनुभव येतो म्हणजे मग आपणच आपल्या अंतर्यामी स्वत:चा शोध करावा. -28

276. आपले शरीर पंचमहाभूताचे नाशवंत गाठोडे आहे. शेवटी निरंतर टिकणारा आत्मा ठरतो. -33

277. श्रवण, मनन, निरिध्यास याने साक्षात्कार होतो. आत्मज्ञाने जीव ब्रहारुप होते. ज्ञानी व अज्ञानीची जीवतयात्रा प्रारब्धाने चालते. ज्ञानी आपला देह प्रारब्धाच्या स्वाधीन करतो. -42

278. संताच्या संगतीने मुख्य देवाची ओळख होते. देव व भक्त एकरुप होतात. संसारातील दु:ख विराम पावते. -45

## दशक सहावा विचार 279 ते 281

## समास तिसरा - मायोद्भव निरुपण 6/3

279. देहाहंता किंवा मिथ्या मी (अहंकार) विराम पावून जे उरते ते निर्गुण ब्रह्म होय. हेच आत्म समर्पणाचे रहस्य होय. व्दैत उरत नाही. -24

280. मीपणा आणि तत्वे याचा निरास झाला की मीपण जाते, निर्गुण आत्मा तेवढा शिल्लक उरतो त्याठिकाणी "सो हं (मी तोच आहे) अशा आत्मा निवेदनाचा साक्षात् अनुभव येतो. देव व भक्त एकरुप बनतात. -32

281. जीव विनाशी तत्वाने गुरफटलेला असतो. संशय, चक्रांत अडकतो, स्वरुप विसरतो. 'मी कोण आहे' असे स्वत:स विचारतो. विवेकाने मी तोच आहे समजतो. एकरूप होतो. आत्मज्ञानी होतो. -35

## दशक सहावा विचार 282 ते 284

## समास चवथा - ब्रह्म निरुपण 6/4

282.परब्रह्माची स्थिती पालटत नाही. काळास वास्तव्य नाही. परब्रह्म खंडत नाही अखंड राहते. त्याचे वर्णन करता येत नाही, त्याची स्थिती कोण सांगणार ? -6

283. जे दिसते ते सर्व नाशते. उपासनेचा प्रत्येकास त्याचा अभिमान लागतो खरा देव भक्त साधु पुरुषच सांगू शकणार. -12

284. नाम, रुप, स्थल, काळ, आकार या सर्व माणसाच्या बुध्दीच्या कल्पना आहेत. सर्वांचा प्रलयकाळात नाश होतो. परब्रह्म राहते. त्यात फरक पडत नाही. -23

## दशक सहावा विचार 285 ते 287

## समास पांचवा माया ब्रह्म निरुपण 6/5

285. माय सगुण, साकार, चंचल भासते, निर्माण होते. नाश पावते, जन्मते, मरते, विनाशी, पंचमहाभुतात्मक इंद्रियस्थ असत् असते. -16

286.ब्रह्म ध्यानाचा विषय होत नाही माया ध्यानाचा विषय होऊ शकते. ब्रह्म तर्काचे पलीकडे तर माया पुराव्याने सिध्द होऊ शकते. -15

287. आकाशचे प्रतिबिंब पाण्यांत पडले तरी ते अलिप्त असते तसाच परमात्मा सर्वात व्यापून अलिप्त असतो. माया व ब्रह्म एकमेकापासून वेगळे केले तर जन्म मरण चुकते. संतास शरण गेल्याने मोक्ष मिळतो. -25

## दशक सहावा विचार 288 ते 292

## समास सहावा -सृष्टिकथन 6/6

288. सर्व वृक्षामध्ये पिंपळ माझी विभूति आहे असे श्रीकृष्ण सांगतात. परंतु पिंपळ तत्काळ तोडला जातो. अग्नीने जाळला जातो, याचा खुलासा संतजन करतात. -22

289. अज्ञानी दृश्य जगात रमतात. त्या जगातील दृश्य वस्तु घेऊनच परमात्म चिंतन करावे असे श्रीकृष्ण दाखवितात. देहबुध्दीने केलेला वाद उपयोगी पडत नाही. -25

290. वादविवादाचे नादी लागू नये. त्यासाठी संवाद करावा. कल्पना ही एक मोठी शक्ती आहे. ती योग्य प्रकारे वापरली तर स्वरुपापर्यंत जाता येते. केवळ कल्पनेचा पाया असलेला विश्वाचा खरेपणा नाही. -31

292. सगुणाचे आधाराने निर्गुणापर्यंत पोहचता येते. त्यासाठी सारासार विचार व सत्संग ही दोन्ही असली पाहिजे म्हणजे तो आत्मज्ञानी होऊ शकतो.

## दशक सहावा विचार 293 ते 300

## समास सातवा सगुण भजन

293. ज्ञानी आणि अज्ञानी याच्या देहाचे हालचाली, जीवन सारखेच असते. दोघाची सगुण भक्ती असते. ज्ञानींच्या भजनात भ्रम, भीती, अपेक्षा नसते. अज्ञानीच्या भजनात भीती, प्रपंचाच्या अपेक्षा व भिती असते. -15

294. माझे दैवत श्रीरामचंद्र आहे. त्याचे कृपेने माझा परमार्थ चालतो. तो समर्थांचा देखील समर्थ आहे असे श्री रामदास म्हणतात. -21

295. रघुवीराचा मी सेवक आहे. त्याची सेवा केल्यामुळे देहबुध्दी जावून मला आत्मज्ञान झाले. हे माझे सांगणे खरे आहे. पण त्यावर तू विश्वास ठेवला नाहीस तर तूझा अध:पात होणार, असे समर्थ रामदास म्हणतात. -22

296. मला समजते हे परमार्थामध्ये अति बाधक आहे सद्‍गुरुवर पुर्ण विश्वास ठेवावा. मी ज्ञानी समजणे हे आत्मज्ञान नाही तो देहाभिमान आहे. -25

297. श्री रामचंद्राची उपासना करा. सगुण उपासनेतून अत्यंत सत्य आणि शाश्वत आत्मज्ञान प्राप्त होते. सगुण ईश्वर भक्ताचा सांभाळ करतो असा अनुभव येईल. -29

298. कोणत्याही कर्माचे कर्तेपण जो अगदी मनापासून भगवंताकडे सोपवतो त्याच्या जीवनात ईश्वर कल्पनेच्या बाहेर गोष्टी घडवून आणतो असा प्रत्यक्ष अनुभव आहे असे समर्थ म्हणतात. -33

299. कर्ता राम आहे, देहबुध्दी सुटलेला पुरुष ज्ञान मार्गाचा अधिकारी असतो. अंतर्यामी निर्गुण आत्मस्वरुपाचे अनुसंधात राखता राखता तो स्वस्वरुपाशी समरस होतो. ईश्वरभक्ति त्याचेकडून मोठे कार्य करवून घेते. -34

300.विश्वामध्ये भगवंताची प्रचंड शक्ति काम करते. त्या शक्ति कृपेने आपण जगतो, भोग भोगतो हे नित्य ध्यानांत ठेवून जीवन जगणे हे भगवंताच्या उपासनेचे वर्म आहे. -39

# दशक सहावा विचार 301 ते 304

## समास आठवा - दृश्य निरसन 6/8

301. हरणांना मृगजळ दिसते. आरशांत प्रतिबिंब दिसते. अनंत नामरुपानी नटलेली सृष्टी मिथ्या आहे. मूळचे एकच एक परमार्थ स्वरुप तेवढे खरे. दृश्य खरे. आपणास वाटते. ती अविद्या होय. -12

302. भगवंताची माया अगदी खऱ्याप्रमाणे दिसते. विचार केली की ती नाहीशी होते. सारखी दिसल्यामुळे खोटी असून खरी वाटते. -34

303. पाहणारा अविद्यामय व दृश्य देखील अविद्यामय असते म्हणून दृष्टयाचा दृश्यावर खरेपणा वाटतो आपला देह आंतबाहेर संपूर्ण अविद्या ने व्यापला आहे. - 40

304. इंद्रियाला जे दिसते, भासते ते कालांतराने नाश पावते, अविनाश परब्रह्म हे दृश्यापलीकडे राहते. परब्रह्म शाश्वत तर माया अशाश्वत असे अनेक शास्त्राने सांगितले. 48

# दशक सहावा विचार 305 ते 308

## समास नववा - सारशोधन

305. हृदयामध्ये जो खरा धर्म आहे त्याचा शोध शहाणे लोक घेतात. दृश्य साठविणे हा स्वार्थ खोटा तर अदृश्य “मी” पाहणे हा स्वार्थ खरा समजावा. ज्यांना सारासार विचार माहीत असतो त्याना दृश्याच्या अभ्यंतरीचे अनंतस्वरुप समजते. -2

306. ज्याच्यापाशी सारासार विचार असतो ते पुरुष राजाप्रमाणे स्वानंद सिंहासनावर चढून बसतात. ज्याच्यापाशी असा विचार नसतो ते दृश्याचे ओझे वाहात मरुन जातात. -8

307. असारातून सार कसे निवडावे,वेगळे करावे ही कला संताना ठावूक असते. ते खरे खोटे बरोबर निवडतात. -18

308. सारासार विवेकाने पाहता पाहता आत्मज्ञान लाभते जीव संसाराच्या बंधनातून सुटतो. तो जन्ममरणाच्या चक्रातून सुटतो व अगदी नि:संशय बनतो. -28

## दशक सहावा विचार 309 ते 313

## समास दहावा - अनिर्वाच्य 6/10

309."मी ब्रह्म आहे. मी सर्व साक्षी आहे" ही अखेरची स्थिती नव्हे जो याच्या पलीकडे लक्ष देतो तोच खरा स्थिर होय. - 14

310. मीपण संपूर्णपणे विरणे हाच परमात्मा- वस्तूच्या अनुभवाची खूण आहे. म्हणून समाधान शब्दानी सांगण्यासारखे नाही असे म्हणतात. - सांगणारा शिल्लक असेल तर समाधानाचे वर्णन सांगू शकेल. तोच संपूर्णपणे समाधान बनतो, वेगळेपणाचे वर्णन तो कसा करेल ? -17

311. शब्दाचा संबंध अधिक शरीराशी तर अर्थाचा संबंध अधिक मनाशी असतो. श्री समर्थ सांगतात वाच्यांश टाकावा लक्ष्यांश समजून घ्यावा आणि त्याचे स्वानुभवामध्ये रुपांतर करावे. -25

312. आहे व नाही याचे दृश्य विश्व लय पावते की शून्य उरते. त्या शूल्यापलीकडे शूध्द आत्मज्ञान असते. त्या ज्ञानाने समाधान होते आपण व आत्मा एकरुप आहोत या अनुभवाने सहजस्थिती प्राप्त होते या अवस्थेत देहाचे सर्व व्यवहार होतात, हे स्वरुपाशी झालेले ऐक्य राहते म्हणून ही सहज स्थिती होय. -39

313. स्वप्रांत स्वप्न पाहणे याचा अर्थ संसार होय, "मी आत्माच आहे हे जागेपण जावून "मी देहच आहे' हे स्वप्न होय. माझा संसार स्वप्नातले स्वप्न होय. या स्वप्नमय त्यांत तु सार व असार याचा विचार करावा. - 51

## दशक सातवा - चौदा ब्रह्मांचा विचार 314 ते 318

## समास पहिला - मंगलाचरण 7/1

314. ज्याच्या सत्तेने हे ऐवढे चराचर रचले गेले. ज्याच्या सत्तेने विश्वामधील सर्व घडामोडी घडून येतात तो खरा देव होय. तो कायमचा सर्वकर्ता या नात्याने ज्ञानी जाणतात. -17

315. देवाने पृथ्वी निर्माण केली. त्या पृथ्वीवर दगड निर्माण होतात, अज्ञानी, विवेकशून्य माणसे त्या दगडासच देव मानतात काय करावे ? ज्याने विश्व निर्माण केले तो विश्वाहून वेगळा आहे. त्याच्या पलीकडे आहे. यात संशय नाही. - 34

316. दृश्य विश्व मिथ्या नश्वर आहे आणि आत्मस्वरुप खरे शाश्वत आहे. त्याच्याही पलीकडे परमात्मा असतो. अंतरात्मा सर्वांना आंतबाहेर व्यापून असतो. -44

317. जीवामध्ये आत्मा चराचर विश्वाला आंत बाहेर व्यापून असतो. अंतरात्मा, विश्वापलीकडे असतो तो परमात्मा होय. शब्द आत्मा स्वरुपाला देव म्हणावे. याखेरीज बाकीचे व्यर्थ आहे. हेच वेदांताचे रहस्य आहे. - 49

318. मानवी कल्पना जेथे मागे फिरते त्या स्वरुपास भगवंत नांव आहे. त्या स्वरुपामध्ये देवपणाच्या कलपनेला स्थान नाही. परब्रह्माने केवळ आपल्या संकल्पाने विश्व निर्माण केले असेल तर कोण कर्ता असेल ? -56

## दशक सातवा विचार 319 ते 324

## समास दुसरा - ब्रह्मनिरुपण 7/2

319.ब्रह्म हे मानवी दृश्याविश्वा पलीकडे आहे असे साधु सांगतात ते गुणरहित, आकाररहित, विकार रहित, मर्यादा रहित, अढळ, अनंत, स्थिर, कल्पनारहित आहे. अति इंद्रिये असल्याने साधूच्या मार्गदर्शनाने अनुभवास येते. - 5

320. सद्‌गुरु कृपेमुळे आत्मज्ञान होते, व्दैत संपते देह बुध्दी जाते, ज्ञानाचा प्रकाश पडतो, भेदातील अभेदाचे साक्षात ज्ञात होते. -15

321. मनावाचून अनुभव घेता येत नाही, वासना न तृप्त करता समाधान मिळत नाही. परंतु हे स्वरुप साक्षत्कारामध्ये अनुभव व समाधान मिळते. तेथे मनाचा व वासनेचा संबंध येत नाही. -17

322. सगळ्या जीवाना ब्रह्म एकच एक आहे. सर्व आत्मज्ञानी परब्रह्मयेताच. देहबुध्दीचा अंत होताच परब्रह्म प्राप्त होते. -30

323. देह सर्वस्व आहे हेच देहबुध्दीचे मुख्य लक्षण आहे. शहाणे देहाचे खोटेपण, अशाश्वतपण ओळखतात. जीवन असे पर्यंत देहाचा मीपणाचा अभिमान असतो. तीच देहबुध्दी पुन्हा जन्म घ्यावयास लावते. -35

324.ब्रह्म नादरुप, ज्योतीरुप, चैतन्यरुप, सत्तारुप स्वस्वरुप, सनातन, शाश्वत, सर्वात्मा, साक्षीरुप सहत, सदोदित विशाल, विस्तीर्ण आदीपुरुष, आत्माराम सर्व नांवे असली तरी तो एकच एक परब्रह्म आहे.

## दशक सातवा विचार 325 ते 328

## समास तिसरा - चतुर्दश ब्रह्म निरुपण 7/3

325. चौदा ब्रह्मे - 1. शब्द 2. एकाक्षर 3. खंब्रम्ह 4. सर्व 5. चैतन्य 6. सत्ता 7. साक्ष 8. सगुण 9. निर्गुण 10. वाच्य 11. अनुभव 12. आनंद 13. तदाव्दार 14. अनिवाच्य असे आहेत. - 10

326. आनंदाची वृत्ती जेथे अनुभवास येते तेथे आनंद ब्रम्हच असते. संतानी तो घेतला असे व इतरांना घेता येऊ शकतो. सदा आनंदी राहणे. - 43

327. मन वृत्तीमय असते. मनाचा मनपणा गेला कीं निवृत्ती अनुभवास येते. उन्मयी अवस्था येते. त्यांत बंधन नाही मर्यादा नाही. यामध्येच योगी विश्रांती पावतात. -44

328. देहबुध्दीची कल्पना नाहींशी करण्यास निर्विकार ब्रह्मस्वरुपाची कल्पना करावी. अभ्यासाने कल्पना जातात. आपण मी पणाने नसून आत्मप्रणाने अनंत काळ राहतो. हे सद्‌गुरु कडून शिकावे व अनुभव घ्यावा. -42

## दशक सातवा विचार 329 ते 337

## समास चवथा - विमल ब्रह्निरुपण 7/4

329. समुद्रांतील माशांना पाणी ज्याप्रमाणे आंत बाहेर व्यापून असते त्याचप्रमाणे सर्व जीवांना ब्रह्त आंत बाहेर अखंडपणे व्यापून दिसते. -5

330.ब्रह्म आणि विश्व यांचा संबंध जसे आकाशांत ढग येतात आणि जातात परंतु आकाश मलिन होत नाही. आकाश सदा सर्वकाय निर्मळच असते. -17

331. पृथ्वीपेक्षा पाणी सुक्ष्म, पाण्यापेक्षा तेज सुक्ष्म, तेजापेक्षा वायु सुक्ष्म, वायुपेक्षा आकाश सुक्ष्म, आकाशापेक्षा ब्रह्म संपूर्णपणे सुक्ष्म असते त्याचे ज्ञान होण्यांकरिता जीव सुक्ष्म झाला पाहिजे. त्याच वेळी त्याला ब्रह्मज्ञान होते. -29

332. आपण ब्रह्मामध्येंच जगतो व राहतो आपल्या आंत बाहेर तेच व्यापून असते. अवकाशातील सारे दृश्यविश्व विलीन केल्यावर जे केवळ निखळ आकाश उरतें तसे ब्रह्म आहे ही गोष्ट खुणेने समजावी. -35

333. पदार्थ आपण पाहतो तो दृष्टीस पडण्याच्या अगोदर मध्ये ब्रह्म असते एरवी स्थूल दृष्टीस ते दिसत नाही हे स्वानुभवाने जाणावे. दृष्टी सुक्ष्म होतात आंत बाहेरचे ब्रह्म समजते व त्यातील गुढ उरत नाही. -37

334.सर्व इंद्रिया आंत बाहेर ब्रह्म असते.ब्रह्मामध्येच सर्व इंद्रिये काम करतात. तरी ते इंद्रियास गम्य नाहींत. ब्रह्म अतींद्रिय असल्याने इंद्रियाची गति तेथे खुंटते. -45

335. ज्ञानदृष्टी सुक्ष्म तर इंद्रिय दृष्टी स्थूल असते ज्ञानाने ब्रह्म जाणता येते. इंद्रियाकडून शक्य नसते. - 48

336. मी आत्मा सर्व दृश्याच्या अतीत आहे, मी त्याचा केवळ साक्षीदार आहे. साक्षत्व मावळून ती वृत्ती विलीन होते. संपूर्ण अवस्था या निवृत्ति अवस्थेमये सर्व जाणतेपण विरतो तेच विज्ञान होय. - 50

337. प्रथम अज्ञान जावून ज्ञान उदय पावते, पुढे ज्ञान नाहीसे होऊन विज्ञान येते, अखेर विज्ञान परब्रह्मांत जिरते मग शुध्द व निर्मळ परब्रह्म तेवढे उरते. - 50

## दशक सातवा विचार 338 ते 346

## समास पांचवा - व्देत कल्पना निरसन 7/5

338.मन संकल्प व विकल्प करते. जेव्हां ते ब्रह्मची करते तो खरी असते. तो संकल्प जेव्हां ते मायेची करते तो खोटी असतो. विकल्प ब्रह्म आणि माया या व्दैताचा घोटाळा मनच करते. -4

339. मनाचा व्दैताचा अनुभव येतो, तेच उन्मत झाले की व्दैत नाहिसे होऊन व अव्दैत राहते. व मनाचे चिंतन थांबते. -12

340. ज्या वृत्तीला, कल्पनेला स्थान नाही ते खरे ब्रह्मज्ञान तेच संपूर्ण समाधान होय. ते प्राप्त झाले म्हणजे माया व ब्रह्माचे चिंतन थांबते. -14

341. शुध्द ब्रह्म मन व बुध्दि याच्या आटोक्याबाहेरचे आहे ते कल्पनेपलीकडेच आहे. त्याचा साक्षात अनुभव घेतला व्दैत शिल्लक राहत नाही. -16

342. कल्पना मायाचे निवारण व ब्रह्माला थारा देते. कल्पना संशय निर्माण व नाहीसे करते. वाईट कल्पना देहबुध्दी पोसतात मन आकुंचित करतात. तर चांगल्या कल्पना आत्मबुध्दि पोसतात मन मोठे विशाल संतासारखे करतात. - 18

343. कल्पनाच व्दैत जन्मास घालते, खरोखर ज्ञान देखील कल्पनाआहे मी बध्द अथवा मुकत हे कल्पना अनुभवास येते. -20

344. अद्दश्यांत (श्रवण,मनन,निजध्यास) धावंणारी कल्पना, शुध्द कल्पना होय. अशुध्द (देहबुध्दीची) कल्पना नष्ट करावी. विश्वरचनेची मूळ कल्पनाच आहे. तो उपटून काढा. ब्रह्मप्राप्ती होईल. -26

345. शुध्द कल्पना (श्रवण, मनन, निजध्यास) स्वत: निर्गुणांत स्थिर राहते, स्वस्वरुपाचे विस्मरण न होता अखंड, अतूट, अनुसंधान किंवा स्मरण हीच शुध्द कल्पना होय. -33

346. एक ब्रह्म असे सत्य असा निश्चय ही शुध्द कल्पना व अशुध्द म्हणजे द्दश्याची खोटी कल्पना होय, हे पटले की आत्म स्वस्वरुपाशी तद्रूप होऊन साक्षात्कार होतो. -40

## दशक सातवा विचार 347 ते 351

## समास सहवा - बध्दमुक्त निरुपण 7/6

347. मुक्त, नित्यमुक्त, जीवन मुक्त व विदेह मुक्त असतात. जे नित्यमुक्त असतात ते अवतारी संत होत. -46

348. परमार्थामध्ये स्वरुपाच्या अनुभवाला परमोच्च स्थान आहे बाकी सर्व निरर्थक असतात म्हणून आपण स्वत: स्वरुपानुव घ्यावा आणि समाधान पावावे. -48

349. जेथे देहाचे भान असते तेथे बध्द आणि मुक्त भेद आठवतो. जो पर्यत अंतकरणांत देहबुध्दी असते तो पर्यंत ब्रह्मदीक देवसुध्दा मुकत होऊ शकत नाही. -51

350. मीपणापासून जो संपूर्णपणे मोकळा होतो तोच फक्त मुक्तदशेला पोहचतो. त्याने मौन ठेवले काय किंवा संभाषण केले काय तो मुक्तच असतो. -54

351. मीपण खरे बंधनाला कारण आहे. जो धरतो त्याला ते बाधते,व त्यालाच बंधनात टाकते. ज्ञानी मुक्तच असतो. -58

## दशक सातवा विचार 352 ते 358

## समास सातवा साधन प्रतिष्ठा निरुपण 7/7

352. मनाला जशी संवय लावावी तशी लागते. ब्रह्मचिंतनाची सवय लावल्यास ब्रह्मसाक्षात्कार होतो. त्याच्या जोडीला नित्यानित्याविचार ठेवला तर समाधान मिळते. - दृश्यचिंतन सोडून ब्रह्मचिंतन करावे हा राजमार्ग. - 15

353.परब्रह्म स्मरण करण्यासाठी, स्वत:स विसरावे लागते ते आठवणे व विसरणे हे देहबुध्दी मनाचे व्यापार आहेत. वृत्ती आहेत ते निवृत्त व्हावे लागते. - 19

354. मीपणामुळे परमात्मा कळत नाही, साक्षात्कार नाही आणि भक्ति ही नाहीशी होते. भगवंताचे इच्र्छेमध्ये आपली इच्छा मिसळणे हे भक्तिचे वर्म आहे. मीपणा आला की वासना येते व जीव बध्द होतात. -46

355. जो मीपण सोडतो तो समाधानी असतो. त्यासाठी विवेकाची गरज असते, निर्वासनेची गरज असतेब्रह्मनुभवासाठी समरसतेची गरज असते. -55

356.ब्रह्मरुपामध्ये कल्पनेला स्थान नाही तो नाहीसे करतो तोच खरा साधु होय. - 55

357. ज्या ब्रह्मस्वरुपाची आपण कल्पना करावयाची ते स्वरूपच जर आपण स्वत: झालो तर कल्पना आपोआप शून्य होते. -58

358. देहबुध्दी सोडण्याचा अभ्यास करणारास विद्या मिळते. अभ्यासाने किंवा साधनेतूनच मुळ ब्रह्म मिळते. -72

## दशक सातवा विचार 359 ते 364

## समास आठवा (अ) श्रवणनिरुपण 7/8

359. परमार्थाचे साधन श्रवण होय. त्याने समाधान मिळते श्रवणाने भक्ति स्वाधीन होते. विरक्ती उत्पन्न होते. दृश्याची आसक्ति सुटते, चित्तशुध्द होते. बुध्दिला स्थिरता येते आणि अभिमानाची उपाधी नाहीसे होते. -3

360. श्रवणाने निश्चय शक्ति येते, माझेपणा नाहीसा होतो आणि मनाला समाधान मिळते. श्रवणाने शंका फिरतात, संशय नाहींसे होतात, देहबुध्दी जाते समाधी साध्य होते. -8

361. सर्व जीवाचे वस्तीस्थान परब्रह्म एकच आहे. सर्व जीवांना मुख्य सारभूत साधन श्रवण आहे. ते सर्व भाषांत आहे. सोपे आहे, उपयोगी आहे. 31

362. श्रवणाने वैराग्याची पूर्वी चिन्हे उमटतात. त्यामुळे बध्द असतात ते मुमुक्षु बनतात. साधक होता, सिध्द होतात. -33

363. श्रवणाने जे स्वभावात:च दुष्ट असतात ते पुण्यशील होतात. हा तात्काळ येणारा अनुभव आहे. भाग्य उदयास येते साक्षात्कार होतो. -38

364. श्रवणाने परमार्थाचे अस्तित्व सांपडते, नित्य श्रवणाने साधन होते. साधना होते. पुन्हा पून्हा श्रवण व मनन करणे अवश्य आहे. संसार सागर तरुन जाता येते. -46

## दशक सातवा विचार 365 ते 370

## समास नववा (ब) श्रवण निरुपण 7/9

365. ज्या ग्रंथाने संशय नाहीसे होतात, शंका निरसन होतात असेच अव्दैत ग्रंथ श्रवण करावे, भ्रमात्मक व हानिकारक वक्तृत्व सोडून द्यावे. जगाची आसक्ति सोडून आत्मानात्म विवेकाचा अभ्यास करावा. -7

366. आत्मज्ञानी पुरुषाला सारासार विचाराचीच खरी आवड असते. ज्याला ज्याची आवड तेच देण्यांत मौज असते. आत्मज्ञानीस इतर ग्रंथ आवडत नाहीत. -12

367. आत्मज्ञानासाठी अव्दैत ग्रंथाचे परिशीलन करावे, साधकाने निवांत स्थानी जावे. एकाग्र मनाने अव्दैत ग्रंथ अभ्यासावे असे केल्याने त्याचे समाधान होईल. -27

368. जो वाचला असता परमार्थ वाढतो. मन शुध्द होते, भक्तीची साधना होते. जो ऐकला असता मनाचा अभिमान जातो, भ्रम जातो. तोच खरा ग्रंथ होय. -31

369. ज्यामध्ये वृत्त वैकल्ये व त्याची फळे सांगितलेली आहेत परंतु तो अभ्यासाने विरक्ती होत नाही. भक्तिकडे मन लागत नाही तो खरा ग्रंथ नाही. -35

370. मूर्खास नाद आवडतो. निंदकास दुसऱ्याचे उणे आवडते. पापी माणसास दुसऱ्याचे वाईट आवडते, थट्टेखोरास विनोद आवडतो. -52

## दशक सातवा विचार 371 ते 379

## समास दहावा - देहान्त निरुपण 7/10

371. अंतरी सत्य असून ते नाहीसे होते. दृश्य पाहून मनांतील सत्य स्वरुप झाकून जाते हा मायेचा परिणाम संत संगतीत श्रवण मनन केल्याने ध्यानांत येतो. -6

372. स्वस्वरुपामुळे मनाचे समाधान होते. चित्त चैतन्याशी समरस होते. खरा मी समजतो. ज्ञानी पुरुष आपला देह प्रारब्धावर सोडतो. आत्मज्ञानाचे संशय नाश पावतात. देहाचे खोटेपण समजते. सुखदु:ख समान वाटते. - 9

373. साधुसंत राहिल्याने तीर्थाचे महत्तव वाढते पुण्य नगरीच्या नदीकाठी आपला देह पडणे म्हणजे आपणास मुक्ती मिळते. असे अज्ञानी विचार करतात. -12

374. देहाला मृत्यू येण्यास उत्तरायण उत्तम तर दक्षिणाय काळ अधर्म असे हा भ्रम आहे. साधू संताना दोन्ही सरळ वाटतात त्यांना भय नसते. त्यांना ज्यावेळी देह ठेवतो तो पुण्य काळ वाटतो. -13

375. जन्मभर कसेही वागून अंतकाळी फक्त भगवंताचे स्मरण केल्याने भगवंत भेटतो असे अज्ञानी लोक चुकीचे मानतात. आपलेच मत खरे समजून आपली फसवणूक करतात. माणसाने जिवंतपणी भक्ति केली तर तो पवित्र होतो. -19

376. भगवंताची भक्ति नाही. केली. तो अंतकाळी पावत होत नाही, जरी सुखचे मरण आले तरी तो वाईट गतीला जातो. -23

377. जो साधक संताना शरण जातो तो संतपणास पोहचतो, दयावंत होऊन इतरास मार्गदर्शन करतो. -35

378. सद्‌गुरुची भक्ति, सदैव आत्मानात्मा विवार व आचरण करतो, त्यास शुध्द त्रयीने ब्रह्मपद मिळते. -37

379. सद्‌गुरु भक्तिवाचून मोक्ष देणारे दुसरे साधन नाही. हेच श्री शंकराने पार्वतीस गुरुगीतेत सांगितलेले आहे. -44

## दशक आठवा मायोभ्दवनाय ज्ञानदर्शक

## समास पहिला देवदर्शन 8/1

380. अहंपणामुळे देव समजत नाही. ज्याच्या सत्तेने सर्व चराचर रचले गेले, ज्याच्या सत्तेने विश्वातील सर्व घडामोडी घडतात तो खरा देव असे ज्ञानी लोक मानतात. 17

381. जिकडे तिकडे मोकळी आकाश होते, शून्यमय होते. आत वायूचा जन्म झाला, वायूपासून अग्नि आणि अग्निपासून पाणी उत्पन्न झाले, पाण्यापासून पृथ्वी हे विलक्षण करणारा देवच होय. -28

382. देवाने पृथ्वी निर्माण केली, पृथ्वीवर दगड निर्माण होतात. अज्ञानी विवेकशून्य माणसे दगडालाच देव मानतात. काय करावे -29

383. सर्व विश्व ज्याने निर्माण केले तो देव त्या विश्वाहून निराळा आहे. त्याच्या पलीकडे आहे यात संशय काढू नये. -34

384. विश्वातील पंचभूताच्या मिश्रणाहून आत्माराम अलिप्त असतो. अविद्येच्या मायेमुळे हा विश्वभ्रम खरा वाटतो. -42

385. जीवाच्या अंर्तयामी स्वरुप असतो तो आत्मा चराचर विश्वाला व्यापतो, तो अंतरात्मा आणि सर्व पलीकडे परमात्मा. एकच पण भिन्न वाटतो या शुध्द आत्मस्वरुपास देव म्हणावे हेच वेदात्तचे रहस्य आहे. -45

## दशक आठवा विचार 386 ते 390

## समास दुसरा - सक्ष्म आशंका -8/2

386. मूळ एक परब्रह्म तेवढे होते. ते नित्यपुण्य,निष्क्रिय सर्वश्रेष्ठ असते. त्याच्या ठिकाणी कोणताही विकार नसलेली व अत्यंत सूक्ष्म अशी माया उत्पन्न झाली. -3

387. माया स्वतंत्र आहे हा विचार काही बरोबर नाही. मायलानिर्माण करणारा व आवरणारा परमेश्वर म्हणून कोणीतरी आहे यांत शंका नाही. -23

388.कोणी म्हणतात, कीं माया मिथ्याचे आहे. पण जीवास अज्ञानरुपी ज्वर आला आहे. त्यामुळे त्यास भय वाटते. चिंता वाटते. जीवाने जर साधनरुपी औषध घेतले तर हे सारे दृश्य मिथ्या म्हणून अनुभवास येते. -32

389. जो आरशांत पाहतो त्यास स्वतःचे प्रतिबिंब तेथे दिसते. मायेच्या बाबतीत तसेच होते. मायेविषयी ज्याची जी भावना असते त्या भावनेप्रमाणे माया त्याला दिसते. -37

390.सोने व सोन्याचे दागिने याच्यांत सोनेपणाच्या दृष्टीने फरक नाही. कोणी म्हणतात माया मुळीच नाही सर्व परब्रह्मच आहे. जसे तूप पातळ असो वा घट्ट असो. -38

# दशक आठवा - विचार 391 ते 396

# समास तिसरा - सूक्ष्म आशंका 8/3

391. दोरीस साप न भाषणे जे अव्दैत आहे. त्यामध्ये व्दैत असू शकत नाही. व्दैत असल्याचा भास होतो. अव्दैत सांगण्यासाठी व्दैताचा आश्रय केल्याखेरीज चालत नाही. -8

392. अनंत शक्तीनी संपन्न असणारा ईश्वर तोच "मूळ पुरुष" होय हे शहाण्याने ओळखावे. "मुळ माया" हे त्या पुरुषाचे दुसरे नांव आहे. कर्तेपण मूळ मायेमध्ये असते. -14

393. मुळ आत्मस्वरुप चैतन्य एकच आहे. अविद्येच्या आवरणाने त्यास जीव म्हणतात. तो देहांत राहतो. विद्या व अविद्या यांनी संपन्न मायेच्या सहवासाने त्याच चैतन्यास शिव म्हणतात. तो विश्वांत राहतो आणि केवळ ज्ञानमय व शक्तिमय चैतन्यास देव किंवा परमेश्वर म्हणतात. त्याच्या ज्ञानपणा भागास मुळ पुरुष तर शक्तिच्या भागास मुळ माया म्हणतात.-18

394. विश्वामध्ये अनंत शक्ति आहेत त्याचे मुळ, मुळ मायात आहे. मुळ माया व पुरुष दोन्ही एकच समजावी. तोच सर्वांचा नियंता व स्वामी ईश्वर होय तो जगदीश अनंत नावाने प्रसिध्द आहे. -20

395.क्षितीच्या कडेला आकाश टेकलेले दिसते. परंतु ते तसे असत नाही. दृश्य विश्वामध्ये ब्रह्माला समुळपण आल्यासारखे वाटते. परंतु त्याचे निर्गुणपण जसेच्या तसेच असते. हा विश्वास बाळगावा. -40

396. निश्चल ब्रह्मामध्ये जी हालचाल होते ती मूळ माया होय. ते चळण शक्तिरुप आहे. शक्ति हेच वायूचे लक्षण होय. याच वायूतील शक्तिमुळे सूक्ष्म तत्वे स्थूल होतात. -56

397. परब्रह्मामध्ये मुळ माया झाली तिच्या पोटी माया जन्मास आली या मायेने त्रिगुणांना जन्म दिला. (सत्व, रज,तम) तमोगुणापासून पंचभूते निर्माण झाली.-4

398. कठीण जड म्हणजे पृथ्वी, ओले म्हणजे पाणी. गरम आणि प्रकाशयुक्त म्हणजे तेज. जिवंतपण आणि हालचाल म्हणजे वायु. पोकळपण आणि स्तब्धपणा म्हणजे आकाश होय. -12

399. सुक्ष्म शक्तिमध्ये पंचमहाभूते सुक्ष्मपणे राहतात. पंचमहाभूतामध्ये तीन गुण (सत्व, रज, तम) मिळविले की अष्टधा प्रकृती होते. -42

400. आठ दिक् पाल - इंद्र-पूर्व, अग्नि-आग्नेय, यम-दक्षिण, निऋति-नैऋत्य वरूण-पश्चिम वायु-वायव्य, सोम-उत्तर, ईश्वर-ईशान्य असे आठ अधर्वरील व आठ दिशा आहेत. - 51

401. पंचभौतिक ओळखून त्यांना मागे टाका मग ब्रह्मदर्शन घडते. देहाची व दृश्याची किंमत जाणून मनातून ते सांडण्यासाठी सर्व साधना करावी लागते. वृत्तीवर जमलेले दृश्याचे दाट आवरण सैल होणे हा विवेक आणि ते बाजूला सारणे हे वैराग्य होय. -59

## दशक आठवा - विचार 402 ते 405

## समास पाचवा - स्थूल पंचमहाभूते, स्वरुपाकाशभेद 8/5

402.ब्रह्म निर्गुण, सनातन (नित्य) आहे परंतु आकाश तमोयुगांतून झाले तेथे अज्ञान व शून्य आहे म्हणून ते पंचमहाभूतामयी आहे. -42

403. कापसावर स्फटीक पडल्यास कापसासारखाच दिसतो. आकाश पंचमहाभूतापैकी आहे. मायेतून निर्माण झालेले आहे. ब्रह्मापासून वेगळे आहे. -49

404. आकाश रंग नाही, नाश पावत नाही, अचल आहे, रुप नाही, आकार नाही, विकार नाही, त्यामुळे काही त्यास शाश्वत ब्रह्म मानतात. -53

405. आकाश शून्यमय, स्थूल, जड आहे, ब्रह्माचा स्तब्धपणा चैतन्यमय आहे. आकाश आणि सत्य ज्ञानमय व अनंत असणारे ब्रह्म एक नाहीत. -65

## दशक आठवा - विचार 406 ते 412

## समास सहावा - दुश्चित निरुपण 8/6

406. ग्रंथ श्रवण करताना त्यांतील प्रमेये सिध्दांत बरोबर शोधावे, बुध्दित साठवावे, मनाची तन्मयता, एकाग्रता बिघडू देऊ नये. अवधान गेल्यास फिरुन शरण जावे. -6

407. पाषाण अपवित्र, कुचकामाचा, श्रध्दहीन व व्यग्र चित्ताचा असतो. अभक्त त्याप्रमाणे असतो. -18

408. दुश्वितपणामुळे मनाचा निश्चय होत नाही. कार्यात यश येत नाही. श्रवण होत नाही. आत्महिताचा परमार्थ बुध्दित साठवून ठेवता यते नाही. -24

409. आळसाने झोप घेण्याची संवय वाढते, वासनांचा निश्चय करणारी सद्बुध्दि शून्याकार बनते. जेथे सद्बुध्दी नाही तेथे परमार्थ नाही. आयुष्याचा नाश होतो. -35

410.माकडाच्या हाती रत्न व पिशाच्याच्या हाती द्रव्य जसे फुकट जाते तसे दुश्चित माणसाला परमार्थ उपदेश फुकट जातो. -40

411. सावध, कष्टाळू, आणि तत्पर त्यास सत्समागमामध्ये ताबडतोब मोक्ष मिळतो. -44

412. श्रध्दावंत भोळे असले तरी साधन केल्यावर मोक्ष मिळतो. सत्समागमाने विवेकशक्ति येते सद्वस्तूचे दर्शन घडते. आत्मदर्शन घडते. -50




## समास आठवा - विचार 413 ते 417

## समास सातवा - 8/7 मोक्ष लक्षण

413. जीवपणाने, मी जीव आहे या भावनेने तो बांधलेला असतो. रेशमाच्या किड्याप्रमाणे कोश करुन मरुन जातो. त्याप्रमाणे जीव संकल्प करतो तो घट्ट झाला की जन्ममरणाच्या चक्रात सांपडतो. -9

414. मी आता दिलेले दान ते पुढील जन्मी अनेक पटीने मिळेल असा तो अज्ञानी बध्द असतो. मानवाचा जन्मांत आत्मज्ञान न होता मृत्यु आल्यास परत गर्भवास मिळणार.-19

415.आपले शरीर पंचमहाभूताचे आहे तसेच चराचर विश्वदेखील पंचमहाभूताचे आहे. प्रकृतीच्या नियमानुसार, निर्सगानुसार जगांत व्यवस्था आढळते. कार्यकारण भाव सत्ता गाजवितो. -32

416. शेवटी देहाचा नाश होतो म्हणून देहाला आत्मा मानता येत नाही. अंत:करण, पंचप्राण, दहा इंद्रिये व त्याचे विषय आणि पंचमहाभूते मिळत देह तयार होतो. आत्मा निराळा आहे. -39

417. पहिला जीवात्मा, दुसरा शिवात्मा, तिसरा परमात्मा यालाच विश्वात्मा म्हणतात आणि चौथा निर्मलात्मा होय. यामध्ये उच्च, नीच, कनिष्ठ श्रेष्ठ, भेदभाव नाही मुळांत चारहि एकच आहेत. -46

## दशक आठवा विचार 418 ते 427

## समास आठवा - आत्मदर्शन 8/8

418. परमात्माला जन्ममृत्यू नाही, जाणे येणे नाही, बंध नाही मोक्ष नाही, निर्गुण निराकार, अनंत व अपार आहे, नित्य निरंतर व सर्वव्यापून आहे. परंतु परमात्मा भक्तीने प्राप्त होतो यांत संशय नाही -5

419. भगवंतापासून विभक्त नाही तो भक्त, बंध नाही म्हणून तो मुक्त होय. याला शास्त्राधार आहे. देव भक्तांत फरक नाही. एकच होत. -17

420. परमात्मा स्वरुपाशी समरस झाल्यावर दीनपणा, व्दैत किंवा मी तूपण उरत नाही. देव व भक्त असा विचारच राहत नाही. आत्मनिवेदनाने आत्मसमर्पण झाले की अभेद भक्तीची अवस्था येते. सायुज्य मुक्ती मिळते. -19

421. देह बुध्दीने राहिली तर दु:खे सोसावी लागतात. देहबुध्दी सोडण्यास देहांतीत झाल्यास परब्रह्माचा लाभ होतो. 25

422. देहातील असणारी आत्मबुध्दी प्राप्त झाले की तो विदेही बनतो. वेद त्याची स्तुती गातात. अनेक शास्त्राचे नुसते अध्यायन करुन आत्मबुध्दी निर्माण होत नाही. -29

423. देह भावना आहे तोपर्यंत अधोगती चुकत नाही सत्पुरुष, संताचे म्हणणे खोटे मानू नये. त्यामुळे दोष लागतो. -31

424. सो S म् मी आत्मा आहे, स्वानंदधन आहे, तसेच त्याला जन्ममृत्यू नाही हेसंताचे वचन मनांत घट्ट धरावे. - 33

425. देह म्हणजे सारा प्रपंच, अंत म्हणजे माया, जन्माचे मुळ स्थान अविद्या किंवा वासना यापासून अलिप्त आत्मा तू आहेस, जयाची दृढनिष्ठा असते त्याला आत्मदर्शन होते, आत्मा गति आणि अधोगतीपासून निराळा राहतो. - 50

426. ध्यान धारण संपतात, कल्पना निर्विकार स्वरुपांत जातात. फार सुक्ष्म, ब्रह्मस्वरुप उरते. साधकावस्था संपून स्वरुपसाक्षत्कार होतो. जन्म मृत्यूच्या कल्पना संपतात. - 59

427.एका ब्राह्मणास आपण हीन जातीचे आहोत असे स्वप्न पडले. तो घाबरला जागे होताच ब्राह्मण आहोत हे कळाले. त्याचप्रमाणे मी देह आहे भ्रमाने जीव दु:खे भोगतो. आत्मा आहे समजताच निर्भय होते. - 69

## दशक आठवा - विचार 428 ते 433

## समास नववा - सिध्द लक्षण 8/9

428. आत्मस्वरूप स्वत:सिध्द आहे ही गोष्ट वेद शास्त्रांमध्ये प्रसिध्द आहे. सदासर्वकाळ आत्मस्वरूपाशी मनाने चिकटून राहते. साधुचे प्रधान लक्षण आहे. देहाने लोकासारखा दिसला तरी मनाने निराळा असते. - 9

429. आत्मस्वरुपाच्या दर्शनांत साधू सतत राहिल्याने त्यास प्रपंचाची काळजी नसते. त्याला स्वरूपवर्णनाची गोडी उत्पन्न होते. -10

430. आत्मस्वरुपाशी तदाकार झालेला साधकाचे आतील व बाहेरील समाधान असते, मन निश्चल असते वृत्ती स्वरुपकार झालेली असते. - 14

431. साधु अंतर्यामी वृत्तीरहीत असतो, वृत्ती भगवंताकडेच असते. मन आत्मस्वरूपाला चिकटलेले असते. - 17

432. साधु स्वस्वरुपाच्या आनंदात नेहमी असतो, अरेरावी अथवा वादविवाद करत नाही, तो अत्यंत निर्भय आणि निवांत असतो. -42

433.सर्व धर्मात स्वधर्म उत्तम होय. त्यात लीन होऊन राहणे, बुध्दी आत्मस्वरुपांत स्थिर झाली, म्हणजे अवगुण सारे आपोआप गळून जातात. - 58

## दशक आठवा विचार 434 ते 438

## समास दहावा शून्य निरसन 8/10

434. वासना शक्य तितकी चांगली ठेवावी.तर माणूस विनासायास संसार तरुन जातो, तीर्थाटनाचे यातायात नको. तेथे पाणी व पाषाण यांचेच दर्शन होणार- 18

435. द्रष्टा आणि दृश्य दोन्ही मिळून एकच परमेश्वर आहे. मग द्रष्टेपणाची खटपट हवी कशाला ? -59

436. एका कडेला दृश्य विश्व आहे. दुसऱ्याकडे परब्रह्म आहे. या दोन्हीमध्ये शून्याचे स्थान आहे. वेडा साधक शून्यालाच ब्रह्म समजतो. -66

437. संत वचनावर श्रध्दा ठेवणे हाच शुध्द स्वरुपानुभव येण्याचा मार्ग होय. संत वचनावर श्रध्दा ठेवली की मनाचा पहिला स्वभाव पालटतो “मी परमात्मा वस्तूचा आहे” असे त्याचे रुपांतर होऊन मन ब्रहत स्वरुप होते. -77

438. आधी दृश्य बाजूला सारावयाचे, अदृश्य शून्य ओलांडयाचे त्यानंतर मुळ मायेच्या पलीकडे परब्रह्मचे दर्शन होते. त्यासाठी ब्रह्माशी तदाकार व्हावे लागते मी मन नाही सिध्द आत्माच आहे. - 75

## दशक नववा - गुणरुप विचार 439 ते 440

## समास पहिला - आशंका नाम 9/1

439. परब्रह्माला आकार व आधार नाही, त्यास अवयव नाही, त्यास आरंभ शेवट नाही, त्यास उपमा नाही, त्यामध्ये मोकळी जागा नाही ते सगळीकडे सारखे भरलेले आहे. - 10

440. परब्रह्मास कोणतेही कर्म नाही. त्यास नांव नाही, रुप नाही, ते अमर्याद, निश्चल, अव्दैत, अदृश्य आहे ते विश्वाच्या पलीकडे नही हे सद्‌गुरुची संगत केल्याने अनुभव येतो. - 29

## दशक नववा विचार 441 ते 444

## समास दुसरा - ब्रह्म निरुपण 9/2

441. जे आकार असतात ते नाश पावतात पण परमात्म रुप मात्र सदासर्वकाळ जसेच्या तसे असते. सत्य असते. सदैव सगळीकडे भरले असते तेच भगवंताचे स्वरुप होय, त्यास पुष्कळ नावे आहेत. - 3

442. मी देह आहे कल्पना आहे तसेच मी ब्रह्म आहे ही कल्पना आहे. स्वस्वरुप कल्पनेच्या पलीकडे असने स्वस्वरुप अनंत असल्याने कल्पनेने त्यास मर्यादा देत नाही. - 20

443.ब्रह्मवादी म्हणतात सर्व दृश्य बाजूस केल्यावर जे शुध्द व निर्मळ स्वस्वरुप उरते ब्रह्म होय. - 23

444. सद्‌वस्तू शब्दांनी सांगता येत नाही. संताच्या वचनावर मनन, चिंतनाने कळते. आपण कोण हे नीट पहावे स्वरुपाविषयी अखंड मनन करावे, त्यात लीन व्हावे. त्याशी अनन्य झाल्यावर माणूस महापुरुष बनतो त्यास मौन शोभते - 34

## दशक नववा विचार 445 ते 449

## समास तिसरा 9/3

445. जन्म व मृत्यू यांचे भोग योग्यास भोगावेच लागतात. त्याला जन्म नसून तो जन्म घेतो. पतित नसून तो पतित होतो. त्याला यातना भोगाव्या लागतात. - 6

446. भूतबाधा झालेला व भूतबाधा नाहिसे करणारा मांत्रिक देहाने सारखेच दिसतात, पण त्याची योग्यता सारखी नसते त्याप्रमाणे अज्ञानी व ज्ञानी देहाने सारखेच दिसतात पण त्याची योग्यता सारखीच नसते. -15

447. ज्ञानी स्वस्वरुपाचशी तदाकार असतो. त्यास देह बुध्दि नसते. तो शुध्द व केवळ परमात्मा स्वरुपच असतो. त्यास संकल्पाचा स्पर्श होत नाही. तो सामान्य देहधारी वाटतो. पण आंतून वेगळा असतो. - 24

448. आत्मज्ञानी पुरुष परमात्म स्वरुप असतो. अज्ञानी लोक त्यास सामान्य मनुष्य समजतात. जसा ज्याचा भाव तसा देव त्याला फलद्रूप होतो. - 29

449. खरा देव निर्गुण, निराकार, तो सगळीकडे गच्च भरून आहे. एकच एक आहे सामान्य त्यास अनेकपण देतात. साधु आत्मज्ञानी, समाधानी असतो. तो निरिध्यासाने आत्मस्वरुपाकार बनतो. - 32

## दशक नववा विचार 449 ते 454

## समास चवथा - जाणपण निरुपण 9/4

450. जर अंगी गुण नसतील जीवन वाया जाते. प्रपंचात काय परमार्थात काय जो जाणता असे तोच प्रभाव पाडतो. नेणत्याचे आयुष्य वाया जाते. तो भ्रमात पडतो, फसतो व सर्व बिघडते. - 20

451. माया व ब्रह्म जीव आणि शिव, सार आणि असार भाव व अभाव याचे बरोबर ज्ञान झाले म्हणजे जन्ममरणच नाहीसे होते, मी कोण याचे ज्ञान झाले म्हणजे मनुष्य मुक्त होतो. -26

452. व्यवहारामध्ये प्रसंगानुसार कसे वागावे हे ज्याला कळत नाही. तो दुसऱ्याचा अपमान करतो, प्राण घेतो अशा अज्ञानी लोकामुळे सर्वास वाईट प्रसंग येतात. - 35

453. अज्ञान वाईट भाग्यहीन असते. ज्ञानाकडे दुर्लक्ष नको ज्ञानाच्या उपायाने परमार्थाचा लाभ होतो. - 37

454. ज्ञान व स्मरण तर अज्ञान विस्मरण रुप आहे. 'मी आत्माच आहे व त्याचे स्मरण अखंड राहणे हे ज्ञानाचे लक्षण, तर 'मी देह आहे. हे दृश्याचे स्मरण हे अज्ञानाचे लक्षण होय. अज्ञानामध्ये स्वस्वरुपाचे विस्मरण होते. - 40

## दशक नववा विचार 455 ते 458

## समास पांचवा - अनुमान निरसन 9/5

455. पिंडाचे स्थूल, सुक्ष्म, कारण व महाकारण चार देह, तर विराट, हिरण्य, अव्याकृत व मुळ प्रकृति असे ब्रम्हांडाचे चार देह आहेत असे शास्त्रांत आहेत. परंतु अनुभव घेता वर्णन काल्पनिक वाटते. - 5

456. आत्मबुध्दीचा स्वानुभवी पुरुष राजहंसासारखा असतो तो सार असार निवडून वेगळे करतो. तर देह बुध्दीची माणसे डोमकावळ्यासारखी असतात ते घाणच चिवडीत बसतात. - 18

457. कोणीतरी मनाने मंत्र, देवता निर्माण करतात मंत्रानेच तिची प्राणप्रतिष्ठा करतात. या देवता स्वतंत्र नसतात. फक्त मंत्राच्या आधीन असतात. - 21

458. पिंडी तेच ब्रह्माडी याचा खरा अर्थ - विश्व पांच महाभूताचे बनलेले आहे. पिंडदेखील त्याच पांच महाभूताचा बनलेला आहे. याचा साक्षात रोकडा अनुभव कुणीही घ्यावा. - 37

## दशक नववा विचार 459 ते 463

## समास सहावा गुणरुप निरुपण् 9/6

459. मूळ मायेच्या पोटात सत्य, रज, तम, गुप्तपणे असतात. त्याच्या मिश्रणाने विश्व निर्माण होते. प्रथम साडेतीनमात्राचा ओंकार प्रकृत झाला. यासच हिरण्यगर्भ अथवा वेद शब्दब्रह्म म्हणतात. शब्द आकाशाचा गुण आहे. वेद शब्द साकार होतात. - 10

460. पाच भूते आणि तीन गुण मिळून अष्टया प्रकृती होय ही कुळ मायाचा विचार होय. ज्ञान व अज्ञान विचार करण्याचा प्रसंग मूळ मायेमुळेच येतो. परब्रम्हाच्या ठिकाणी केवळपणा असतो. मुळमायेमध्ये मी ब्रह्म आहे ही ज्ञानरुपी जाणीव आहे. - 11

461. परब्रह्मांत मूळमाया निर्माण झाली तेव्हा “मी ब्रह्म आहे” अशी जाणीव निर्माण झाली ही जाणीव ज्ञानरुप आणि शक्तिमय असते. मुळ मायेतून गुणमाया व वायुरुप म्हटली जाते. - 13

462. परब्रह्मातील मुळमायेतील जाणीव पिंडला व्यापते तिला जीव म्हणतात. जाणीव विश्वाला व्यापते. तिला शिव म्हणतात. वस्तूला व्यापणारे आकाश सोडावयाचे, ही सोडून उरणारे शुध्द, केवळ व अनंत ते परमात्म स्वरुप समजावे. - 39

463. पाच भूतापैकी पाणी एक भूत आहे. जगांत सर्व प्रकारचे प्राणी दिसतात. पण पाणी हेच त्याच्या देहाचे मूळ आहे. सगळी माणसे, किडामुंगी इत्यादी जीव आणि श्वापदरिक जनावरे पाण्यापासून निर्माण होतात. - 44

## दशक नववा - विचार 464 ते 469

## समास सातवा - विकल्प निरसन 9/7

464. आधी स्थूल पिंड असतो त्यात अंत:करण पंचक (अंत:करण, मन, बुध्दि,चित्त व अहंकार) आढळते. ज्ञानाचा विचार व व्यवहार, स्थूल देहाच्या आधाराने चालतो. - 1

465. जाणीव म्हणजे स्वत:चे केवळ स्मरण होय. पाच भूतापासून देह निर्माण झाला. वायुमुळे तो हालचाल करतो. जाणणे हा देहांत राणाऱ्या मनाचा धर्म आहे. माणसे शुध्द असते तोपर्यंत जाणीव असते, तो बेशुध्द झाल्यास, जाणीव लोपते आणि संपूर्ण जाणीव लोपली की तो मरण पावतो. -26

466. पुन: जन्म हा अतींद्रिय विषय आहे. ज्ञानीस पुन्हां जन्म नाही. अज्ञानीस पुन्हा जन्म घ्यावा लागतो. आत्मज्ञान झाले तो मुक्त झाला. अज्ञानी स्वत:चे कल्पनेच बांधला जातो. - 45

467. परमार्थामध्ये बर्हि रंगापेक्षा अंतरंगाकडे दृष्टी द्यावी लागते. म्हणून समाधी आणि झोप बाहेरुन सारखी दिसली तरी अंतरंगी दोन्ही अत्यंत भिन्न असतात. - 46

468. मोक्षाचा रोकडा व्यवहार म्हणजे आत्मानात्म विवेकाची जाणीव असणे. मन जाणतेपणाचे पाहिजे. सारासार विचार करुन सार बरोबर निवडण्याची शक्ति असणे म्हणजे आत्मज्ञान होणे. - 49

469. वस्तूचे यथार्थ स्वरुप न कळणे, म्हणजे अज्ञान, तर स्वरुप कळणे म्हणजे ज्ञान होय. अज्ञानांत काहीच कळत नाही, ज्ञानांत सर्व कळते, पण ज्ञानरुपी जाणीव सुध्दा ज्यावेळी मागे राहते, त्यावेळी स्वरुप साक्षात्कार होतो “मी आत्माच आहे” असा अनुभव येतो त्यास विज्ञान म्हणतात. - 51

## दशक नववा विचार 470 ते 474

## समास आठवा - देहान्त निरुपण 9/8

470. मृत्यूसमयी पांचही प्राण आपली स्थाने सोडतात. त्याचवेळी वासना त्यांच्या मागोमाग जाते. कारण, वासना प्राणरुप आहे. प्राण वायुरुप असतो वायूबरोबर वासना देह सोडते, मरताना जसा हेतु असेल त्याचप्रमाणे ती पुन: जन्म घेऊन येते. - 5

471. मुळ वासना अति सुक्ष्म असते. दिसत नाही. मनातील वृत्तीचे मुळ वासनेने असतात, प्राण वासनारुप असतो आणि वासना जन्म घ्यावयाला लावते. - 11

472. ब्रह्मांडाची जाणीव कारणरुप आहे. पिंडामध्ये ती कार्यरुपाने वावरते. तिच्या आकलनास वेळ लागतो. ईश्वराचा विश्व निर्माण करण्याचा संकल्प बीजरुपाचा असल्याने सर्व दृश्य घटनाचे मुळ कारण आहे, हे आकलन होण्यास आपली बुध्दी अत्यंत सुक्ष्म करावे लागते. - 14

473. मुळमाया जाणीवरुप आहे. स्वस्वरुप हे जाणिवेचे खरे मूळ ठिकाण असून तेथे ती सहज जाते. स्वरुपीली असणारी जाणीव सावध असते. विश्वामध्ये ती गतिमान होऊन कर्तृत्व गाजवते. कोठे प्रगटपणे तर कोठे अप्रगटपणे तिचे कार्य चालू असते. - 26

474. वायूमध्ये असणारे जाणीवचे प्रकार बरेच आहेत. ती प्रगट होते, कोठे गुप्त होते वायुमुळे आकाशात वीज कडाडते. मंत्राच्या सामर्थ्याने देवताच्या लढाया चालतात, धनलाभ करता येतो. - 37

## दशक नववा विचार 475 ते 479

## समास नववा - संदेहवारण 9/9

475. ब्रह्मामध्ये पृथ्वी आहे आणि पृथ्वीच्या अंतर्यामी ब्रह्म आहे. ब्रह्म सुक्ष्म आहे म्हणून ब्रह्मांडाचा भेद करुनब्रह्म त्याच्या अंतर्यामी राहते हे बरोबर आहे. ब्रह्मांड स्थूल आहे. - 7

476. आकाश म्हणजे ब्रह्मच होय. परंतु ते पंचमहाभुतामध्ये गणले जाते. भूताच्या अंतर्यामी जो ब्रह्मांस असतो ते खरे आकाश होय. आकाश निश्चल राहते म्हणून तो ब्रह्मांश समजावा. - 21

477. माणसाच्या बुध्दीप्रमाणे त्याचेकडे ज्ञानाचा प्रकाश आढळतो. बुध्दी विशाल केली तर आकाश (ब्रहंत कवटा) ऐवढे वाटते, आणखी विशाल केली तर ते बोराएवढे, आणखी विशाल केली तर वराचे बीजाऐवढी वाटेल, आपण ब्रह्मरूप झालो तर विश्व दिसणारच नाही. - 33

478. आपले बुध्दी परब्रम्हाचे आकलन करता करता पसरु लागली, तिची मर्यादा संपते, ती फाटते आणि परब्रम्ही लीन होते. मग मुळचे निर्गुण आत्मस्वरुप जसेच्या तसे स्पष्टपणे प्रत्ययास येते. - 37

479. मोक्ष बाजूला ठेवावा. विवेकाने खरे वाटणारे पण खरे नसणारे दृश्य बाजूस सारावे म्हणजे मग आत्म्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार होतो. दृश्य खरे वाटणे हा पूर्वपक्ष आणि अतीद्रींय आत्मस्वरुप हा सिध्दांतपक्ष होय विषय अनुभवाचा आहे. मनन करावे, निदिध्यास करावा आत्मसाक्षात्कार होईल. - 41

## दशक नववा - विचार 480 ते 487

## समास दहावा - स्थिती निरुपण 9/10

480.देवळाच्या शिखरावर कावळा बसला म्हणून तो देवापेक्षा श्रेष्ठ होत नाही. राजवाडयाच्या सभा मंडपावर माकड चढून बसले पण शहाणे लोक माकडाला सभासदाहून श्रेष्ठ समजत नाहीत. - 2

481. एकाद्याने व्यवहारांत उत्तम लौकिक मिळवला, पण अंतर्यामी स्वरुपाकडे लक्ष दिले नाही तर मुख्य देव त्यास प्राप्त होत नाही असा मनुष्य आत्मघातकी होय. - 9

482. देवतेचे उपासना केल्याने देवलोक मिळतो, भूताची उपासना केल्याने भूतलोक मिळतो. निगुर्णचाची उपासना केल्याने स्वत: निर्गुण बनतो. - 11

483.ब्रह्म स्वस्थानी निश्चल असते. त्याचेवर देहबुध्दीचा आरोप केल्यास तो खोटा ठरतो. जो खरोखर मुग्ध झाला त्याला साधनाचे बंधन असणे शक्य नाही. साधन करुन जे काही साधावयाचे ते आत्मस्वरुप बनल्यावर साधन संपते. साधकावस्था विराम पावते. - 17

484. साधनाने आपणास काय साधायचे आहे, नियम पाळून कोणते फळ मिळवावयाचे आहे याबद्दल आपला समज स्वच्छ व बरोबर असावा. आपण

आत्मस्वरुप असल्याने उगीच भलत्या कल्पना करुन चुकीच्या मार्गाने जाऊ नये. - 20

485. स्वस्वरुप आत्मपणाने असते, जीव जीवपणाने राहतो माया मिथ्या आहे. खरेपण कशाला आहे हे जो शोधून पाहतो तो खरा ज्ञानी होय. - 24

486. देहबुध्दीचे ज्ञान वृत्तीरुप असते, वृत्ती कल्पनेने केलेल्या असतात. दृश्य लय पावले की निर्गुण स्वरुप उरते विवेक केल्यास ते स्वरुप आपण स्वत: आहोत असा आत्मसाक्षात्कार होतो. - 27

487. संत म्हणजे सदा सर्वत्र पूर्णपणे व्यापून असणारे ब्रह्मस्वरुप होत. असत म्हणजे फक्त भासच होय. म्हणजे जे कधी नव्हतेच "आत्मसाक्षात्कारी ज्ञानी त्रिगुणाच्या आणि पंच ते महाभूताच्या कक्षेच्या पलीकडे गेलेला असतो. - 35

## दशक दहावा जगज्जोतिनाम विचार 488 ते 491

## समास पहिला अंत:कणियेक 10/1

488. अंतकरण म्हणजे जाणीव, म्हणजे जाणण्याची स्वाभिवक किंवा नैसर्गिक शक्ति होय. यामुळेच देह रक्षणाचा, उपाय सुचतो. जाणिवेचे दृष्टीने सर्व प्राण्याचे अंत:करण समान असते हा प्रत्यक्ष अनुभव येतो. - 14

489. सर्व जीवाचे अंत:करण एकच असते, जाणीव एकच असते. पाणी सर्वांना गार लागते. अग्नि उष्ण वाटतो. सर्वांची जाणण्याची कल्प एकच आहे. - 18

490.किडा मुंगीपासून ब्रह्मदिकाचे अंत:करण एकच असते, जाणीव एकच असते, त्याच प्रेरणेने प्राणी चारा खातात, भितात आणि लपतात. प्राण्यामध्ये कमी जास्त जाणीव असते पण मुळ स्वरुप एकच असते, जिवंत प्राणी जाणिवेवाचून असुच शकत नाही. - 25

491. जाणीव म्हणजे अंत:करण आणि अंत:करण विष्णूचा अंश आहे, विष्णू विश्वाचे पालन करतो. जाणीव नसते तो तमोगुण होय. तमोगुणाने रुद्र संहार करतो,

थोडी जाणीव व थोडी नेणीव याचे मिश्रण रजोगुण,असे मिश्रित असणारे जीव पुन्हा जन्म घेतात. - 28

## दशक दहावा - विचार 492 ते 494

## समास दुसरा देह आशंका 10/2

492. उत्पती करणारा चार तोंडाचा ब्रह्मदेव आहे व पालन करणारा विष्णु चार हाताचा आहे व महेश संहार करतो असे म्हणतात या सर्वांना कुणाहि अनुभव नाही पाहिले नाही. - 3

493. देवाचा प्रत्यक्ष अनुभव नाही. देवच मायेने निर्माण केलेले आहेत. मुळ माया एकच आहे. परब्रह्माने माया निर्माण केली तर परब्रब्रह्मास कर्तेपण नाही. - 13

494. वेद शब्दमय आहेत, ओंकार देहाशिवाय होत नाही देहावाचून देह निर्माण होत नाही, ब्राह्मण देहास वेदाचा अधिकार आहे. शास्त्र आहे. शास्त्रामध्ये निर्णयामध्ये एक मत नाही. - 22

## दशक दहावा विचार 495 ते 498

## समास तिसरा - देह आशंका शोधन 10/3

495. आकाशाला मर्यादा असते, ते वेगळे भासते. मर्यादाचा भास वाढला की आकाश ब्रह्मस्वरुप होते. अमर्याद, भासरहित ब्रह्मामध्ये मुळ माया जन्म पावते. वायु स्वरुप मुळ मायेचे लक्षण होय. वायु म्हणजे शक्ति. मुळ माया शक्तिरुप सर्व विश्वाची मोठी आई, गुणमाया धाकटी आई आहे. - 2

496. आकाशापासून (ब्रह्म) वायु(शक्ति) निर्माण झाला. वायुपासून अग्नि, अग्निपासून आप (सूर्य) निर्माण झाल. आपपासून पृथ्वी (पाषाण) वृक्ष निर्माण झाले. पाषाणातून देव देवता (शक्ति रुपे) झाली.

497. जगातील देव, देवता, भूते असंख्य आहे. ती सर्व वायुस्वरुप (शक्ति) आहेत. ते अनेक प्रकारचे देह धारण करतात. प्रकट व गुप्त राहतात. वायुरपात संचार करतात. वायूमध्ये जगत-ज्योती-जाणीव निर्माण करतात. श्रेष्ठ कनिष्ठ वासना करतात. पुढे देव अथवा भूते होतात. -11

498. ज्या मंदिरात पाषाण मूर्तीपुढे (वायुरुप शक्ति) निष्काम उपासना चालते, तेथे शुभ व श्रेष्ठ देवता वास करतात. हेच थोर सत्पुरुषाच्या समाधीपुढे होते जेथे तामसी उपासना मंत्र चालतात. तेथे माणसाची बुध्दी भ्रष्ट होते.

## दशक दहावा - विचार 499 ते 503

## समास चवथा - बीजलक्षण 10/4

499. माणसापासून माणूस जन्मतो व पशुपासून पशु निपजतात. पक्षी, जनावरे, मासे इत्यादी नाना प्रकारची शरीरे आहेत ते दुसऱ्या शरीरापासून जन्मलेली असतात. - 2

500. परब्रह्मापासून मुळमाया, तिच्या पुढे अष्टधा प्रकृति (पांचभूते + तिनगुण), मुळमाया वायुरुप शक्ति असते. शक्तिमध्ये जाणीव असते. इच्छा असते. आत्मा, निर्गुण ब्रह्म इ. नावे भ्रमात्मक आहेत. - 11

501. मी ब्रह्म आहे असे ज्ञानमय भान किंवा शुध्द जाणीव आहे. तिला अधिष्ठानला ब्रह्म (ईश्वर) म्हणतात. ईश्वराचा त्रिगुणांचा संबंध येतो, त्यामध्ये विष्णू (सत्व) ब्रह्मदेव (रज) व महेश (तम) असे तीन वायुस्वरुप जाणवेते हे देह धारण केले. पुढे त्याचे नातवंडे व त्याचा विस्तार होत गेली. - 28

502. विश्वातील सारे जीव प्राणी सृष्टी ब्रह्मदेवानीच निर्माण केले त्याने अनेक प्रकारच्या प्राण्याची कल्पना केली ते निर्माण झाले. सृष्टी निर्माण झाल्यानंतर शरीरापासून शरीरे निर्माण झाली. - 37

503. विष्णुरुप जाणीव प्राण्याचे पालन करते व मुळ रुद्ररुप नेणीव प्राण्याचा संहार करते. ब्रह्मा उत्पति करतात. प्रलय संहार प्रसंगी सगळे विश्व जळून जाते. - 44

## समास दहावा विचार 504 ते 506

## समास पांचवा 10/7

504. पिंड (मायक्रो कॉझाल्ट) आणि ब्रह्मांड (मॅक्रोकॉझम) याची रचना समान आहे. माणूस रचनेचा प्रतिक आहे. ब्रह्माडांतील सर्व तत्वे माणसामध्ये आढळतात. आत्म्याने प्रथम विराट पुरुष निर्माण करुन त्यास सजीव केले नंतर सर्व देवता व लोकवास निर्माणकेले, विराट पुरुषाचे तोंड (वाचा)वाचेपासून अग्नि उत्पन्न झाला दृष्टी (दृष्टीपासून सुर्य निर्माण झाला) कान (दिशा उत्पन्न झालया) प्रथम तोंड, नाक, कान निर्माण केले नंतर त्याची कर्मे व त्यापासून पंचमहाभूते उत्पन्न झाले. त्यांना सर्वास राहण्यास मनुष्य शरीर लाभले. साधकाने वाणीचा लय साधला. (वैखरीतून मध्यमेतून पश्यनीतून परामध्ये लय झाला) तर विश्वातील सर्व ज्ञान त्याला प्राप्त होईल, सर्व ज्ञानाचे मुळ अग्नि आहे. पंचप्राणाचा लय साधला तर मोठी शक्ति अंगी येईल. दृष्टीचा लय केल्यास दिव्य दृष्टी येईल. पिंडाचे दोन प्रलय, एक म्हणजे गाढ निंद्रा, दुसरा म्हणजे देहांत होय. - 1

504. विष्णूच्या (मुळमायेचे जाणीवतेचे शुध्द स्वरुप) पोटांतून जाणीव नेणीव मिश्रीत ब्रह्मदेव (चार तोंडाचे) बाहेर पडले. ब्रम्हदेवांस सृष्टी निर्माण करण्याचे सारे ज्ञान ब्रह्मदेवाच्या नाळेतून मिळाले. माणसाच्या नाभीमध्ये सूर्यचक्र आहे ते जागृत झाल्यास माणूस अत्यंत सर्जनशील बनतो. ब्रह्मदेवाने संकव्यने विश्व निर्माण केले. ब्रह्म, विष्णू व महेश या देह धारण केलेल्या देवता झोपी जातात तेव्हां निद्राचलय होतो - 2

506. ईश्वराने विश्व निर्माण करण्याचा संकल्प केला तो सत्यसंकल्प आहे. तो ज्ञानमय आहे. जाणीवरूप आहे. निर्माण होण्यास कारण झालेला व त्यास

अखेरपर्यंत धारण करणारा सत्यसंकल्प देखील ईश्वरांत विलीन होते व ईश्वर ब्रह्मरुपांत मिसळून जातो. - 26

## दशक दहावा विचार 507 ते 511

## समास सहावा 10/6 भ्रमनिरुपण

507. विश्वाच्या आधी, निर्माण व विराम पावल्यावर परब्रह्मअगदी जसेच्या तसेच सर्वत्र दाट भरुन असते, सदैव असतेच मध्येच विश्वाचा भ्रम निर्माण होतो ते आहे असे भासते व कालांतराने नाश पावते. - 3

508. माणसाचे अज्ञान नाहीसे करणे विवेकाचे प्रधान कार्य आहे. विश्वांत राहून जो विवेक करतो सर्व गोष्टी विचाराने पाहतो. त्याला त्याचे ज्ञान होते. - 5

509. विश्वाचे खरे स्वरूप जाणणारे ज्ञानी होत. परब्रह्म सद्वस्तु (रिॲलिटी) एकच सगळीकडे भरुन आहे. त्यात विकार किंवा बदल होत नाही. तशी ती अनुभवास न येतां जे अन्य अनुभवास येते. ते सारे भ्रमरुप होय. - 9

510. पांच भुते, तीन गुण, मी आणि तू देव आणि भक्त, उपासना, खुद ईश्वर हो सगळे निश्चितपणें भ्रम रुपच आहेत. विश्व प्रत्यक्ष आहे वाटणे भ्रम आहे हे सर्व विचारवंतास विवेकाचे सामर्थ्याने पटलेले असते. - 12

511. कर्मपणाचा सनातनपणा, व ज्ञानेपणाचा बेछूटपणा असणे देह, कर्म, ज्ञान, कुळ, ज्ञान व मोक्ष याबद्दल भरलेला आभिमान, मागचे पुढचे काय करावे सुचत नसते. अनुभव नसणे. याच भ्रमाने सारख्या कल्पना करीत बसते हे अज्ञातच हो. - 31

# दशक दहावा - विचार 512 ते 518

## समास सातवा 10/7 सगुणभजन निरुपण

512. आत्मज्ञानी पुरुष, संत मुक्त होतात. प्रारब्ध संपले की देह ठेवतात परंतु नंतर देखील सत्ता चालते, प्रत्यक्ष कार्य करते. वासनेमुळे परत येतात असा याचा अर्थ नाही. त्याच्या वासनाच नसतात. - 3

513.सत्पुरुष जिवंतपणी एकाच वेळी दोन ठिकाणी दिसू शकतात. संत देवस्वरुप असतात. ज्याची जशी भावना असते त्यामुळे चमत्कार होतात. संताच्या शुध्द भावना असतात. देह पडल्यानंतर सुध्दा त्याचं कार्य चालते. - 7

514.वस्तुचे स्मरण होते ते दिसतात, हा कल्पनेचा खेळ आहेतेवढ्यावेळेपुरताच असतो. माणसाने पुण्यमार्गाने भक्ति वाढवावी, न्यायमार्गानेच चालावे. - 12

515. मी आत्मस्वरुप आहे असा मनाचा निर्णय झाला, तर ज्ञानमार्ग साधतो आणि त्याच्या योगाने ही अंगी मोठे सामर्थ चढते. सद्गुरु किंवा देवावर निष्ठा ठेवावी. निष्ठा नसेल तर सर्व वाया जाते. - 15.

516. ज्ञान मनी नसेल तर जप आणि ध्यान सोडू नये सगुणाची उपासना सोडणारा ज्ञानी अपयशी असतो. सगुणाची उपासना सोडू नये. - 18

517. निश्काम बुध्दीने केलेली उपासनेची बरोबरी या विश्वांत नाही. मोठे आत्मबल असल्याखेरीज अशी उपासना शक्य नाही. - 19

518. भगवंतापाशी सर्व अपेक्षा, वासना, मागच्या पुर्ण करण्याचे सामर्थ्य असते. नुसती वासनापूर्ति किंवाकामनापूर्ती भगिवण्यास भगवान दूर जातो. अत्यंत निष्काम बुध्दीने आपण परमेश्वराची उपासना करावी. - 21

## दशक दहावा - विचार 519 ते 523

## समास आठवा 10/8 प्रचित निरुपण .

519. प्रचितीसाठी - घोडा चालवून पहावा, अनुभवाने घेतलेले औषध घ्यावे, नाणी, रत्ने परीक्षा करुन घ्यावी, बी चांगले उगवते पाहून त्याची खेती करावी चौकशी केल्याशिवाय एखांद काम अंगावर घेऊ नये, कारण त्यात जीविताचा धोका असू शकतो.

520. अनुभव नसता केवळ कल्पना करुन अनुभवाने कोणतेही कार्य केल्यास अपास घडण्याची शक्यता असते. पाण्यात बसलेल्या म्हैसीची खरेदी करु नये केल्यास कष्टी व्हाल, कोणच्याही भरवशावर घर, कपडे, अन्न विकत घेऊ नये. - 12

521.ज्याला स्वानुभव नाही त्याचे ज्ञान थोतांड असते. अनुभवरहित व अनुमानप्रधान लोकांचे नाद लागल्यास अहित होते. - 16

522. वैद्यास आपल्या रोगाची पूर्ण कल्पना न दिल्यास स्वत:चाच घात होतो. जाणत्या लोकांच्या गर्वाने तुच्छता केल्यास त्याचा नाश होतो. - 20

523. पाप संपूर्ण नाश पावले व पुन: जन्मास येऊन यातना भोगणे थांबले असा प्रत्यक्ष अनुभव स्वत:स आला म्हणजे, मी खरा कोण हे कळते, संपूर्ण शरणागती स्वधर्म म्हणजे आत्मज्ञान झाले असे समजावे - त्याला विश्वाचा खरा कर्ता व परमेश्वराची ओळख होते. - 23

## दशक दहावा विचार 524 ते 530

## समास नववा 10/9 पुरुषप्रकृती

524.परब्रह्मापासून मुळ माया, आकाशांत वायुमध्ये पांचभूते व तीन गुण व निश्चल स्वरुपामध्ये हालचाल होते, वायुमध्ये शुध्द जाणीव असते. जाणीव म्हणजे जगत्ज्योतींचा मूळ झरा होय. - 5

525. वायू, जाणीव व जगत्ज्योती यांच्या मेळ्याला मूळ माया म्हणतात. पुरुष आणि प्रकृती, शिवशक्ती दुसरे नांव आहेत. - 6

526. वायु, शक्ति आणि जाणीव ईश्वर होय. अशा रीतीने लोक अर्धनारी नटेश्वर असे उल्लेख करतात वायूमध्ये जाणिवेचा जो गुण आहे ते ईश्वराचे लक्षण समजावे, त्याच्यापासून जो गुण आहे ते ईश्वराचे लक्षण समजावे, त्याच्यापासून सत्व, रज, तम तीन गुण होतात. - 11

527. सत्वगुण शुध्द जाणीवमय आहे. त्या गुणाचा देहविष्णु होय. तिच जाणीव सर्व प्राण्यांच्या अंगी असते. तिच्या प्रेरणेने प्रत्येक प्राणी समजून आपल्या देहाचे रक्षण करतो. तिला जगत्ज्योती म्हणतात, तिच्यामुळे प्राणी जिवंत राहतात हा प्रत्यक्ष अनुभव आहे. - 15

528. आत्मज्ञानाचा अभ्यास केला असता सर्व कर्माचा नाश होतो. असा समर्थांचा अनुभव आहे. यांत संशय नाही. कर्म बंधन तूटते तसेच सद्गुरुमुळे ज्ञान प्राप्र होते. - 24

529. तत्वाचा सूक्ष्म विचार करतां करतां, एक तत्वाने दुसऱ्या तत्वाचा, दुसऱ्याने तिसऱ्या तत्वाचा अस तत्वाचा नाश होतो. तत्वाचे निरसन झाले महणजे जे शिल्लक उरते ते आपले शुध्द स्वरुप त्या शुध्द स्वरुपाशी आपण तदाकार झालो की आत्मसाक्षात्कार होतो. - 26

530. प्रथम श्रवण करावे, त्याचे मनन करावे, त्याचा निदी ध्यास लागावा, रात्रंदिवस मनामध्ये तेच घोळत राहवे, मग हळूहळू परमार्थाचा अनुभव येऊ लागतो साधकाची श्रध्दा अधिक दृढ होते व त्यास प्रत्यक्ष आत्मसाक्षात्कार होतो. - 30

# दशक दहावा विचार 531 ते 536

# समास दहावा 10/10 चलाचल / निरुपण

531. निश्चल परब्रह्मामध्ये भासणाऱ्या चंचलास मूळामाया म्हणतात - त्यास पुरुषवाचक नावे - ईश्वर, परमेश्वर, ज्ञानस्वरुप, ज्योतीस्वरुप, कारणस्वरुप, सूक्ष्म, जीवात्मक, देही साक्षी, शिवात्मा इत्यादी स्त्रीवाचक, जगदीश्वरी, परमेश्वरी, जगत्ज्योती, त्रैलोक्य जननी इत्यादी नपुंसक वाच - अंत:करण, चित्त, चैतन्य, जीवित इत्यादी नांवे आहेत. - 33

532. एक अंतरात्मा सर्वांना चालवितो. सर्व जीव, ब्रह्मदेव सर्व त्याच्या सत्तेने चालतात. तो आहे असे कळते, पण दिसत नाही. तो सर्वात असून डरतो पुन्हा सर्वाहून तो निराळा अगाध आहे. -42

533. सर्व भूताना क्षर तर कुटस्थाला अक्षर म्हणतात. या दोन्हीहून निराळा असा एक उत्तम पुरुष आहे. तो विकाररहित असा परमात्मा होय. बदलणारे सर्व मायामय आहे. - 46

534. असार टाकून सार घ्यावे. शाश्वत काय आणि अशाश्वत यांचा विचार, ज्ञानी लोक निरंतर करतात.निदिध्यासाच्या ज्ञानाचे जेव्हां विज्ञान होते म्हणजे प्रत्यक्ष अनुभवांत येते. मनाचे मनपण जाऊन ते उत्मत बनते. या अवस्थेत अंतरात्म्याचे चंचलपण राहत नाही. आपण स्वत: अनुभव घेऊन जाणावयाचे आहे. अनुभवावाचून तक्रार करणे पाप आहे. -53

535. सत्य म्हणजे आत्मस्वरुप असत्य म्हणजे माया होय. मायामय दृश्य पाप ओसरले म्हणजे परब्रह्म स्वरुप हे पुण्य शिल्लक राहते. - 56

536. तीर्थात जाऊन मुंडन करुन, देहाला ताप देऊन, शेणाचे गोळे खावून गोमूत्र पिऊन या उपायाने देह बुध्दी जात नाही. आतील दोष काढण्यास आत्मज्ञानाचीच जरुरी आहे. सत्यस्वरुप परमात्म्याचे वर्णन म्हणजेच ज्ञानी पुरुषाचे रुप होय. - 63

## दशक अकरावा - भीमदशक. विचार 537 ते 544

## समास पहिला - सिध्दांत निरुपण 11/1

537.सृष्टीची उत्पत्ती - आकाशापासून वायू होतो. वायूचे कठीण घर्षण झाल्यापासून अग्नि, व मंद वायूपासून थंड पाणी निर्माण, पाण्यापासून पृथ्वी निर्माण होते. तिच्या अनेक बीजापासून वनस्पती, प्राणीमात्राची निर्मिती झाली. - 3

538. विश्वामध्ये दोन तत्वे एक चंचल आणि दुसरे निश्चल. सर्व चंचलाचा कर्ता चंचल, तो त्याच्या शरीरात राहून त्याचे शरीर चालवतो. तो करुन अकर्ता असतो. सामान्य माणसे, प्राण्याचा वरवरचा देह पाहतात. पण विवेकी माणसे त्याच्या अंतर्यामीच्या जाणीवकलकडे पाहतात. सर्व प्राण्यांस सारखेच समजतात व वागतात. - 20

539. अनेक प्रकारचे प्राणी निर्माण होतात परंतु त्या सगळ्यांना वागवणारी व चालवणारी जीवनकला एकच आहे तिला जगतज्योती किंवा जाणीवकला म्हणतात. हे विवेकी माणसे जाणतात. - 26

540. जी जीभेव्दारे रस, नाकाव्दारे वास, डोळ्याव्दारे दृश्य, कर्णेव्दारे देहसुख जाणते, ती सूक्ष्म आहे, स्थूल देहाचे देहसुख सूक्ष्म जाणीवकलेला अंतरसाक्षी किंवा अंतरात्मा म्हणतात. - 29

541.जीव जातो तेव्हां माणसाचा प्राण जातो. जीवाला कळत नाही, ते अज्ञान असते, जीव जन्मतो तेव्हां वासना साकार होऊन येते. हे सर्व चंचल आहे म्हणून विनाशी आहे. जे निश्चल असते ते अविनाशी असते. - 36

542. आरंभ, मध्य आणि अखेर या तिन्ही अवस्थामध्ये जी वस्तु विकाररहीत राहते. बदल न होता तशीच राहते. ती परब्रह्म वस्तु होय. ती निर्विकारी, निर्गुण, निरंजन, नि:संग व नि:प्रपंच असते. - 37

543. जीवाला उपाधी असतात, त्याचा निरास झाला की शिवाशी ऐक्य पावतो. त्याचेसाठी विवेक हा उपाय आहे. विवेकाने उपाशी राहत नाहीत. जे जाणतो ते ज्ञान, पण त्याचा अनुभव घेतला ते विज्ञान बनते. - 39

544. विज्ञानाने मन उन्मन होते. उन्मप हे सध्याच्या मनाला आकलन होत नाही. वृत्तिरुप ज्ञानास निवृत्ती कळत नाही. साधकास सद्‌गुरु विवेकाने गुणातील करुन सोडतात. साधक मनन, निदीध्यासाने आत्मवस्तूचा साक्षात्कार करतात. - 41

## दशक अकरावा - विचार 545 ते 550

## समास दुसरा - चत्वारदेव निरुपण 11/2

545. विश्वांत दोन वस्तु आहेत एक शाश्वत दुसरी अशाश्वत (माया) सारी माणसे अशाश्वत गुंतलेली असतात. काही शाश्वताचा शोध घेतात. त्यांत न्युनता नाही. सारासार विवेक करुन तो अत्यंत निश्चयपुर्ण स्थिर व शाश्वत बनतो. - 2

546. संशय घेणे, कल्पना करणे, भ्रम होणे हे सर्व अशाश्वत चे लक्षण आहे. शाश्वतामध्ये त्यांना स्थान नाही हे रहस्य माणसास समजले पाहिजे. - 8

547. समाजात खूप देव निर्माण झाले आहेत. त्यांचे महत्व निरर्थक आहे. भूते आणि देवता माहात्म्य एकमेकात मिसळले आहे. मुख्य देव कोणता हे कळेना कशाचाच मेळ नाही, स्वैराचारास आवर घालणारा आठवत नाही. - 21

548. बहुजन समाज वासना पूर्ण करणाऱ्या व्रताच्या नादी वेडा झालेला आहे. सत्यासत्याचा फरक राहिला नाही. अराजक माजलेले आहे. जो असत्याचा अभिमान धरतो त्याचा अध:पात होतो. ज्ञानी माणसे सत्याचा शोध घेतात. - 26

549. दैवाचे अवतार झाले. बरेच लोक त्याची पूजा करतात. देवाचे प्रतिमा म्हणजेच देव समजात. जप, ध्यान करतात. सर्वांचा अंतरात्मा त्याला काही देव

मानतात. तर काही विश्वाताम्यास देव मानतात. कधही न चळणारी अशी जी निर्मळ व निश्चल शाश्वत सद्वस्तु, ब्रह्मवस्तुस तदाकार झालेले काही लोक असतात. - 32

550. देवाचे चार प्रकार. (एक) नाना प्रकारच्या प्रतिक (दोन) देवताचे अवतार (तीन) सर्वांचा अंतरात्मा (चार). निर्विकार परब्रह्म असे मानवाच्या स्वभावानुसार मिळतात. - 33

## दशक अकरावा - विचार 551 ते 554

## समास तिसरा - सिकवण निरुपण 11/3

551. जीवनामध्ये फार विचाराने वागावे. प्रपंच आणि परमार्थ दोन्ही उत्तम साधावे. आळसाचे परिणाम लगेच दिसतात आळसामध्ये झोप सुखाची वाटते. आळस उत्साहाला मारक असतो. तो दुर्भागी असतो. आळस नसेल तर वैभव प्राप्त होते. समाधान मिळते. - 13

552. समर्थांनी सांगितलेला त्यावेळेचा योग्य दिनक्रम - सकाळी लवकर उठावे, पाठांतर करावे, भगवंताचे स्मरण करणे. दुरवर शौचास जावून यावे, स्वच्छ पाण्याने हातपाय धुवावे. आचमन करावे, दांत घासावे, स्नान करावे, संध्या करावी, थोडे खाऊन घ्यावे प्रपंचाचा उद्योग करावा व्यवसायात खबरदारी घ्यावी, बेसावध राहू नये. उत्तम व्यवसाय करुन घरी आल्यावर जेवण गोड लागते. - 21

553.प्रपंच व परमार्थ मिळून आयुष्याचा एकही क्षण फुकट जावू देऊ नये. जो सर्व बाजूनी सावध वागतो. त्याला दु:खाचा प्रसंग येत नाही. असा मनुष्य विवेकाने देहबुध्दी स्वार्थ सोडून देतो, त्याची वासना क्षीण होते, लालसा नसते. बंधमुक्त होतो. - 29

554.कर्म, भक्ति आणि ज्ञान यांचा समन्वय साधलयाने माणसाला आत्मसाक्षात्कार घडतो त्याला पूर्ण समाधान मिळते व ते कायम टिकते हेच परमार्थाचे साधन असल्याने नेहमी त्याचे श्रवण करावे. - 30

## दशक अकरावा विचार 555 ते 559

## समास चवथा सार विवेक निरुपण 11/4

555.जे अत्यंत निर्विकार व निराकार तेच ब्रह्म होय ते शाश्वत आहे. अंतरात्मा अशाश्वत असतो. अंतरात्मा म्हणजेच देव होय, तो सर्व जीवाच्या अंतर्यामी राहतो व त्याचे पालन करतो. - 2

556.अंतरात्मा नसेल तर देह अचेतन होतो. अंतरात्माने परमार्थ कळतो, कर्ममार्ग, उपासना मार्ग ज्ञानमार्ग, सिध्दांतमार्ग, प्रवृत्तीमार्ग, निवृत्तीमार्ग सर्व अंतरात्माच चालवितो. अशाश्वतीवाचून शाश्वत कळत नाही. - 6

557.अशाश्वत संपते तेथे शुन्य पुढे उभे राहते. त्याच्यापलीकडे शाश्वत असते. शून्य ब्रह्म नव्हे. अंतरात्मा सर्व दृश्याचे व कर्माचे मूळ आहे. प्रकृतीमुळे अस्तितवाने येणाऱ्या अंतरात्म्याला खरे अस्तित्व नाही. खरे अस्तित्व शाश्वत परब्रम्हात आहे. - 8

558.सार व असार दोन्ही एकच मानल्यावर विवेकाला जागाच उरत नाही. ते विवेक शून्य होते बदलणारा अंतरात्मा निर्विकारी ब्रह्म नव्हे शाश्वत व नश्वर काय हे आपणास कळत नाही. -16

559.जे घेणे योग्य आहे ते घ्यावे, जे घेणे योग्य नाही ते न घ्यावे. उत्तम कोणते आणि हीन कोणते हे बरोबर ओळखणे. याचा नांव ज्ञान होय. काही माणसे नरदेहाचा उत्तम उपयोग करुन अमरत्वाचा लाभ करुन घेतात. इतर फसतात देह वाया घालवतात. माणसाने श्रवण आणि मनन पुन: पुन: करावे. -30

## दशक अकरावा - विचार 560 ते 563

## समास पांचवा - राजकारण निरुपण 11/5

560.पुढारी लोकांनी राजकारण साधण्यासाठी भगवंताचा व संताचा विसर पडू नये, व्यवहारांत उत्तम चातुर्य असावे. सर्वत्र सावध असावे, अविरत उद्यागी असावे.

लोकांचे आक्षेप व संशय निरसन करावे. अनुयाच्या लहान मोठ्या चुकाबदल क्षमा करावी. - 5

561. पुढारी लोकांनी आपले क्षेत्र, व्याप वाढवावा पण त्यात गुंतू नये. सुरवातीपासून आपण आपल्याकडे कमीपणा व अज्ञानपणा घ्यावा, दुसऱ्याचे दोषावर पांघरुण घालावे व त्यांचे अवगुण बोलून दाखवू नये, दुर्जन आढळल्यास त्याचेवर उपकार करुन त्यास मिंधा करते. - 10

562. पुढारी लोकांनी दुसऱ्याच्या कल्याणासाठी कष्ट सोसावे. त्याच्या सुख-दु:खात वाटेकरी व्हावे, लोककल्याणासाठी गुप्त कार्य करावे. तापट व विवेक उण्या माणसाला दूर ठेवावे, अगोचर माणसाला आपले सुप्त बेत सांगू नये. भयग्रस्त दुबले याच्या मदतीला आपण धावून जावे. - 21

## दशक अकारावा- विचार 563

## समास सहावा महंत लक्षण 11/6

563.श्री समर्थांचा आदर्श महंत (पुढारी) त्याचे अक्षर सुंदर असावे, सुंदर बोलणे, सुंदर चालणे सुंदर, भक्ति, ज्ञान, वैराग्य सुंदर असावे. प्रयत्नवादी असावा, संकटास धैर्याने तोड देणारा असावा, अंतरात्म्याप्रमाणे महंताची अलिप्ता असावी, सर्वामध्यें मिसळणारा असावा, एकाएकी गुप्त होऊन एकांतात जाणारा असावा. नीती व न्यायाचे रक्षण करणारा श्री रामचंद्राप्रमाणें गुणी असावा. - 19

## दशक अकरावा - विचार 564 ते 567

## समास सातवा - चंचल नदी 11/7 निरुपण

564.मुळमाया चंचल व वासनामय असल्याने ती वाहत्या नदीसारखी आहे. ही नदी निश्चल ब्रह्मरुप पर्वताध्ये उगम पावते. सुक्ष्म व अदृश्य ब्रह्माकडून स्थूल व दृश्य विश्वायकडे वाहत जावे. परंतु अजून तरी तिला कोणी पाहिलेली नाही, तिच्यात भोवरे, तरंग व झरे आढळतात. मोठ्या खडकाने प्रवाह दुभंग होतो. - 3

565.मुळमाया नदीच्या प्रवाहात बरचसे जीव उगमाकडे पोहत जातात व ब्रह्मदर्शनाने पावन होतात. काही प्रवाहाबरोबर जातात. काही भोवऱ्यांत सांपडतात म्हणजे कांही नीच योतीत जन्मास येतात. जन्ममरणाच्या चक्रात सापंडतात, स्वार्थी देहबुध्दीने बर्हिमुख होतात. - 8

566.मुळमायाच्या प्रवाहात काही उगमाकडे पोहत पोहचतात उगमाचे दर्शनाने ते पवित्र झाले. सुक्ष्माकडून स्थूलाकडे धावणे हा मायेचा स्वभाव आहे. बलवान स्थूलाकडून सुक्ष्मांत शिरतात.अखेर निश्चल ब्रह्मापर्यंत पोचतात, पवित्र होतात. - 10

567.मुळमायेच्या प्रवाहात काही जाणने प्रवाहाच्या उलट दिशेने पोहत जातात. उगम पोहचल्यावर मागे बघतात तर मायानदीचे पाणी संपूर्ण आटलेले दिसते. त्याच्या दृष्टीने माया मुळी नाहीच आहे. - 21

## दशक अकरावा - विचार 568 ते 573

## समास आठवा अंतरात्मा विवरण 11/8

568.सर्व घटनांचा कर्ता, देवाचा मालक अंतरात्मा आहे. त्याचे ज्ञान करुन घ्यावे. त्याच्या सत्तेशिवाय पडलेले झाडाचे पान हलत नाही. त्याच्या चेतनेमुळे त्रैलोक्य हालचाल करते. सर्व देहामध्ये त्याचे सत्तेने लोभ ऐश्वर्य भोगतात. - 6

569.अंतरात्म्याचे ज्ञान ज्याला होते तो विश्वव्यापी बनतो. मग समाधी आणि सहजस्थिती महत्तव उरत नाही.ईश्वराशी तदाकार होण्याची स्थिती इतर सर्व अवस्थांच्या मानाने फारची पलीकडची असते. - 6

570.सर्व दृश्य विश्वाचे विवरण करीत गेल्याने अंतरात्म्याचे रहस्य आपोआप समजते. बुध्दीने विवरण करुन त्याचे ज्ञान करुन घेणे, कोणासही शक्य नाही. अगर थोडे झाल्यास त्यावरच समाधान मानावे लागते, देहधारी माणसास अनंत व अपार अंतरात्मा संपूर्ण समजेल. अस शक्य नाही. - 11

571.माणूस अपूर्ण तर अंतरात्मा पूर्ण आहे. पूर्णाला अपूर्ण आकलन करु शकत नाही. माणूस पूर्णाचे अखंड चिंतन करीत नाही. तसे केल्यास माणूस देवाहून वेगळेपण उरत नाही. त्यासाठी भक्त म्हणून घेणे शोभते. जो अंतरात्मा देहाला चालवितो त्याला माणूस जाणत नाही हे आश्चर्य होय. - 15

572.एकाद्याने घरातच संपत्ती ठेवलेली आहे. ती तो विसरला व संपत्तीसाठी दारोदार हिंडत आहे. अज्ञानी तसाच आहे त्याला अंतरीचा ईश्वर कळत नाही. तो बाहेरच शोधतो. - 18

573.चराचरामध्ये अंतरात्मा आहे. अनेकामध्ये एकच एक अंतरात्मा नटला आहे. काही ठिकाणी ग्रुप असतो तर काही ठिकाणी तो प्रकटतो. अशाश्वत मायेमध्ये जोपर्यंत आपण आहोत तोपर्यंत शाश्वत ब्रह्म मिळणार नाही. एका तत्वाने दुसऱ्या तत्वाचा निरास होत जातो तेव्हां देहबुध्दीचा क्षय होतो. मग चोहोकडे निश्चल व निरंजन ब्रह्म अनुभवास येते. विवेकाने संसार तारावा आणि भक्ति करुन उध्दार करावा - 25

## दशक अकरावा - विचार 574 ते 580

## समास नववा उपदेश निरुपण 11/9

574.जीवनामध्ये माणसाला कर्म करावेच लागते, कर्म उत्तम नीतीने करावे, कर्मामध्ये कांही दोष किंवा कमीपणा शिरला तर ते करण्यास विघ्न निर्माण होतात. अगर अडचण आल्यास भगवंताचे स्मरण करावे. - 2

575.आपण देवाचे प्रतिमाचे प्रेमाने पूजा करतो. परंतु तो परमात्मा ओळखून त्याची भक्ति करावी. नीट विचार करुन तो चांगल्या रीतीने ओळखावा, तरच दृश्याचे करुन तो चांगल्या रीतीने ओळखावा, तरच दृश्याने भरलेल्या भ्रमसमुद्राचा पैलतीर गाठता येईल. - 8

576.आपल्या अंत:करणामधील अंतरात्मा जागा करणे देवपूजेचेकार्य असते. प्रतिमा केवळ मनास आधार म्हणून उपयोगी पडते. अवतारी पुरुष चिरंजीव व स्वस्वरुपाने कायम असतात. जगत्-ज्योती त्याचे रुप होय. तिला शुध्द

सत्वगुण किंवा ज्ञान कला म्हणतात. अंतरात्मा आणि जगत्-ज्योती एकत्र आहेत. - 10

577.जगात राहणारा विष्णूच आपल्या अंत:करणांत आहे. तोच खरा कर्ता व भोक्ता आहे. हे चतुर माणसाने ओळखावे तोच आपल्या शरीरामध्ये ऐकतो, पाहतो, बोलतो, विचार करतो व जाणतो. - 15

578.जगाचे अंत:करण एकच आहे. देहासक्तीमुळे आपणास तसे अनुभवास येत नाही. देह संबंधाने माणूस वेगळेपणाचा अभिमान धरतो. मी देहच आहे अभिमानाने वेगळे जीवन जगतो. जाणीरूप सागरामध्ये देहाच्या अनंत लाटा येतात आणि जातात. देह उत्पन्न होतो व लय पावतो. - 17

579.आधी आपल्या देहामधील स्वस्वरुप अनुभवावे, मग्न विश्वामध्ये व्यापून असणारे ईश्वर स्वरुप अनुभवावे. तो अनुभव मागे टाकल्यावर शुध्द परब्रह्म अनुभवास येते ज्ञानाचे पर्यवसान विज्ञानामध्ये होते. - 22

580. जो साधक अखंड व निंतर चिंतनाने अंतरात्माशी अनन्य होतो. त्याचा मी पणा, ज्ञानेपणा, द्रष्टिपणा जावून त्याला आत्मसाक्षात्कार होतो. - 24

## दशक अकरावा विचार विचार 581 ते 582

## समास दहावा नि:स्पृह वर्तणूक 11/10

581. मूर्ख माणूस केवळ आकुंचित दृष्टीने जीवनाकडे पाहतो. चतुर माणुस सर्वांगीण दृष्टीने जगाकडे पाहतो. अंतरात्मा ज्याप्रमाणे अनेकामध्ये व्यापून नाना प्रकारची सुखे भोगतो, त्याचप्रमाणे चतुर माणुस अनेकांच्या जीवनातसमरस होतो अंतरात्माचा खरा महंत आहे. महान विशाल व थोर आहे तो सगळे जाणनारा योगी आहे. - 2

582. खरा महंत आत्मज्ञानी जीवनमुक्त अंत:प्रेरणे वागतो. आधी कष्ट व मग फळ असा जीवनाचा नियम आहे. श्रम केल्यावाचून निरुद्योयोगीपणाने जो जगतो तो वृथापुष्ट समजावा. ज्याची लायकी असते त्याच्या शक्तिप्रमाणे त्याच्या

हातून कार्य घडते, लायकी व शक्ति नसेल तर कार्य वाया जाते. असे लोकाचे अंतरंग महंत तपासून पाहतो. तरी महंतानेच दुसरा मंहत तयार करावा व त्यास युक्ति बुध्दि शिकवावी.- 25

## दशक बारावा - विवेक वैराग्य विचार 583 ते 587

## समास पहिला - विमललक्षण 12/1

583. आधी प्रपंच व्यवस्थित करावा नंतर विवेकाने परमार्थ करावा. प्रपंच सोडून परमार्थ कराल तर दु:खी व्हाल खायला अन्न मिळणार नाही व परमार्थ साधणार नाही. दोन्ही बरोबर चालवाल तर तुम्ही खरे विवेकी व्हाल. - 3

584. संसारामध्ये राहून जो मुक्तदशा अनुभवतो तो खरा योगी समजावा. योग्य काय अयोग्य काय याचा सारासार विचार करावा. जो सावधपणे प्रपंच करतो त्यास तितक्याच, सावधपणे परमार्थ करणे शक्य असते. जो प्रपंच धडपणे करत नाही त्याचा परमार्थ लटकाच असतो. - 9

585. माणसांत विवेकाने दुरदृष्टी असावी आपल्या परिस्थितीचा सतत विचार करावा. विवेकाने पुढे काय होणार याचा तर्क करावा. - 12

586. सावधपणा बाळगावा. समाधान मिळेल. परिस्थिती नीट समजून घ्यावी. संकट केव्हांही येऊ शकते. सकंट एकदा कोसल्यावर सावरासावर करावयास वेळ मिळत नाही. दुरदृष्टी असणाऱ्या लोकापासून आपण शहाणपण शिकावे. शिकणे जगाची रीत आहे. - 16

587.गुणवान माणसांतील गुण आपण अंगीकारावे. लोकामध्ये आढणारे अवगुण आपण सोडून देणे. संबंध येणाऱ्याची परीक्षा केल्यावाचून राहू नये. कोणाचे मन दुखवू नये. सर्वाची लायकी ओळखून रहावे. - 18

# दशक बारावा विचार 588 ते 593

# समास दुसरा प्रत्यय निरुपण 12/2

588. एकास अन्न, वस्त्र, निवारा मनासारखे मिळाले की सुख वाटते. दुसऱ्यास दु:ख वाटते. सुख दु:खाचे कारण आपण प्रारब्धावर ढकलतो. हे बरोबर नाही कारण बरोबर प्रयत्न करत नाही. जे करतो तसे फळ मिळते. आपले गुण दोष आपण पाहत नाही. - 6

589. लोकांना समजून त्याप्रमाणे त्याच्याशी आपण वागत नाही भांडणे होतात. सबंधीत लोकांची पारख करुन वागावे. दुसऱ्याच्या बोलण्यावरुन व हेतुवरुन त्याची परीक्षा चतुर व सावधपण करावी. लोकंनी आपणास चांगले म्हणावे वाटत असेल तर त्यासाठी झीज सोसावी. - 13

590.ज्याचे पटत नसेल त्याचे संपर्क सोडावे. खरे बोलणे व वागणे लहान थोर सगळे मानतात. जोपर्यंत आपली लायकी कळत नाही तोपर्यंत विवेकपूर्वक क्षमाशील राहावे. - 16

591. चंदन झिझल्याशिवाय सुगंध कळत नाही. माणसातील उत्तम गुण प्रकट झाले नाहीत तोपर्यत त्यांची योग्यता कळत नाही व लोकांचे प्रेम बसत नाही. सर्वांना खुष ठेवणे फारच कठीण असते. - 20

592. आपण जे पेरतो तेच उगवते, उसने घेतलेले तर ते फेडावेच लागते, आपण कोणाचे गुप्त रहस्य प्रकट केले तर त्याचे अंत:करण दुखावते लोकांशी चांगले वागले की आपल्या जीवनात सुखाची वाढ होते. जशास तसे असा नियम आहे. आपणास सुख भोगावयाचे का दु:ख भोगावयाचे हे सारे आपल्या हातात आहे. यासाठी दुसऱ्यास दोष देता येत नाही. - 23

593. आपणास दुसऱ्याच्या अंतरगाची परीक्षा करता आली पाहिजे. आपण एक दिवस मरणार हे ध्यानात ठेवून लोकाशी प्रेमाचे संबंध ठेवावेत. सर्व प्रकारच्या लोकांशी वाढते प्रेम असावे. आपण दुसऱ्याचे चांगले केले तर आपले चांगलेच होते. प्रत्यक्ष अनुभव आहे. - 28



## दशक बारावा - विचार 594 ते 598

## समास तिसरा भक्तनिरुपण 12/3

594.इहलोक व परलोकाचा विचार करुन विवेकपूर्वक वागावे जगांत यश येण्यास जाणत्याची संगती धरावी. परमार्थात यश येण्यास सद्‌गुरु अवश्य असतो. देव कोण व आपण कोण याचे विवेकाने मनन करावे. सद्‌गुरुस विचारावे. - 4

595. जे जे इंद्रियास दिसते ते ते नाश पावते. जे बनविलेले असते ते सारे मोडते. माणसावाचून माणूस उत्पत होत नाही. परब्रम्हपासून मुळ माया. पासून, अंतरात्मा पासून वायु पासुन तेज, पासून पाणी पासून पृथ्वी पासून वनस्पती पासून अन्न पासून वीर्य पासून माणूस निर्माण होतो. - 17

596.निर्गुण परब्रह्मांत - पंचभूते, अंतरात्मा आणि मुळ माया आढळत नाही. निर्विकार वस्तूच शाश्वत परब्रह्म आहे. आत्मानात्मचा विचार करा, सुक्ष्म विचारांत जावा, सुक्ष्मात सुक्ष्म विचाराने अशाश्वताचे कवच भेदून शाश्वतापर्यंत पोचता येते. तेथेच तो नाहीसा होऊन वस्तुदर्शन होते. - 21

597. मी कोण कळण्यासाठी देहातील तत्वे शोधा. मनांत उत्पन्न होणाऱ्या वृत्तीमध्ये मी तू पणाचे मूळ आहे. स्थूल, सुक्ष्म आणि कारण यांत देहाचा शोध घेतला तर हा खोटा मीपणा कोठे दिसत नाही. त्यांत मी तूपण पंचतत्वामध्ये विलीन होऊन जाते. दृश्य पदार्थ बाजूस सरतात. एकतत्व दुसऱ्यामध्ये विलीन होते. मी तू पणास जागाच राहत नाही केवळ ब्रह्मवस्तु उरते. - 25

598. आपण परमात्म स्वरुप आहोत तसा अनुभव येण्यासाठी आपण अनासक्त होऊन आत्मवस्तूशी तदाकार झाले पाहिजे. देव आणि भक्त याचे मुळ शोधून पाहिले तर सर्वउपाधी राहिल असा आत्मा शिल्लक राहतो. मीपणा नाहीसे झाले व आत्मानात्म विवेकाने वेगळेपण नाहीसे झाले म्हणजे वृत्तिरहित अवस्था होऊन उन्मतीपद होते. ज्ञानाचे विज्ञान होते, व्दैताचे अव्दैत होते., जन्म मरण संपते. - 30

## दशक बारावा विचार 599 ते 602

## समास चवथा - विवेकवैराग्य निरुपण 12/4

599. जो प्रपंचाची काळजी, दु:ख आणि पराधीनता यापासून मुक्त तो वैरागी असे. तो जर अविवेकी असेल तर संकटात सापडेल. अनर्थ घडून येईल, ज्ञानाला वैराग्याची पार्श्वभूमी नसेल तर ते तसेच ते ज्ञान व्यर्थ बडबड होय. - 8

600.वैराग्याचा पाया नसलेले ज्ञान खोटा अभिमान करते, वैराग्यहीन माणूस लोभी व ढोंगी असतो. अभिमानी जनास दुसऱ्याचा उत्कष सहन होत नाही. विवेकावाचून वैराग्य आणि वैराग्यावाचून विवेक असेल ते दु:ख वाढण्यास कारण होते. - 11

601. विवेकाने माणसाचा मी पण सुटतो. वैराग्याने प्रपंचाची आसक्ती सुटते. विवेक वैराग्य युक्त पुरुष आंतून व बाहेरुन मोकळा असतो. तो बंधरहित नि:संग योगी होय. असा योगी बोलतो तेच करतो. - 13

602. आस नसलेले जळजळीत वैराग्य असावे. स्वानुभवाचेब्रह्मज्ञान असावे. पुण्यमार्गीने भक्ति करणारे असावो, नुसते वैराग्य. दुराग्रही व वेडपट असते. नुसते शब्दज्ञान ओशाळवाणे व कंटाळवाणे वाटते. विवेक व वैराग् याचा संगम भाग्यशाली होय हे थोर भाग्य समजावे. - 20

## दशक बारावा - विचार 603 ते 607

## समास पांचवा - आत्मनिवेदन 12/5

603. वाणीचे चार प्रकार 1. परा - केवळ वायुरुप जाणीवेचे स्फुरण, ती केवळ स्फुर्तिरुप आहे. 2. पश्यान्ति - ध्वनी रुप आहे. 3. मध्यमा - ही नाद रुप आहे. 4. वैखरी शब्द रुप आहे. - 8

604. साडेतीन मात्रा अ,उ,म आणि वरील अर्धचंद्र मिळून ओंकार होते. ओंकारमधूनच सोळा स्वर व छत्तीस व्यंजने मिळून एकंदर बावन्न अक्षरे निर्माण होतात. - 9

605. पांचभूते आणि तीन गुण मिळून अष्टधा प्रकृती बनते तिच्यामध्ये जाणीवरुप वायु असतो तो चंचल असल्याने नाहीसा होतो. वारा नसताना आकाश केवळपणानेराहते. त्याचप्रमाणे आठ देहाचे निरसन झाल्यावर केवळ परब्रम्हच उरते. - 13

606. दृश्य पदार्थ जड असतात त्याच्या अंतर्यामी असणारा अंतरात्मा चंचल असतो या दोन्हीच्या पलीकडे राहणारे विमल ब्रह्मनिश्चल असते. वारंवार विवेक केला असता, जड व चंचल त्वरीत विरुन जातात आणि विचार करणारा निश्चल परब्रह्माशी तत्काळ तद्रूप होतो. - 15

607.आत्मनिवेदन तीन प्रकारचे 1. जड आत्मनिवेदन - मी व माझे सगळे भगवंताचे आहे. अशा भावनेने जगात वावरणे. 2. चंचल आत्मनिवेदन - जगदीश सर्वत्र व्यापून आहे खरा कर्ता तोच आहे प्रत्येक जीव त्याचा अंश आहे. 3. मायानिर्मित - आत्मनिवेदन स्वप्रकार असून जे दिसत असले तरी ते खरे नाही. अर्थात मी ही खरा नाही. मी नाहीसा होऊन निराकार व निश्‍चय ब्रह्मासी तदाकार आहे. यात मीपणाचा लोभ आहे. - 21

## दशक बारावा - विचार 608 ते 611

## समास सहावा - सृष्टिक्रम निरुपण 12/5

608.परब्रह्म अत्यंत निर्मळ व निश्चल, शाश्वत आकाशाप्रमाणे सर्वत्र व अत्यंत सुक्ष्म आहे. ते स्वत:च नवे रचत नाही. अविनाशी, व त्याचा शेवट नाही. - 3

609.ब्रह्मामध्ये संकल्प उठला अर्धनारीनटेश्वर, मुळ पुरुष म्हणतात. त्यातून मुळ माया (गुणक्षोभिती) बनते. त्यांतून सत्व, रज, तम, गुण प्रकार होतात. पुढे विष्णु (सत्वगुण, शुध्द जाणीव) आला नंतर ब्रह्मसंहारचे मुळ आले. सारे कर्तेपण रुद्राकडे असते नंतर पंचभूते - अष्टधा प्रवृत्ती आली. - 10

610. आकाश म्हणजे अंतरात्मा. त्यापासून वायू झाला - वायूमधून चंद्र आणि तारीका, सूर्य अग्नि आले. तेजापासून पाणी, पाणी पासून पृथ्वी होते. पृथ्वीपासून वनस्पती व प्राणी झाले. -16

611. जे जन्मास येते ते पुन्हा: विलीन होते. अंतरात्मा केवळ द्रष्टा आहे. साक्षी आहे. विवेक वाढवून प्रत्यक्ष अनुभव घेण्याचे काम आहे. केवळ भ्रमात्मक कल्पना करण्याचे साधन नाही. सारासार विचाराच्या सामर्थ्यानेच परब्रह्माची प्राप्ती होते. - 25

## दशक बारावा - विचार 612 ते 617

## समास सातवा - विषय त्याग 12/7

612. विषयाचा त्याग केल्याशिवाय परमार्थ साधत नाही परंतु माणूस जिवंत आहे तोपर्यंत विषय सुटणे अशक्यच आहे. वैराग्याच्या पार्श्वभूमीवर विषयाचा त्याग होतो, परमार्थ साधतो, वैराग्य मनाची अवस्था आहे. - 9

613. वैरागय नसेल तर योग्य परमार्थ होत नाही. ज्याच्यापाशी अनुभवाचे ज्ञान आहे, ज्याची आसक्ती सुटलेली आहे. विवेकाच्या जोरावर सर्वस्वाचा त्याग केलेला आहे. तोच सहायोगी ईश्वरी पुरुष होय. - 18

614. जी माणसे उच्च विचारापासून घसरलेली असतात व आचाराने भ्रष्ट असतात. ती माणसे लोभामुळे आत्मनात्मविचार करु शकत नाहीत. त्यांना सारासार विचाराचा विसर असतो. त्यांचे संताशी जमत नाही. - 22

615.विव्दान असून वाद करत नाही. वैराग्य संपन्न असून जो भ्रष्ट नाहीत, भगवंताचे भजन सोडत नाही अशी माणसे फार थोडी आढळतात. - 24

616.कष्ट केले असता शेतांत उत्तम पीक येते. भारी वस्तु तात्काळ विकली जातात. जो विवेक आणि वैराग्य संपन्न असतो, त्याच्याकडेच जाणते लोक जातात. - 25

617.मर्यादा सोडून असणारेदेह सुख सोडावे, योग्य तेवढेच देहसुख घ्यावे, विषय, त्यागाची लक्षणे ओळखून वागावे हे वैराग्य झाले. जे घडते त्याचा ईश्वर कर्ता आहे. प्रकृतीच्या पसाऱ्याला खरे अस्तित्व नही. असा निश्चय अंतरी स्थिर होणे हा विवेक होय. कशाचा त्याग करावयाचा व कशाचा नाही हे शुध्द तर्कानेच ठरवावे, बोलणे तसे चालाणे. - 30

# दशक बारावा - विचार 618 ते 622

## समास आठवा - काळरुपनिरुपण 11/8

618. ढग नसताना आकाश जसे निर्मळ अंतराळ असते तसे प्रकृती व तिचा पसारा नसताना निर्मळ परब्रह्म असते. ते निराकार काळवेळ रहित असते. उपाधीचा विस्तार झाला की काळ दिसू लागतो. उपाधी म्हणजेच माया अपदा प्रकृती. माया चंचल असते तोपर्यंत काळाचे अस्तित्व जाणवते. - 4

619. आकाश म्हणजे अवकाश - किंवा विस्तार - म्हणजे काळ होय. सूर्यामुळे आपणास विलंब कळतो व कालगणना करता येते. घटका, प्रहर, दिवस रात्र, पक्ष पंधरवडा, मास, वर्षे, युगे - व्रत, येता व्दापार व कली असे चार युगे आहेत. - 8

620. जेव्हां वस्तु असते एक पण दिसते भलतीच, तेव्हां त्यास हीन विवेक (अविद्या) म्हणतात. प्रवृत्ती अधोमुखाने सुक्ष्माकडून स्थूलाकडे धांव घेते. निवृत्ती उर्ध्वमुखीत स्थूला कडून सुक्ष्माकडे जाते. - 19

621. शहाण्याने विवेक वापरुन परमार्थ करावा म्हणजे जन्माचे सार्धक होते. भले लोक परमार्थ व प्रपंच दोन्ही साधतात. त्यासाठी विवेक करीत मुळापर्यंत गेले पाहिजे. - 23

622. विवेकहीन माणसे जनावरासारखीच असतात. पेरले तेच उगवते त्याचे फळ माणूस आता भोगतोच. जो भक्ति करेल त्यास भगवंत मिळेल, समाधानी होईल, दृश्य वस्तुची अनासक्ति ठेवावी. शांतपणे सूक्ष्म विवेक करावा. ईश्वरप्रति निश्चित होते. जरुरीची कर्मे प्रपंचात करावी, परमार्थ आडवा येत नाही. असे जनकादि राजे होऊन गेलेत. संसाराच्या बाजारात देवाचा नफा पहावा, करुन घ्यावा, श्रमाचे सार्थक होणे. - 34

# दशक बारावा विचार 623 ते 627

## समास नववा - यत्नशिकवण 12/9

623.माणसाने निराश न होता जगण्याचा निश्चय करावा. कोणतेही काम लहान असो वा मोठे असो केल्याशिवाय होत नाही. माणसाला भाग्यवान व्हावयाचे असेल तर त्याने मनापासुन विचाराने गोष्टी कामे करावीत. - 6

624. चांगला प्रयत्न होण्यास मनांत दक्षता पाहिजे. अगदी सावधता पाहिजे. ज्याच्या हातून दीर्घ प्रयत्न होत नाही त्या जीवनात सुखसंतोष येत नाही. - 7

625.आदर्श जीवन पध्दती - सकाळी लवकर सूर्योदयापूर्वी उठून भगवंताचे स्मरण करावे, वायफळ बडबड सोडून द्यावी. दूर शौचास जावून निर्मळ होऊन यावे. येताना काहीतरी घेऊनयावे रिकामे नको, पाय धुवावे, आपण धुतलेले कपडे वाळत टाकावे, देवपूजा व्यवस्थित करावी, नंतर फळाहार घ्यावा. जो व्यवसाय असेल तो करावा, लोकांना आपला, परका ओळखून चालावे. - 13

626. लिहीताना अक्षर सुंदर लिहावे, वाचनात स्पष्ट बरोबर वाचावे, विचार व मनन करुन खरा अर्थ घ्यावा. विचारायचे असल्यास नीटपणे व नेमके विचारावे. सांगावयाचे झाल्यास नीट, स्पष्ट करुन सांगावे. अनुभवावाचून ज्ञानाच्या गप्पा मारु नका, नीतीमत्ता, सावधनता ठेवावी, लोकास पसंत अशा रितीने कामे करावी, सर्वांचे समाधान करावे, भगवंत कथा करीत जावे. सदासर्वदा प्रसंगानुसार वागावे. - 17

627. आपल्या बुध्दीचे सामर्थ्य खूप वाढवावे. आपण ब्रह्मांडाहून विशाल व्हावे. इतका बुध्दीचा विस्तार करावा, करंटेपणा राहणार नाही. मूळ शंकेचे निराकारण प्रयत्नाने करावयास पाहिजे म्हाजे भाग्याचे दिवस येतील. - 30

# दशक बारावा - विचार 628 ते 632

## समास दहावा - उत्तम पुरुष निरुपण 12/10

628. उत्तम (ज्ञानी) पुरुष - आधी स्वत: उत्तम गुण अंगी आणावे. आचरावे नंतर लोकांना सांगावे. आचार व उपासना करावी स्नान, संध्या, देवाची पूजा, जय, ध्यान आणि निरुपण जरुर करणे. परोपकारी असावे. गांजल्यांना मदत करावी, मृदू बोलावे. क्षमाशील असावे, दुसऱ्याच्या मनांतील ओळखून त्याप्रमाणे धोरणाने वागावे. - 9

629.ज्ञानी पुरुष - हजर जबाबी असवे, क्रोधीत होऊ नये, व्देष करु नये, सावधपणे आपला संसार करावा, हरि भक्ति नेहमी असावे, बोलताना निवडून बोलावे, आळस सोडून प्रयत्न करावे. शिस्तीत वागावे, मेल्यावर किर्तीरुपे उरावे असे वागावे. - 13

630.उत्तम पुरुष - आपली शांती भंग होऊ नये, दुर्जनांशी समरस झाले पाहिजे. ज्ञान वैराग्य साभांळावे, स्वत: कष्ट करावे, दुसऱ्यासाठी सोसावे. आपली वाणी पवित्र ठेवावी,विनाकारण वाईट बोलू नये, दुसऱ्याचे अंत:करण दुखवू नये, गैर, कृती  करु नये, क्षमाशील असावे. - 20

631.ज्ञानी पुरुष - आपली दुसऱ्याची कामे मनापासून करावी. कामचुकारपण नसावा, गोड शब्द बोलावे, वाईट बोलून दु:ख देऊ नये. जे पेरते ते उगवते. या वैभवाने सर्वांना सुखी करावे. दंभ, दर्प अभिमान, क्रोध आणि कठोर वाणी कदापि नसावी मनापासून भगवंताची भक्ति करावी. - 31

632.थोर पुढारी पुरुषजे पुरुष जसे बोलतो तसे वागतात त्याच्या शब्दाला किंमत मिळते. जे लोकांच्या मनाविरुध्द जात नाहींत. माझेच खरे असे धरुन वागत नाहीत. सर्वांना बरोबर घेऊन जातात. पुढारीपण विवेकाने करतात, गैर समजाने आपआपसांत भांडत नाहीत. खूप लोकांना अपलेसे करतात त्याचे मागे लोक येतात व त्याचे ऐकतात. - 43

# दशक तेरावा - नामरुप विचार 633 ते 637

## समास पहिला - आत्मानात्मक विवेक 13/1

633. देहात राहणारा आत्मा देहाची पाहणे, ऐकणे, स्वाद घेणे, सर्व प्रकारची हालचाल अनेक प्रकारचे क्लेश करतो. विद्या व अविद्या मध्ये तोच असतो. आनंदरुपाने सुध्दा वावरतो. देह नाशवंत व आत्मा शाश्वत हे विचाराने पटणे हाच नित्यानित्य विवेक होय. - 23

634. पिडांच्या दृष्टीने देह धारण करणारा आत्मा तो जीव,ब्रह्माच्या दृष्टीने विश्वधारण करणारा आत्मा तो शिव, विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत आणि मुळ प्रकृती या चार प्रकारे ईश्वर विश्व धारण करतो. - 24

635. तीन गुणापलीकडे ईश्वरचा अर्धनारीनटेश्वरापासून सर्व विश्वाचा विस्तार झाला. निर्विकार ब्रह्मामध्ये जो संकल्प उठतो, तो अहंस्फुरणरुप असतो, त्याचे पंचभूत त्रिगुणात्मक अंग, ती मुळ प्रकृती आणितिच्यामधील शुध्द जाणीव तो अंतरात्मा किंवा मुळ पुरुष होय. - 25

636.ब्रह्मदेवापासून ते मुंगीपर्यत सगळे देहधारी आहेत. साकार आहेत. त्याला अनुसरुन नित्य काय व अनित्य काय याचा विवेक करावा. - 27

637.जे जड आहे ते अनित्य, सुक्ष्म आहे ते नित्य, समजावे. खेल विवेकाने सूक्ष्म मागे टाकावयाचे कारण, महाकारण देह मागे टाकायाचे, विराट, हिरण्गर्भ ईश्वर देखील ओलांडायचे वृत्ती, अति सुक्ष्म व विशाल होऊन अव्याकृत व मुळ प्रकती होते. त्या वृत्तीची निवृत्ती व्हावया पाहीजे. नित्य निराकार होते. - 3

# दशक तेरावा - विचार 638 ते 643

## समास दुसरा - सारासारा निरुपण 13/2

638. जे दिसते ते नासते, जे येते ते जाते, हे असार होय पण जे सदैव असतेच, तेच सार होय. नीट सारासार विचार करावा. नित्यनित्य विवेक बरोबर झाल्याने नित्य

अंतरात्मा निवृत्त होऊन निराकाशांत जातो. निर्गुण स्वरुप तर शाश्वत असते. जे येते आणि ज्ञाते ते अशाश्वत असते. - 5

639.चळते म्हणून त्यास चंचल म्हणतात. पळत नाही म्हणून त्यास निश्चल म्हणतात. अखेर ज्ञान आणि उपासना दोन्ही एक रुपच होतात पण उपासनमुळे जगाचा उध्दार होतो हे खरे. - 8

640. द्रष्टा, साक्षी, जाणता, ज्ञानधन, चैतन्यसत्ता, ज्ञान आणि देव ही सर्व अंतरात्म्याचीच नांवे आहेत. या ज्ञानाचेच शेवटी विज्ञान होते. अभ्यास केला असता हे सारे चंचल नाहीसे होते. त्याच वेळी ज्ञानाचे विज्ञान होते. - 10

641. ब्रह्म सर्व व्यापी आहे. ते ज्ञानचक्षूते अनुभवणे. ब्रह्मतूच आहेस सारासार विचाराने अनुभवास येते. साधकपणाने राहून संपूर्ण संगत्याग झाला की केवळ ब्रह्मउरते. साकाची वृत्ती शून्य होते. हाच खरा सारासार विचार. - 21

642. स्वत्: कल्पनातीत होऊन जो निर्विकल्प ब्रह्मामध्ये लीन होतो. तोच संत म्हणून ओळखावा. बाकीचे सगळे मायेच्या कक्षेतील असंत समजावे. ते भ्रमरुप असतात, जो खोटे सोडून खरे ग्रहण करतो, त्यालाच परीक्षावंत म्हणतात. जाणत्याने भ्रमरुप असार टाकून परब्रह्मस्वरुप सार घ्यावे. - 27

643. निर्गुण ब्रह्म जपण्याच्या पलीकडेच आहे. जाणून जाणता येत नाही. मी पणाचा संपूर्ण त्याग झाल्यावाचून ब्रह्म स्वरुप होता येत नाही. साधकाने मी पणाचा त्याग करावा आणि मौनगर्भ म्हणजे शब्दातील असणारे परब्रह्म अनुभवावे. - 17

## दशक तेरावा - विचार 644 ते 647

## समास तिसरा - उभारणी निरुपण 13/3

644.ब्रह्म सर्व ठिकाणी आहे. अगदी सुक्ष्म असल्याने पोकळ वाटते. ते आकाशातून विशाल, निर्मळ, निश्चल आणि निर्विकारी आहे. या अवस्थेत खूप काळ गेला. त्यांत चंचल संकल्प उठला त्यास नारायण म्हणतात. फळ माया, जगदीश्वरी म्हणतात. पुढे अष्टधा प्रकृती निर्माण झाली. - 4

645.परब्रह्मांतून मुळ माया, आदिनारायण, नंतर अष्टधा प्रवृत्ती पुढे तीन गुणाची गुणक्षे भिती, पुढे ओकार नंतर पंचभूताचा विस्तार पसरला, अंतरात्म्यास आकाश म्हणतात त्यापासून वायु त्यापूसून तेज पुढे अग्नि आणि पाणी व पृथ्वी तयार झाली. - 9

646.पृथ्वी व पाण्याची गाठ पडली पुढे वनस्पती, धान्य, फळझाडे निर्माण झाली. अन्नापासून वीर्य, पुढे प्राणी जीवची उत्पत्ती झाली. तेच अंडज, जारज, स्वेद्ज आणि उद्भजि प्राणी पृथ्वी व पाणी यांच्यापासून उपजतात. हे सृष्टीचे कौतुक आहे. - 14

647.जीवनामध्ये व व्यवहारामध्ये निर्णय घ्यायचा असेल तर प्रत्यक्ष अनुभवावाचून साधत नाही. जे केवळ कल्पनेने चालतात ते विवेकहीन होय. आरंभापासून अखेरपर्यत सगळे आत्मारामच घडवतो. तो जसे घडवून आणतो तसाच तो त्याचा उलघडा करतो. - 21

## दशक तेरावा विचार 648 ते 649

## समास चवथा प्रलय निरुपण 13/4

648.प्रलय - उभारणीच्या उलट प्रलयाचा क्रम असतो. सूर्याच्या बारा किरणामधून ज्वाला बाहेर पडतात त्यामध्ये पृथ्वी शंभर वर्षे जळते. जाळाने भाजून शेष विष ओकतो. त्यामुळे पाताळामध्ये भस्म होते. प्रत्ययाचा वारा सुटतो, अग्नि भडकतो, सर्व व्यापून टाकतो, वायू व विजा यांचे तडाखे बसतात, पृथ्वी तडकणे, चंद्र, सूर्य व तारे याचा एकच गोल् होतो. भाजलेला चुना जसा विरघळतो तशी पृथ्वी विरुन जाते. - 12

649.सात समुद्र (क्षार, क्षीर, सुरा, सर्पि, दाधी, इक्षु आणि जल रुपाहून वाढतात सर्वत्र जलमय होते, प्रलयाग्नीच्या वाऱ्याने अग्निविझतो. आकाशाची पोकळी अनंत असल्याने वारा त्यांत नाहीसा होतो. उरते परब्रह्म. - 24

## दशक तेरावा - विचार 650 ते 652

## समास पांचवा - कहाणी निरुपण 13/5

650. विश्वाची कहाणी - पिता मुळपुरुष शिव, माता प्रकृति, शक्ति, मुलगा विष्णु सत्वगुणी त्याचा मुलगा ब्रह्मदेव व पणतु तमोगुणमय रुद्र असे. पति पत्नीचे प्रेम होते. पुढे संसार वाढत गेला. - 3

651. विष्णुचा मुलगा ब्रह्मदेव तो उतावीळ, चंचल, अर्धा शहाणा, त्याने व्याप, संतती वाढविली, ब्रह्मदेवाचा मुलगा रुद्र तो मोठा रागीट, अज्ञानी, संहार करणे. हे काम त्याचे. - 7

652. विष्णुचा संसार व्याप वाढत गेला विष्णु सर्वज्ञ जाणता चांगला व वडील होता. ब्रह्मदेव सर्वांचे पालन करतो, परंतु त्याचा मुलगा अजाण फक्त संहारच करत असे. पुढे वडीलांचे कोणी ऐकेना, मानेना, कोण देवाला विसरले. ग्रहकलह पसरला, बेबंद शाही माजली. सर्वांचा संहार झाला. 14.

## दशक तेरावा - विचार 653 ते 658

## समास सहावा - लघुबोध 13/6

653.पंच भूते पृथ्वी, आप, तेज, वाय, आकाश आहेत. याच्या शाश्वत पणाचा विचार करा. पृथ्वी (जमिन) झीज भर होते. आप (पाणी) आटत जाते, तेज (अग्नि) पेटतो, विझतो, वायु (वारा) वाहतो व थांबतो आकाश (अवकाश) नांवापुरतेच आहे. कायम नाही. सर्व नाशवंत आहे. आत्मा शाश्वत आहे. - 11

654. आत्मा कळण्यास कठीण आहे. ज्ञानावाचून कळणे शक्य नाही, संताना विचारावे, तो अविनाशी, अजन्म निराकार आहे. निराकारांत आकाराचा भास होतो. म्हणून निराकार आणि आकार एकमेकापासून विवेकाने वेगळे करावे. - 14

655. निराकार हे नित्य व शाश्वत असते, साकार हे अनित्य अशाश्वत असते दोन्हीचे गुणधर्म विवेकाने जाणणे. यास नित्यानित्य विचार म्हणतात. पंचभूते नश्वर वर आत्मा शाश्वत, अगदी एकच आहे. विश्वव्यापी आहे. - 15

656. आकाश सर्व व्यापी आहे. आकाश आणि ब्रह्मवस्तु भेद नाही. अविनाश राहते ते ब्रह्म,मनन निदिध्यास अनुभवाने जाणावे, परमात्मा निराकार आहे. त्याचप्रमाणे आपण कोण ? याचाही विचार करावा. - 21

657. देहाचा अंत होताना वायु जातो - श्वास बंद पडतो. वायुशिवाय देहाला काही करता येत नाही, तसेच वायुला देहाशिवाय नाही. माणुस दिसतो, विचार केला असता तर काहीच नाही. यावरुन अभेद भक्तिचे लक्षण काय ते ओळखावे. - 25

658. मी कर्ता नाही तसे मी भोक्ता नाही हे दोन्ही खरे ठरते. त्यासाठी सुक्ष्म विचार करावयास हवा. विकारी पंचभूते आणि निर्विकार ब्रह्म, दोन्ही भिन्न आहे. जेथे सारासाराचे सुक्ष्म मनन नाही, तेथे परमार्थ काहीच नाही. जे खरे स्वरुप आहे त्याची कल्पना तेथे येणे शक्यच नाही. सुक्ष्माचा अनुभव नसणे, जन्मांधासारखे आहे निर्गुणाशी तद्रूप होणारा ज्ञानी त्रिवार धन्य होय. - 31

## दशक तेरावा - विचार 659 ते 663

## समास सातवा - प्रत्ययविवरण 13/7

659. आकाशांत जसा वायु तसा ब्रह्मामध्ये अंतरात्मा असतो. ब्रह्म निश्चल तर अंतरात्मा चंचल असतो. घटाकाश ब्रह्म तर घरातील पाण्यांतील प्रतिबिंब, अंतरात्मा असे. उत्पन्न होते नाश पावे, ते भूत, येते, जाते, ते सारे चंचल होय असे ओळखावे. - 5

660. कापूर पेटला की दोन्ही (अग्निसह) जळून नाश पावतो. त्याच प्रपोष अविद्या नाहींसी झाली, की अंतरात्मा नाहिसा होऊन, निश्चल ब्रह्म शिल्लक राहते.

सुक्ष्म आत्मा एकच, तया आत्म्यालाच जगास चालविणारा जगन्नायक असे म्हणतात. - 8

661. जड सारे अनात्म त्यास अंतरात्मा चेतना देतो. म्हणून त्यास सर्वात्मा म्हणतात. सर्व मिळून चंचलत्माच होय, पण निश्चल ब्रह्म नव्हे जे अत्यंत भ्रमरहित विमल ब्रह्म ते परमात्म समजावे. - 10

662. आत्मा सुक्ष्माकडे नेणारा (वर चढणारा) अर्थ. आंत उदय पावला तर अंतरात्मा सुक्ष्म बनतो. स्थुलामध्ये ओढणारा आत्मा असेल तर जड बनतो. माणसाने उत्तम मार्ग शोधावा व सर्व कांही सोडून एका देवाचा शोध घ्यावा. तरच त्याच्या जीवनाचे रहस्य उलघडते. - 21

663. माणसाकडे सुखाचा मोठा साठा आहे. वेडा अज्ञानाने त्या सुखास आंचवतो. नुसता ध्यास करतो. आणि दु:ख भोगीतच मरुन जातो. तरी शहाण्यानें असे न करता या जन्मांत भगवंताचे सुख मिळेल असे वागावे देवाचा शोधासाठी ब्रह्मांड पालथे घालावे, ब्रह्मांडाचे पलीकडे जावे, देव हस्तगत झाल्यावर सुखही सुख. कांही कमी पडत नाही. विवेकाने वागावे. - 27

## दशक तेरावा विचार 664 ते 668

## समास आठवा - कर्ता विवरण 13/8

664. विश्वाचा कर्ता कोण ? राम, कृष्ण, दत्त, खंडोबा, यमाई, लक्ष्मी सर्व प्रकारचे देव, ब्रह्मा, विष्णु, महेश, माया किंवा प्रारंब्ध यात खरे कोणाचे. जो ज्या देवाला मानतो तो त्याला कर्ता म्हणतो. अनेकाचा हा गोधळच आहे. - 22

665. आधी कर्ता, मग त्याने निर्माण केलेली वस्तु असते. ब्रह्म, सर्व देव पंचमभतात्मक आहेत. ते कर्ता नाही. त्याचे पलीकडे निर्गुण स्वरुप आहे. ते निर्विकार असल्याने कर्ता नाही. जाणत्या पुरुषांनी प्रत्यक्ष अनुभवाने ठरवावे. - 25

666.सारे दृश्य विश्व नश्वर आहे, निर्विकार स्वरुपाला विकार लावता येत नाही विश्व भ्रम आहे जे मुळांत नाहीच नाही. तयाचा कर्ता विचारणे गैर आहे. म्हणून हे विश्व स्वभावत:च झाले म्हणजे योग्य आहे. - 30

667. अखंड ज्ञान हा ब्रह्माचा मुळ स्वभावआहे ज्ञानात भेद, काल, देश, कारण, अपत्ती, संहार, विरोध दुसरेपण नाही. असे ज्ञानमय ब्रह्म जिकडे तिकडे स्वत:लाच पाहते. जे पुर्णा असते, स्वत:ला पाहू शकत नाही, म्हणून पूर्णच दृश्य विश्वाचे रुपाने, अपूर्ण होऊन, एकाचे अनेक होऊन स्वत:च स्वत:ला पाहते, - 31

668. सगुणाचा कर्ता आधीच असतो. जे निर्गुण आहे ते निर्विकारी असल्याने कर्ता होत नाही. सृष्टीचा कर्ता कोणीच नाही हे विश्व खरे नाही. चौकशी व्यर्थ आहे. याचा नीट विचार करा व अंतर्यामी प्रचिती आपले आपणच घ्यावी. - 36

## दशक तेरावा - विचार 669 ते 673

## समास नववा - आत्माविवरण 13/9

669. शरीराच्या साहयाने जीवात्मा जगतो. नुसत्या देहाला जिवंत पण नसते, नुसत्या जीवात्मा, पदार्थ उचलू शकत नाही. स्वप्नांत जेवले असतां पोट भरत नाही. परंतु झोपेत तो शरीर खजवले, देह व जीवात्मा वेगळे करणे व्यर्थ आहे. दोघांचे संयोगाने सर्व कार्ये होतात.- 5

670. शरीरांतील नाड्यामधून, अन्नरस, पाणी, वायू वाहतो त्या वायूबरोबर जीवात्मा संचार करतो. भूक तहान लागली ते जीवात्मा जाणतो. देह ती पूरी करतो. गोड पदार्थाचा जीवात्म्याला आनंद होतो तसेच इतर क्लेशही जाणतो. - 22

671. देहात राहणारा सुखदु:खे भोगणारा जीवात्माच होय. जीवात्मा देहांत नसेल तर देह प्रेतच होय. मनांतील वृत्ती जीवात्मा जाणतो. सर्वांच्या अंत:र्यामी जीवात्मा वास करतो जगाच्या अंतर्यामी जगदात्मा, विश्वाच्या अंतर्यामी विश्वात्मा अथवा सर्वात्मा असे अनेक रुपाने चालवतो. - 28

672. स्वाद, पाहणे, मऊ आणि कठीण, गरम आणि थंड सर्व अंतरात्मा ओळखतो. वायु सुगंध, दुर्गंध वाहुन नेतो, जीवात्मा व वायुची तुलना होऊ शकत नाही. वायुपेक्षा जीवात्मा अधिक सुक्ष्म आणि चपळ आहे. कठीण पदार्थास वायु अडकतो वर जीवात्मा त्यास पार करुन जातो. जीवात्म्याचा छेद करता येत नाही. - 35

673.शरीराचे उपचार जीवात्म्यास पावतात, शरीराच्या व्दारा जीवात्म्यास समाधान मिळते, देह व्दारा जीवात्म्याचे वासनेचे समाधान मिळते. देह नसेल तर त्याची अडचण होते. दोघांच्या संयोगाने अनेक गोष्टी होतात. दोघास वेगळे केल्यास एकटयाने काहीच होत नाही. संयोगाने त्रैलोक्याचा ठाव घेता येतो. - 40

## दशक तेरावा - विचार 674 ते 678

## समास दहावा - 13/10 शिकवण निरुपण

674.माळेच्या मण्यात ज्याप्रमाणे दोरा असतो त्याचप्रमाणे आत्मा सर्व वस्तुमध्ये ओवलेला असतो. पण हे अपूर्ण आहे. मणी, दोऱ्याच्या आधाराने राहतात. दोरा मण्याला व्यापून राहत नाही. देहात आत्मा राहतो. तो देहाचे सर्वांग व्यापून असते. आत्माचे ठिकाणी चेतना आहे. - 5

675. देह अनात्मा, तर देहांत राहणारा आत्मा होय. त्याहून परमात्मा तो श्रेष्ठ आहे. देव, दानव, मानव, हीन, नीच जीव असा भेद आहे. ईश्वराचे कांही भाग जग व्यापून आहे. हे खरे आहे प्रत्येक वस्तूचे व व्यक्तिचे सामर्थ्य वेगळे आहे. -10

676. पुण्यवान व पापी माणुस यांत एकच अंतरात्मा आहे. परंतु साधु अग्नि भोंदु, विव्दान आणि वात्रट, गंगेचे पाणी, आणि मोरीचे पाणी एकच नव्हे. निंद्य आहे ते सोडून द्यावे, जे हृदय आहे ते अंतःकरणांत वागवावे. - 20

677. उत्तम पुरुषास उत्तम आहे. तेच आवडते करंटे माणसास आवडत नाही. शहण्याने उत्तम लक्षणे स्वीकारावीत, हरिकथा नीति न्याय उत्तम लक्षणे आहे. सर्व लोकांना खूष ठेवणे, हीच उत्तम विवेकाने वागण्याची किल्ली आहे. लोकांना पुण्यशील करावे. - 23

678. ज्याला लोकांचे मनोगत राखायचे आहे. त्याने वेड्याला वेडा म्हणू नये. कुणाचेही वर्म उघडपणे प्रगट करु नये. प्रसंग येईल तो ओळखून योग्य असे वागावे. प्राणिमात्राच्या अंतरंगाशी अगदी एकरुप होऊन जावे. दुसऱ्याचे मनोगत भंग पावले तर परस्परांत संघर्ष निर्माण होतो. - 28

## दशक चौदावा - अखंड ध्याननाम विचार 679 ते 685

## समास पहिला नि:स्पृह लक्षणनाय 14/1

679. समर्थांची भाषा, बोलणे साधे पण अनुभवाचे आहे. नीट ऐकले तर निश्चित मंत्राप्रमाणे गुण देतात. अवगुण नाहीसे होतात. उत्तम गुण अंगी जडतात. कडक औषधासारखेच आहे. सर्वांनी प्रयत्नपूर्वक सेवन करावे. - 3

680. पुढारी, मठपती लोकांनी नि:स्पृहता धरु नये, पण धरीली तर सोडु नये. सोडली तर ओळखीच्या लोकांत वावरु नये. परस्त्री मातेसमान, मिंधेपण सहन करु नये. भिक्षा मागण्यांस लाजू नये, आचाराने भ्रष्ट नसावे. - 8

681. पुढारी मठ्पतीने स्वच्छ राहावे, वैराग्य सांभाळावे, विवेकाने वागावे, भगवंताचे नेहमी ध्यानांत असावे, चिंता करु नये, क्रोध नसावा. - 17

682. पुढारी मठपतीने कर्ममार्ग टाकू नये, वैराग्यास धक्का लागू नये, भजन सोडू नये, एके ठिकाणी जास्त वेळ राहू नये, साधेपणाने रहावे, केल्यावाचून दुसऱ्यास सांगू नये. - 36

683. पुढारी, मठ पती लोकांनी इंद्रिये व इंद्रिये सुख स्मरण करु नये, प्रसंग पाहूनच बोलावे, पैसासाठी किर्तन करु नये, गैरवर्तन करु नये, आपण सर्वज्ञ आहे ही भावना नसावी, ज्ञानाचा गर्व नसावा, वाद घालू नये. - 48

684. पुढारी मठपती लोकांनी स्वार्थी नसावे, प्रपंच्याची उपाधी नसावी, श्राध्द, बारसे, नवस भुताटकी अन्न खावू नये, भिक्षा व्रत सोडू नये. पगारी पूजापण घेऊ नये, उपाधी मध्ये पडू नये, सगुण भक्ती सोडू नये, मित आहारी असावे, फार झोपू नये, देहास त्रास देऊ नये. - 70

685. पुढारी मठपती लोकांनी ब्रह्मवस्तुचा साक्षात्कार होण्यासाठी आपले मन मारुन टाकावे लागते. मनाला शिल्लक उरु नये, पण मनावाचून असता कामा नये, ध्यानावाचून राहू नये, तर्कावाचून राहणे खरे नाही, भेदभाव नको, श्रोत्यांबदल वीट मानू नये. समाज उध्दाची भावना असावी. - 79

## दशक चौदावा - विचार 686 ते 690

## समास दुसरा - भिक्षानिरुपण 14/2

686. समर्थ - हा पुरुष भिक्षेकऱ्यांमध्ये श्रेष्ठ होता, तरी सुध्दा समर्थ पदवीला पोचला, तसेच दास असून सुध्दा हा स्वामीपदावर पावल. असा जो साधु रामदास स्वामी त्याची शोभा काय वर्णन करावी. इति विठाबा अण्णा. सर्मथाची भिक्षा म्हणजे भिकारीपण, लाचारी, दीनपण नाही. भिक्षा वैरागयाचे व भगवंतास भेटण्याचे साधन आहे. जो रोज भिक्षाने पोट भरतो, तो रोज अृताचे सेवन करतो. - 3

687. भगवंतास भिक्षा पसंत आहे. शंकर, दत्त, गोरखनाथ सिध्द पुरुष भिक्षा मागत होते. भिक्षा मागण्याने नि:स्पृहता प्रगट होते. रोज भिक्षा मागितल्याने रोजचा नवीनपणा असतो. - 7

688. भिक्षा मागून पोट भरतात त्याना देश, परदेश सर्वत्र स्वदेशच वाटतो. भिक्षा मागताना कुरकुर करु नये. लाजू नये, थकू नये, सारखे फिरत रहावे. भिक्षा म्हणजे कामधेनूच. भिक्षा मान्य नाही, असा वैरागी भाग्यहीन समाजावा. - 13

689. भिक्षेमुळे नव्या ओळखी होतात, माणुस निर्भय राहतो, त्याचे महंतपण दिसून येते. त्यास स्वातंत्र, वैराग्य आणि भगवंताची प्राप्त होते. - 14

690. भिक्षा म्हणजे अमृतवली, भिक्षा मागणारा कोणासाठी जड वाटत नाही, व्यापार, शेती प्रमाणे भिक्षेल प्रतिष्ठा, समाजिक स्थान आहे. महंताने भिक्षा मागावी. भिक्षेसारखे वैराग्य नाही आणि वैराग्यासारखे भाग्य नाही. - 19

## समास चौदावा विचार 691 ते 697

## समास तिसरा - कवित्व कलानिरुपण 14/3

691. परमार्थ क्षेत्रास कविला उच्च स्थान आहे. भक्तिमार्ग मुळत: नाद ब्रम्हाची उपासना असल्याने भक्तिमार्ग सर्वावर शारदा त्वरित कृपा करते. शब्दरुपी फुलांची माळा म्हणजे काव्य. त्याचा सुगंध म्हणजे, कवितेचा अर्थ, ही माळ अंत:करणात गुंफावी व श्री राम चरणी अर्पावी ओंकाराला शब्द ब्रह्म म्हणतात. - 2

692. कविता कशी असावी- भगवंताची भक्ति वाढविणारी विरक्ती उत्पन्न करणारी, स्वानुभावी असावी.  देव प्रसन्न झाल्यावर शब्द येतात, वाणी प्रकट होते, यालाच प्रासदिक काव्य म्हणतात. त्यामध्ये धीटपणाने, पाठांतराने व भक्तिवाचून केलेले काव्य असे तीन प्रकार आहेत. - 10

693. कविता कशी नसावी - वादविवाद नसावे, बेरंग करणारी नसावी, ओढून ताणून केलेली नसावी, पाल्हाळ आणि पाचकळपणा नसावा, हलक्या प्रतीचे नसवो, उध्दट व पाखंडी मतची नसावी. भक्ति, ज्ञान व वैराग्य याचा अभाव असणारे कवित्व नसावे. - 19

694. कविच्या हृदयांत भगवंताचे अखंडपणे ध्यान असावे. स्मरण असावे, आवड असावी, भगवंताच्या प्रेमांत रंगलेले असावे. अशा कविच्या अंतर्यामी भगवंत अचल आणि स्थिर असतो. तो जे सहज बोलतो ते ब्रह्मनिरुपण होय. - 25

695. साऱ्या संसाराबद्दल विरक्त पुरषास संत, मुक्त पुरुष म्हणतात. अशा कविची भक्ति शब्दरुपाने प्रकटने तिला प्रासदिक म्हणतात. त्याच्या बोलण्यांत सहन आत्मानात्म विवेक प्रकट होतो. - 34

696. उत्तम कविता ही भक्तिच्या थरांतून येते. तिच्यांत अहंकाराचा मागमूस नसतो, मन प्रसन्न करणारी व गोड असते. समजण्यास सोपी, भक्ति रसपूर्ण, मृदु, मंजुळ, कोमल, तशीच भव्य, अद्भूत, विशाल आणि व्यवस्थित रचलेली छंद, बंधयुक्त, मधुर रसांनी भरलेली असते. - 40

697. उत्तम कवितामध्ये अनेक प्रसंग, विचार, योग तत्वाबद्दल चर्चा असावी, साधने पुरश्चरणे, तपश्चर्यचे प्रकार, तीर्थाटने, देहबुध्दी, आत्मज्ञान, सद्बुध्दी, परब्रह्म मुक्ती, सद्बुध्दी या बद्दल उपयुक्त निरुपण असावे. - 52

## दशक चौदावा विचार 698 ते 702

## समास चवथा - कीर्तन लक्षण 14/4

698. कीर्तन लक्षण यांत चमत्कार आहे 'क' पासून 'क्ष' पर्यंत एकेक. व्यजनासाठी एकेक ओवी आहे. फक्त 'ज्ञ' साठी नाही. कलीयुगांत कीर्तन करावे. कौशल्याने कोमल गांवे, कर्कश नसावे, भांडण तंटा सोडून द्यावा, दुष्टाबरोबर विरोध करु नये. अभिमान नसावा, कोणाची गुप्त गोष्ट उघडपणे सांगू नये, त्याचे गुणच सांगावे. - 3

699. कीर्तनांत भगवंताची निरनिराळी नावे घ्यावीत, सगुण संपन्न किर्ती वर्णवावीत, लोक नाराज होतील असे करु नये. लोकांना बोचेल असे चुरचुर बोलु नये, कोणास फसवू नये, छळू नये, निरंजन जप करुन भगवंतास प्रसन्न करावे. - 8

700. अडाणी व निर्बुध्द माणसाची संगती नसावी, उगीच रटाळ भुणभुण लावू नये, मनांत अनिश्चतपणा नसावा दौलायमान वृत्ती बरोबर नाही. चुकीचे वर्तन करु नये. नेटकेपणा व सुसंस्कृतपणा असावा, अनेक गुणाने नम्र असावे, नियमाने बांधलेले वर्तन असावे. किर्तनांतील गाणे गोड तालबध्द, श्रोत्याचे देहभान विसरणारे असावे. - 16

701. कीर्तनाचे प्रभावाने पापे दूर जातात, पुण्य मिळते. किर्तनांत फसवाफसवी, कुटाळकी व निंदा नसावी, सांगितलेले पटले तरच घ्यावे, उन्मत होऊ नये, माझेपण व अहंकार नसावा, कीर्तन रसाळ, सुरेख रागदारीचे असावे, वायफळ नसावे श्रोत्याचे मन शीन करणारे असावे. सारासार विचार करणारे असे असावे. - 30

702. श्रोत्याला हसवून कीर्तनकाराला परमार्थ साधत नाही. लोकांना देहबुध्दी ओलांडुन त्यांना सुक्ष्म विहंगमय मार्गाने अलक्षी लय लावावा. क्षुब्ध होणे व शांत होणे हे दोन्ही गुण सर्वांच्या आत्म्यांत असतात. - 35

## दशक चौदावा - विचार 703 ते 709

## समास पांचवा - हरिकथा लक्षण 14/5

703. कलियुगामध्ये कीर्तनाला फार महत्व आहे. ज्ञानमार्गात भक्तिमार्गात एकाग्र सुक्ष्म विचाराने अंतर्मुख बनते, परमार्थ साधतो, चांगले कीर्तनाने हे होते. सोन्याला सुगंध असा अपूर्व योग आहे, हरिदास विरक्त, मोठा ज्ञानी, प्रेमळ, विव्दान, वादशून्य, किर्तनात जमते. - 5

704. उत्तम कीर्तनकार - ज्याला व्देषमत्सर माहीत नाही, ज्याचे मनांत भगवंतावर पूर्ण निष्ठा, ज्ञान, विज्ञान कला आणि लोकसंग्रह हे चतुरांग आहे तोच होय. - 6

705. सगुण मूर्तीपुढे 'निर्गुणच खरे, सगुण खरे नाही असा सगुणाचा उच्छेद करणारे हरिदास पढतमूर्ख समजावे. अशी हरीकथा कधी करु नये. सगुण आणि निर्गुण दोन्ही एकच समजावे. - 11

706. उत्तम हरिकथा भगवंताचे गुण वैभव किर्ती याचे वर्णन असावे सगुणाच्या प्रतिपादनामध्ये निर्गुण आणू नये. श्रोत्याचे गुणदोष काढून त्यावर बोळू नये, लोकाची लाज व पैशाची अशा सोडावी. - 16

707. कीर्तन करावे नभ्र, निशंक मनाने देवास साष्टांग नमस्कार घालावा, हातानी टाळ्या, पायाने नत्य व वाणीने नामाचा जयघोष करावा. ज्या देवासमोर कीर्तन असेल त्याचे वर्णन करावे, मुर्ती नसेल तर निर्गुणाचे, प्रपंच व वैराग्य याचे प्रतिपादन करावे. - 20

708. कीर्तनातस्त्रीयाचे श्रंगाराचे वर्णन केल्याने कामवासना वाढते, साधकाला जे बाधते ते कीर्तन टाळावे, उत्तम रागज्ञान, स्वरज्ञान असावे, विषयाचे अत्यंत तर्कशुध्द प्रतिपादन करावे, भगवंतावाचून कला ती कला नव्हेच अवकलाच होय. - 31

709.कीर्तन करताना स्वर, राग मध्ये गुंतू नये, मन ठेवून हरिकथाच करावी, खरा साधक सर्व कामे सोडून, आळस, स्वार्थ, झोप सोडून, हरिकथा ऐकतो. नामावर विश्वास ठेवतो. त्याची घरी भगवंत सेवा करतो, सहाय करतो. - 40

## दशक चौदावा - विचार 710 ते 714

## समास सहावा चातुर्यलक्षण 14/6

710. जन्मजात रुप, सौंदर्य हे गुण अभ्यासाने साध्य नाही व त्यावर इलाज नाही. म्हणून अभ्यासाने साध्य होणारे आगंतुक गुणाच्या मागे लागावे, बहिरे, मुकेपणा, पांगळा कुरुपता बदलता येत नाही, परंतु अवगुण सोडता येतात व उत्तम गुण अभ्यासाने मिळविता येते. शहाणपण चातुर्य असल्याखेरीज समाजात मान मिळत नाही. - 7

711. अंगी शहाणपण नसेल तर त्यास समजवून काय उपयोग, तो शहाणपण शिकत नाही, कष्ट करत नाही, तो स्वभावाने चिडचिडा असेल अशा माणसाची जीवनात प्रचिती येते. जो सन्मानाने जातो तो संताना व सर्व लोकांना आवडतो. आपल्या ज्ञानाने संपत्ती मिळवावी व ती मनसोकत भोगावी. -10

712. उसने घेतलेले फेडावे लागतेच. आपण लोकांना त्रास दिला तर परत आपणास त्रास सोसावा लागणार. आपणास समाधान प्राप्त होईल असे माणसाने वागावे. समाधानाने समाधान वाढते, स्नेहाने स्नेह वाढते. चांगलेपणा नष्ट करायचा म्हटले तर क्षणांत करतो येते. - 16

713. अहो तर काहो, अरे तर कारे अशी म्हण आहे शहाणपणाने अंतरंग शृंगारले जाते, तर वस्त्राने शरीर शृंगारले जाते, शरीराने, मनाने लोकांसाठी झिजले तर लोकांना भलेपणा मिळतो. नुसती कल्पना केल्यास कष्ट सोसावे लागतात. - 21

714. जो दुसऱ्याला सुखी करतो तो स्वत: सुखी होतो. दुसऱ्यास कष्ट दिल्यास पुढे आपणास कष्ट भोगावे लागतात. जीवन समजून वागावे, जेवढा व्याप तेवढे वैभव. ज्या मानाने वैभव असते त्या मानाने वागावे. त्यासाठी आळशीपणा सोडा,

मित्रत्व जोडा, वैर केल्यास मरणाचा प्रसंग येतो. सर्वांशी भांडत सुटल्यास लोकामध्ये एकट्याला यश मिळणार नाही. - 31

## दशक चौदावा - विचार 715 ते 719

## समास सातवा युगधर्म निरुपण 14/7

715. गृहस्थाश्रम हा सर्वा आश्रमांत उत्तम आश्रम आहे परंतु त्यांत स्वधर्माचे आणि भूतदया या दोन्ही गोष्टी असाव्यात, धर्मशास्त्राप्रमाणे सर्व क्रियाचे आचरण घडते. धर्मशास्त्राप्रमाणे सर्व क्रियाचे आचरण घडते. त्यांत अलौकिक असा भक्तिमार्ग आहे. - 6

716. जे काया वाचा, जीवाने, प्राणाने, भगवंतसाठीच कष्ट करतात, संसार सोडून भगवंताची भक्ति करतात त्याच्या अंत:करणापासून वैराग्य असते. विवेक असतो. आत्मसाक्षात्कार झालेला असतो, त्याच्या दर्शनाने लोक समाधान पावतात. - 13

717. परमार्थामध्ये स्वानुभव प्रधान आहे स्वानुभवाखेरीज इतर गोष्टी कामास येत नाहीत. कारण उपाय करावयास गेल्यास अपाय होईल. वेडा माणसाने संसार सोडून परमार्थ केला तरी, संसार व परमार्थही नाही. कष्ट भोगीत मरुन जातो. - 21

718. वासनेने बटबटलेला आणि वाईट वर्तनाचा माणूस परदेशात गेला. तेथे दुराचरण चालूच ठेवले, तर चोरीत सांपडून, आळ येऊन मार खातो, परंतु ज्यांनी खरोखर संसार मिथ्या आहे समजून ‘परमार्थ करतो, पावन होतो साधु होतो, अशाच्या संगतीने दुसरा तरतो, म्हणून सद्संगती धरावी. - 26

719. हलक्या दर्जाच्या माणसांकडे गुरुपणा गेला की मग आचाराचा लोप होतो. वेद, शास्त्र, ब्राह्मण नाहिसे होते. कलियुगामध्ये आचार लोप झाला आहे. विचार कोठे उरला नाही. येणाऱ्या काळांत तर वर्ण संकार होणार आहे. - 33

## दशक चौदावा विचार 720 ते 725

## समास आठवा अखंडध्या निरुपण 14/8

720. ज्याच्या अंत:करणांत भगवान तोच खरा भाग्यवान. भगवान शुध्द जाणीव स्वरुप आहे. प्रथम देव ओळखा त्या सर्वोत्माचेच ध्यान करावे. आत्मा जाणीवस्वरुप, द्रष्टा, अंतरसाक्षी आहे तोच देहाचे रक्षण करतो. - 5

721. एका प्राण्याचे अंत:करण म्हणजे सर्व जगाचे अंत:करण होय. म्हणून सर्वाचे अंत:करण सांभाळावे, ते दुखवू नये, दाता आणि भोक्ता प्रेमसंबंध जुळतो. दृष्टा प्राण्याच्या देह स्वभावामुळे वेगळा वाटतो, आकाराने वेगळा वाटतो, चराचरामध्ये तो एकच आहे. - 11

722. सर्व प्राणी जाणिवेने वागतात. आपली व जाणिवेची संगत अखंड असते. जाणिवरुप जगाचा अंतरात्मा खरा स्वामी आहे तो प्रसन्न करुन घ्यावा. त्यासाठी सर्वांना खुष ठेवावे. माणसाच्या देहाला बरे केले की ते त्याच्या आत्म्यापर्यंत पोचते. दुर्जनाशी भांडू नये व त्याची बरोबरी करु नये, हितकारक ते विवेकाने सज्जनपणाने करावे. - 17

723. सर्व प्राण्यांत राहणाऱ्या आत्म्याला साक्षीपणाने पाहिले पाहिजे, अंतरआत्म्याच्या साधनाने सर्व प्राण्यामध्ये भरलेला भगवंत पहावा. त्या अंतरात्म्यावाचून सर्व कार्यभाग अडतो सर्व त्याच्या सत्तेने घडते. त्याच्यामुहेच माणसू विवेक संपन्न बनतो. - 22

724. त्या सर्वोत्माचे अखंड ध्यान राखावे म्हणजेच त्याचे अखंड स्मरण ठेवावे. ध्यान देवाचे कि देवालयाचे करावयाचे, आत्मा देव असून देह त्याचे देवालय आहे. अनुमानावर आधारलेले ध्यान वेडेपणा होय, कल्पनेने कल्पना वाढते. स्थूलाचे ध्यानाने विनाकारण कष्ट होय. देहाशी ध्यानासंबंध म्हणजे भोग भोगणे, ध्यानांत अंतर आत्म्याचा अनुभव आला पाहिजे. - 32

725. ध्यान करताना मनांत एकहि विकल्प नको ध्यानंत ध्यान करणारा व ज्याचे ध्यान करतो तो दोन्ही समरस होणे. अनन्य होणे, वेगळेपण लोपणे हे ध्यानाचे प्रधान अंग आहे. ज्ञानी हे जाणतो व समाधानी राहतो. ध्यानाचा अनुभव येत नसता त्याचा अभिमान व्यर्थ आहे. विवेकाने मायेचा निरागस करुन परब्रह्मास स्पर्श करावा - 49

## दशक चौदावा - विचार 726 ते 731

## समास नववा - शाश्वत निरुपण 14/9

726. आत्मानात्म विवेकाने प्रत्ययास येते पिंड किंवा देह आम्ही आत्मा एक आहे व तो सर्व कर्ता आहे. मी आत्मा आहे असे वेदशस्त्र सांगते पंचभूतात्मक ब्रह्मांड हे पिंडाचे मूळ कारण आहे ब्रह्मांड कारण तर पिंड त्याचे कार्य होय. - 4

727. असार ते नाशवंत तर शाश्वत ते सार होय. पाण्यापासून पृथ्वी, तेजापासून पाणी, वायूपासून तेज झाले, वायु आकाशापासून झालेला असतो. सर्वत्र निर्गुण परब्रह्म असते, विश्व नाहीसे झाले तर परब्रह्म नाश पावत नाही. - 13

728. अंतरात्मा हा खरा देव तो सगुण आहे. निर्गुणाचे ज्ञान झाले की विज्ञान प्राप्त होते. कल्पनेचे पलीकडे असणारे ब्रह्म अत्यंत निर्मळ आहे. जे होते ते दृश्य अनुभवाने येते, विवेकाने अनुभवावे. - 15

729. एक ज्ञान, दुसरे अज्ञान आणि तिसरे विपरीत ज्ञान ही त्रिपुरी, त्रिपुरी क्षीण होता, विज्ञान प्रकट होते. विपरीत ज्ञान (भ्रमरुपी) नाश पावते, अज्ञान नाहीसे करणारे ज्ञानही शांत होते, अखेर विज्ञान कायमपणे येते. - 16

730. वेदान्त, सिध्दांत म्हणजे आत्मप्राप्ती नंतर निर्विकार परब्रह्म निरंतर प्रचितीला येणे. परब्रह्म ज्ञान दृष्टीने पहावे त्याच्याशी तदाकार व्हावे यालाच आत्मनिवेदन म्हणतात. दृश्य आणि यासह याच्या पलीकडे अविनाशी परब्रह्म असते. विश्वांत सर्वत्र, सर्वच ठिकाणी परब्रह्म आहे ते निश्चल आहे. - 21

731. जो देवाला ओळखतो भलत्यास देव म्हणार नाही तो स्वत: देवस्वरुप बनून जातो. माया अलीकडे आणि परब्रह्म पलीकडे असा प्रकार आहे. मायिक खोटे ते सर्व

सोडावे, स्वत: अनुभवाने खरे काय ते ओळखावे. मायेचा त्याग करून परब्रह्मचे दर्शन घ्यावे. - 30

## दशक चौदावा - विचार 732 ते 734

## समास दहावा - माया निरुपण 14/10

732. वस्तु असते एक आणि दिसते भलतेच याचे नाव माया, मायेचे विश्व दिसते पण नाशवंत आहे माया सत्य वाटते पण खोटी असते, स्वप्नाप्रमाणे खरे वाटतात ते सगळी भास असते. दस-ाला आपटयाचे पान सोने म्हणून देतात. माया अशीच आहे. - 6

733. प्रेताचा उत्सव करणे, सतीचे वैभव वाढविणे, स्मशानात जाऊन रडणे हे सर्व माया आहे, ठेवलेल्या बाईला अथवा नुसते नांव असलेल्या लक्ष्मी म्हणजे बहुरुपी राजाचे सोंग घेणे, देव्हाऱ्यांत अन्नपूर्ण आहे पण अन्न नाही असे सर्व भ्रम आहेत. 13

734. चांभारणीचे नांव काशी, मांगिणीचे नांव तुळशी, छायेतील वस्तु सर्व भास मात्रच असते. अज्ञानाच्या अंधारात वावरणाऱ्या मी ला छायारुप विश्व दिसते. अज्ञानी अहंकाराला ज्ञानमय ब्रह्मस्वरुपाचे खरे ज्ञान शक्य नाही. भ्रम आहे विश्व ब्रह्मस्वरुप असून दृश्यपणे दिसते मायेमुळे असे घडते. - 21

## दशक पंधरावा - आत्मदशक विचार 735 ते 739

## समास पहिला - चातुर्य लक्षण 15/1

735. जीवाच्या अंतयोगी राहणाऱ्या ईश्वररुपी अंत:करणात जो जाणतो तोच खरा चतुर होय, देह हाडामासाचा असला तरी त्यात ईश्वर वास करतो. त्याच्याच बरोबर जीव राहतो, माणसाना वश करण्यासाठी त्याच्या अंतर आत्म्यांत आपला अंतरात्मा मिसळवा विवेकाने मने मिळवावीत, बदल घडून येतो. - 1

736. दुसऱ्याचे अंत:करण कळत नाही तोपर्यंत लोक वश होणे कठीण आहे. अंतरात्मा सर्वत्र असल्याने वशीकरणाने चेटूक करणे मूर्ख आहे. त्यासाठी विवेक करावा. तोच श्रेष्ठ होय. श्रेष्ठ माणसे सदैव श्रेष्ठ कामे करतात. कृत्रिम कामे करतो तो कनिष्ठ असतो. चतुर चतुरासच कळतो. - 13

737. जगाच्या अंतरंगाशी जो मिसळतो तो ते अंतरंग बनतो. त्यास इहलोकी परलोकी काहीच कमी नाही. बुध्दी उपयोग करावा. जगात सर्व स्वत:ला सुंदर, चतुर, शहाणे समजतात हे शहाण्याने ओळखावे, खोटयाचा अभिमान धरणे व खरे सोडणे हे मूर्खपणा होय. सत्याचा अभिमान न्यायमय असतो. ते शाश्वत राहते. बेशिस्त व शिस्त सारखेच नसते. - 21

738. चतुर पुरुषांशी बाजार बुणग्याचे कांही चालत नाही. समाजातील मुख्य माणसाशी संबंध जोडावा, त्यामुळे असंख्य लोक आपणास वश होतात. चतुराचे चतुरपणा दुसऱ्यास कळला की दोघाचे मत जमते. हे गुप्त करावे. - 26

739. ओळखीने ओळख वाढवावी आपल्या बुध्दीने लोकांची बुध्दी प्रगल्भ करावी. अनिती मताला थारा देऊ नये. साधा वेश असावा परतु अंतर्यामी अनेक कला संपन्न असावे. साऱ्या लोकाचे अंत:करण सांभाळून असावे. सर्वांना उत्तम गुणामुळे समाधान लाभते. - 35

## दशक पंधरावा विचार 740 ते 741

## समास दुसरा - नि:स्पृह व्याप 15/2

740. रामदास कालीन भारतीय सामाजिक परिस्थिती फार दयनीय झाली होती. जितक्या मुर्ती तितक्या प्रकृति - पुष्कळ लोक बाटुन मुसलमान, पोर्तुगीज, इंग्रज धमाचे झाले. केवळ राजकारणी लोकामुळे. युध्दामुळे झाले. सर्वजण गडबडीत जेवावयालाफुरसत नाही. या सर्वात खरे ज्ञान दुर्लभ झाले. विचारवंतास ते सुलभच आहे. - 12

741. परिस्थिती चांगली नसतानाही चतुर ज्ञानी पुरुष मार्ग काढतो. ज्ञानाचे सामर्थ्याने वाकडी वाट सरळ करतो. लोकांना जागे करतो. अनुभवाच्या जोरावर सर्व मते

जमीदोस्त करतो. परंपरा सोडून लोकांना बरोबर मार्ग दाखवितो, वैराग्यशील वृत्तीने, स्वानुभवाचे ज्ञानाने लोकांना आवडतो. डोंगरात राहून आपले काय गुप्त राहून करतो. - 24

## दशक पंधरावा विचार 742 ते 746

## समास तिसरा - श्रेष्ठ अंतरात्मनिरुपण 15/3

742.सर्वविश्वात पंचमहाभूताचा पसारा आहे. त्यामध्ये अंतरात्मा सर्वत्र आहे. तो जाणीवस्वरुप, साक्षी रुपाने अंतरात्मा अखंड आहे. राजा सिंहासनावर बसतो सैन्य त्याच्या बाजूस असते. अंतरात्मा एक तत्व आहे व जगांतील इतर तत्वे राज्याच्या फौजेसारखी आहे. राजा प्रजा देह सारखे त्याप्रमाणे पंचभुते व अंतरात्मा दोन्ही तत्वरुप आहेत. - 3

743. ज्यांना अति विशाल जाणीव असते तो तितका भाग्यवान असतो, ज्यांना अल्प जाणीव असते ते लोक दुर्दैवी असतात. जी माणसे व्याप वाढवतात, खटाटोप करतात जीवनांतील धक्के व भार सोसतात ती भाग्यवान बनतात. - 7

744. जगांतील थोरपणा लहानपण माणसाच्या विवेक शक्तिमध्ये असते, राजा वयाने लहान असला तरी वृध्द त्यास नमस्कर करतात. वयाने लहान भाग्याने मोठा झाल्यास काही लोक त्याला महत्व देत नाहीत, आपणही अशाना दूर ठेवावे. - 13

745. गुणावाचून थोरपण येते असा अनुभव आहे. तरी वयाने वडील माणसास मान द्यावा. अंतरात्मा खरा वडील आहे. माणसाने विवेकाचे बळाने शहाणपण शिकावे. जो शिकत नाही त्याचे महत्तव उरत नाही. - 20

746. शहाण्यास लोक आपणहुन बोलावतात, मूर्खास बाजूस सारतात, ज्याला संपत्ती आवडेल, हवी असेल त्यानी शहाणे व्हावे, कष्ट करुन शहाणपण शिकावे, शहाण्यास जगांत कमी पडत नाही, जो आपले हित करत नाही. तो आत्मघातकी समजावा. त्यास कष्ट पडतात, बोलणी खातो. तो पातकी, मुर्ख समजावा. - 28

# दशक पंधरावा विचार 747 ते 750

## समास चवथा - शाश्वत ब्रह्मनिरुपण 15/4

747. एक भूत दुसऱ्या भूतात विलीन होते. अखेर सगळे दृश्य लय पाहून शाश्वत ब्रह्म उरते. पृथ्वीपासून झाडे, पुढे लाकडे पुढे त्याचे भस्म म्हणजे पृथ्वी होते. पृथ्वीपासून धान्य, फळे ते खावून माणसे पशु,पक्षी जगतात, मरतात, परत त्याची माती पृथ्वीच होते. - 5

748. मातीचे सोने बनते, मातीचे पाषाण बनते. अग्निने पाषानाची माती होते. सोने वितळून रस होतो. ज्याप्रमाणे पृथ्वी पासून पदार्थ होतात आणि अखेर पृथ्वीतच लीन होतात त्याचप्रमाणे सार विश्व मुळ मायेतून प्रगट होते आणि अखेर तिच्यातच लय पावते. - 18

749. भूत शब्दाचा अर्थ मुळी “जे काही निर्माण झाले ते” असा आहे. म्हणून पंचभूते नाश पावतात, त्यानंतर शाश्वतपणे जे उरते ते परब्रह्म होय. ते परब्रह्म कळत नाही तोपर्यंत जन्ममृत्यू चुकत नाहीत. जडाचे मुळ चंचलामध्ये आहे आणि चंचलाचे मुळ निश्चलामध्ये आहे. पण निश्चलाचे मुळ आणखी कशांत नाही. हे नीट समजून घ्यावे. - 25

750. विश्व खरे मानने हा पूर्वपक्ष, ते खरे नही. मानने हा सिध्दांत पक्ष, या दोन्हीचे पलीकडे सर्वच भरलेले आहे. ते परब्रह्म होय. माया नि:शेष निरास पावली की खरे आत्मनिवेदन घडते. माया नि:शेष निरास पावली की खरे आत्मनिवेदन घडते. ज्याठिकाणी शब्द पोचू शकत नाही त्या विज्ञानाचे ज्ञान स्वानुभवावाचुन घडणे शक्य नाही. लोक बोलतात त्याच्या नादी लागतो, तो अनुमानाच्या चंचलपणाने बुडतो, वाया जातो म्हणून साधकाने अनुभवाच्या ज्ञानाकडे वळावे. - 31

# दशक पंधरावा विचार 751 ते 756

## समास पांवचा - चचळलक्षण 15/5

751. शक्तिमय प्रकृति आणि जाणीवमय पुरुष याच्या मार्गदर्शनाखाली तीन गुण (सत्व, रज, तम) आणि पंचमहाभूते मिळून अष्टधा प्रकृति बनते. ती असते निर्गुण ब्रह्मांतपण ती सुक्ष्म व चंचल आहे. परंतु परब्रह्म निश्चल, दश्य विश्व जड तेही काही करत नाही. या दोघांमध्ये वावरणारी अष्टधा प्रकृती विश्वरचनेख खेळ आहे. - 1

752. परब्रह्म मुळपुरुष अंतरात्मा, त्याचा मुलगा विष्णु (सत्वगुण) त्याचा मुलगा ब्रह्मदेव (रजोगुण) त्याचा मुलगा महेश (तमोगुण) म्हणजे महेश परब्रह्मचा पणतु होय. तमोगुण सत्वगुणास (ज्ञानास) झाकून टाकणे. रजोगुणाचा (इंद्रियभोगाचा) जोर झाल्यास सत्वगुण लोपतो, इंद्रिय भोगामुळे माणुस भगवंत विसरते. - 2

753. प्रत्येक पिंडात अंतरात्मा वास करतो, पण दर्शन नाही देहाची पूजा केली की ती अंतरात्म्याला पोंचते. अंतरात्मा असंख्य रुपे धारण करते पण तो एकच असतो. तो एकटेपण भंगू देत नाही. हीच विलक्षण कला प्राणीमात्रात आहे. - 9

754.दगडाच्या अंतर्यामी मुळापासून शेंड्यापर्यत पाणी असते त्याच प्रमाणे प्राणीमात्रामध्ये आहेत. झाडापासून झाडे होतात माणसे माणसांना सांभाळतात माणूस स्वत:च्या बुध्दीप्रमाणे विश्वाच्या उत्पत्तीबद्दल कल्पना करणे ते जाणते जाणता. -16

755. स्वानुभवाखेरीज आत्मसाक्षात्कारा वाचून विश्वाचा जनक कळत नाही. त्याची ओळख करुन घ्यावी. अंतर्यामी आपल्याला आपलीच भेट होईल. आपण जगांत व्यापून आहोत अनुभव येइल. अंतर्मुख होऊन अंतरात्म्याशी स्थिर होणाऱ्या पुरुषाची पातळी फार श्रेष्ठ असते. साधकाने आपले मन सुक्ष्म करुन इतराच्या मनांत मिसळावे. अशाने ते विशाल होऊन व जगताशी एकरुप होईल लोकांचे अंत:करण खुश ठेवावे नाही ठेवले तर खायला मिळणार नाही. - 20

756.मन दुसऱ्याशी तदाकार करा. मीपणा सोडा. कल्पना विराम पावते. निश्चल ब्रह्म दिसते. कर्म, उपासना आणि ज्ञान असे वेदाचे तीन विभाग आहेत वेदांची हद्द ज्ञानपर्यंत असते. साक्षात्माराने ज्ञानाचे विज्ञान होते, विज्ञान वेदाच्या पलीकडे आहे. - 32

## दशक पंधरावा - विचार 757 ते 761

## समास सहावा - चातुर्य विवरण 15/6

757. मानवी जीवनांत ज्ञानास परमोक्ष स्थान आहे ज्ञानच खरे सामर्थ्य प्रदान करते. ग्रंथातील ज्ञानाचे महत्तव ध्यानांत आले तर मूर्ख माणूससुध्दा शहाणा बनतो.त्याचप्रमाणे परमार्थाचा अनुभव येण्यास उशीर लागत नाही. - 5

758. कागदावरील रेखा पुसली जाते असा प्रत्यक्ष अनुभव येतो. त्याचप्रमाणे हातावरील रेखा प्रारब्ध पुसले जाईल याकडे डोळेझाक करण्याचे कारण नाही. माणसाने स्वत: विचार करावा सर्वांचे ऐकावे. खरेखोटे निवडून निश्चय करावा अनुभवानेच ठरवावे. दुस-याचे मन वश करुन वेड्याला शहाणे करावे. वाद वाढवू नये. - 15

759. कोणास नाही म्हणू नये. अपाय व उपाय समजून असावे. स्वत: प्रचिती पहावी. प्रसंगानुसार करावे. पुष्कळाचे मन संभाळावे, वाकडेपणा ठेवू नये, प्रसंग पडल्यास पडते घ्यावे आणि दुसऱ्यास उलथून पाडावे. विवेकाचे जोरावर आपले अंतरंग कळू देऊ नये. - 16

760. जो दुसऱ्याचे हित पाहतो, विरुध्द करत नाही. त्याचे मन वश करुन घेतो. सुधारतो त्यास परमार्थ साधून देतो. वायफळ बडबड करीत नाही, भांडण करत नाही तोच चतुर होय. - 21

761. जो संकटाचे आघात सहन करतो. अपशब्द गिळतो प्रसंग पाहून तसे बोलतो जाणतेपणा आपल्याकडे घेत नाही, जेथे जातो तेथे लीन असतो, माणसे पारखून त्याचे गुण घेतो. शहाण्या माणसाशी स्नेह जोडतो. उगाच एके ठिकाणी बसत नाही. सावधपणाने विवेकाने परिस्थितीची माहिती घेऊन वागतो. ज्याला हवे ते त्याला देतो त्यामुळे श्रेष्ठपणा येतो तो खरा चतुर होय. - 28

# दशक पंधरावा विचार 762 ते 767

# समास सातवा - अधोर्धनिरुपण 15/7

762. मुळमाया (जाणीव) निश्चल, परब्रह्मामध्ये चंचलपणे पण अति सुक्ष्मपणाने राहते. प्रकृति पुरुष, शिवशक्ति, अर्धनारी नटेश्वर या सर्वाचे फळ जगत् ज्योतीचे होय. पाने फुले, फळे याचे मुळ अगदी सुक्ष्मपणे वेलीच्या मुळयांतच असते. बीजांत असते. तसेच मुळमायेचे तीन गुण आणि पंचभूते सुक्ष्म रुपाने मूळ मायेत असतात. अनुभवाने खात्री करावे. - 9

763. सामान्य लोकाचे जन्म मरणाचे फेऱ्या चालू असतात, परंतु आत्मज्ञानी पुरुषास त्या घालाव्या लागत नाही. त्यासाठी साधना करावी लागते यात शंका नाही. प्रत्येकाचे अंतरी आत्मज्ञान आहे. हे सर्वांना कळत नाही त्यासाठी साधना करावी लागते. - 20

764. अंतरीच्या आत्मज्ञानामुळेच जीव आपले कार्ये करतात. इंद्रिये भोग भोगतात. त्या ज्ञानाचे ज्ञान होण्यास स्थूलाचा त्याग करुन सुक्ष्म क्षेत्रात शिरणारा मनुष्य लागतो. आपल्या अंतरीचे स्वरुपच जगाच्या अंतर्यामी भरलेले आहे. फक्त शरीराचे आकार निरनिराळे दिसतात. दुसऱ्याचे शरीर दु:ख आपणास अनुभवता येत नाही. - 25

765. एकाच पाण्यावर निरनिराळी वनस्पती वाढतात. ज्या जाणिवेने शरीराचे दु:ख कळते त्याच जाणिवेने दुसऱ्या शरीराला दु:ख समजते. प्रत्येकाळी आत्मा एकच आहे पण भिन्न देहस्वभावामुळे भेद असतो. चतूर पुरुष लोकांचे अंत:करण वश करुन घेतो. - 31

766. आपले स्मरण म्हणजे देव, विस्मरण म्हणजे दानव या दोन्हीचे मिश्रण म्हणजे मनुष्यप्राणी होय. विवेकाने ओळखावे. आत्म्याने दुसऱ्याचा आत्मा ओळखावा, आरशामध्ये दिसणारा डोळा आपल्या डोळ्याने पहावा लागतो. - 37

767. स्थूलाने स्थूल खाजवावे, त्याप्रमाणे सुक्ष्माने सुक्ष्म समजून घ्यावे, सुक्ष्माची खुण सुक्ष्मानेच अंतरी बाणवावी. आपल्या विचारावरुन दुसऱ्याचा विचार जाणावा. तसेच

अंत:करण जाणावे. स्थूलामध्ये ज्ञाता हा ज्ञेयापासून सदैव वेगळा असतो सुक्ष्मामध्ये ज्ञाता हा ज्ञेवाशी अधिकाधिक तादात्म्य पावतो. मी आत्मस्वरुप आहे हे स्मरण तर मी देह आहे हे विस्मरण होय. - 40

## दशक पंधरावा विचार 768 ते 771

## समास आठवा - सुक्ष्म जीव निरूपण 15/8

768. धूळीच्या कणाहून अगदी सूक्ष्म किडे आहेत. आकार अति लहान, आयुष्य अन्यन, अत्म, बुध्दीही तशीच असते, पण त्याच्यामध्ये देखील अंत:करण, मन, बुध्दी, चित्र, अहंकार सुक्ष्म अस्तित्व असते. जीवाचा मालक अंतरात्मा असतो. - 5

769. सुक्ष्म तसे प्रचंड प्राणी असतात. निरनिराळे प्रकार, आकार रंगाने, सोन्यासारखे चकाकणारे असतात. खाण्यापिण्याचे, आवाजाचे गुणाचे भेद असतात. परंतु अंतरात्म्यांत भेद नाही, तो एकच आहे. माणूस उगीच गर्व करतो वाया जातो, अंतरात्मा तेवढाच खरा ज्ञानी आहे. तोच तो अंतर्यामी आत्मरुपाने राहतो ते जाणणरे थोडे असतात. - 28

770. परमेश्वराची करणी खरोखर मोठी विस्मकारक आहे. माणसाच्या बुध्दीला समजणार नाही. परंतु माणसास अहंता पछाडते. तो बाजूस सारुन भगवंताचे चिंतन करावे, माणसाचे आयुष्य अल्प आणि देह क्षणभंगुर आहे. विनाकारण गर्व करतो. शरीर पडायाला वेळ लागत नाही. - 35

771. देह घाणेरड्या जागी जन्म घेतो आणि घाणेरड्या रसानेच पोसला जातो या देहाच्या थोरपणाचा अभिमान बाळगतात. याला अर्थच नाही. शरीर काय आणि ऐश्वर्य काय दोन दिवसाचा खेळ आहे. आरंभी आणि अखेर सगळी फजिती असते. देह बुध्दीतून बाहेर पडतो तोच धन्य. अहंकार सोडावा विवेकाने भगवंताचा शोध घ्यावा. - 40

# दशक पंधरावा - विचार 772 ते 776

# समास नववा - पिंडोत्पत्ति निरुपण 15/9

772. चारही खाणीमध्ये जन्म घेणारे प्राणी सार पाण्यापासून निर्माण होतात वाढतात. तीन गुण पंचभुते आणि अंतरात्मा एक ठिकाणी मिळून मानवी शरीर बनलेले असते. - 2

773. देह वाढतो तशी कुबुध्दी वाढते. शरीर दिवसे दिवस मोठे होत असते, निरनिराळे विचार सुचतात, बीजाला माती व पाणी मिळताच अंकुर फुलून वाढतो. वाढण्यांत मोठा आनंद असतो. जगांत पिंडोत्पत्तीचा अनुभव येतो. पृथ्वीपेक्षा आप, पाण्यापेक्षा वायु, वायुपेक्षा अंतरात्मा सर्वश्रेष्ठ आहे. - 17

774. श्रेष्ठ अंतरात्मा ज्याच्या अंत:करणात जागा झाला तोच भाग्य पुरुष बनला. अंतरात्मारुपी नारायण अखंड स्मरावा त्यास लक्ष्मी दूर नाही. अंतरात्मा विश्वव्यापी आहे. त्याची पूजा करावी. एकदा जीव संतुष्ट करावा, त्याची मनापासून सेवा करावी तो सर्वत्र आहे कोणाचे अंत:करण न दुखवणे व जो भेटेल त्यास आपलाच समजावा - 26

775. अंतरात्म्याच्या सत्तेने सर्व कर्मे चालतात. त्याच्या कृपेने माणूस उपासक बनतो. त्याच्या अनुभवाने कित्येक लोक ज्ञानसंपन्न होतात. अंतरात्म्यातून नाना शस्त्रे, नाना मते, नियमित आणि अतिनियमित, तसेच व्यवस्थित आणि अव्यवस्थित कार्य कर्मानुसार घडतात. त्याचप्रमाणे आपल्याला योग्य असेल ते आपल्या ताकतीप्रमाणे घ्यावे व त्याप्रमाणे वागावे. - 32

776. भगवंत माझ्याहून वेगळा आहे तोपर्यंत उपासना चालते. वेगळा नाही, ही भावन झाली, उपासना चंचलाचा प्रात संपून, निश्चलाची कक्षा लागते, पंचमहाभूताचा पसारा बाजूस सारावा, आत्मप्रचिती करुन आत्महित करणाऱ्या महावचनाचे (सो S हं) मनन चिंतन करावे.

# दशक पंधरावा - विचार 777 ते 783

# समास दहावा - सिध्दांत निरुपण 15/10

777. विवेकाने चंचल मागे टाकून निश्चलाची धारणा करावी. वृत्तीच शोधन होते आणि निवृत्ती होते, अज्ञान जावून ज्ञान येते मग विज्ञान बनते. तेथे निरंजनाची अखंड भेट घडते. शुध्द जाणीव, ही सर्वोत्तम वस्तु आहे. आकाशाचा भास होतो. तो मिथ्या असतो, पाणी, वायू, आत्मा व्यापक बनतो. चळतो तो व चलत नाही, तो सगळे अंतर्यामीच कळते मनन चिंतनाने सर्व होते. - 7

778. निरंतर चिंतन करतां करतां निवृत्तीपदास माणूस पोचते. स्वरुपाची अखंड भेट होते. नंतर ताटातूट नाही. ज्ञानाचे विज्ञान होऊन मन उन्मत होते. विवेकाने परब्रह्मशी अनन्यपणा घडतो. चंचल आहे ते निश्चल बनते. देव व भक्त एकजीव होतात. - 10

779. अज्ञान आणि त्याचे भ्रम नाश पावतात, ज्ञान आणि त्याचे परिणाम शांत होतात. वृत्ती शून्य होऊन केवलपणा उरतो चंचलाच्या चक्रातुन बाहेर पडलेला जीव परमात्मस्वरुप बनतो. त्या निवांत व निर्विकारी स्वरुपांत निवांतपणे स्थिर होतो, चंचल असते तोपर्यत भ्रम राहणार. चंचल आटल्यावर भ्रम राहत नाही. चंचल आणि निश्चल दोन्ही एकरुप कधीच होत नाहींत. - 14

780. सन्यासी, ईश्वरी कृपा झालेले भाग्यवान महावाक्याचा विचार करु शकतात. मनातील सहाही विकार उणे सोडतो तो खरा सन्याशी होय, खरे विचारवंत सत्याशीच समजावे. आपण जेवढी साधना करावी तेवढी आपल्या उपयोगास खात्रीने येते यांत शंका नाही. - 16

781. अलक्ष ब्रह्म मनाला व्यापून राहिल्यावर मायारुप पूर्व पक्ष नाहींसा होतो. वासनेच्या अनुरोधाने असणारा व अंतर्यामी साक्षी राहणारा तोही नाहीसा होतो. आकाश आणि पाताळ भेद जावून अवकाश उरते, अवकाश एकच आहे, मनाची उपाधी जावून शब्दाचा व्यवहार संपतो. - 21

782. मी ब्रह्म आहे याचा अर्थ कळला की, त्यांत चिंतनाने रमू लागते. त्यांत स्थिर होते, ध्यान करणारे मन नाहीसे होऊन वृत्ती शून्यता येते. बोलणारा, सांगणारा साक्षी सर्व लय पावतात. बोलणे राहतच नाही. तो निर्विकार ब्रह्मज्ञानी होतो. विकाररुपी चंचलता संपते. -25

783. ज्ञान झाल्यावर प्रारब्धाप्रमाणे देह चालतो, वासनेचे बीज जळून जाते, साधकाने आत्मनात्मविचार सतत करून बुध्दी निश्चल करावी, ब्रह्म ज्ञान सिध्द होते. निश्चलचे ध्यान केल्याने बुध्दी निश्चल तर चंचलाचे ध्यान केल्याने बुध्दी चंचल बनते दृश्याचे ध्यानाने, बुध्दी दृश्यरुप बनते. ज्ञानी जनास माया खोटी दिसते, भय नाश पावते. भक्तीचा प्रसार करुन उपासनेच्या उपकाराची फेड ज्ञानी लोकांनी करावी. - 33

**दशक पंधरावा समाप्त**

---



## दशक सोळावा सपृतिन्वयाचा विचार 784 ते 785

## समास पहिला - वाल्मिकीस्तवन निरुपण 16/1

784. सप्तसप्ति म्हणजे सूर्य, अन्वय म्हणजे वंश. अंतरात्मा हे उपास्य देवतेचे मुळ आहे. हाच सर्व ठिकाणी कार्य घडून आणतो. वाल्या कोळ्याचा तपस्येने - राम नामाने वाल्मिकी झाला. त्यांच्या तपाच्या बळाने लाकडाला अंकुर फुटले. तो मोठा ऋषी झाला. - 10

785. आधी वाल्हा हा कोळी होता, त्याने अनेकांची हत्या केली त्यास उपरति झाली, तप केले. त्याचे देहाभोवती वारुळ वाढले. त्यांनी आधीच रामायण लिहिले. श्री रामाची किर्ती गाईली. फार थोर रामभक्त होते. श्री रामदास म्हणतात त्या सर्व भक्ताचा मी दास आहे.

## दशक सोळावा विचार 786 ते 787

## समास दुसरा - सूर्यस्तवन निरुपण 16/2

786. सूर्य सर्व जगाला जिवंत ठेवतो. सूर्याच्या प्रकाशामुळे आपण प्रपंच आणि परमार्थ दोन्ही करु शकतो, चंद्रावर कलंक आहे. सूर्य उगवताच चंद्र निस्तेज होतो. सुर्यामुळे धर्म, कार्य, नियमित जगांत चालतात, वेद, शास्त्रे पुराणे, मंत्र, यंत्र सर्व सूर्यावर अवलंबून असतात. प्रापंचिक, परमार्थिक कार्यास सूर्य प्रकाश लागतो. शरीरात उष्णता नसेल तर शरीर जगणार नाही. - 10

787. जे जे या संसारात दृश्यरुप धारण करुन आले त्या सर्वांचा आरंभ आणि शेवट सूर्याच्या नजरेखालीच झाला. संसारात आलेले प्राणी अखेर सूर्याच्या देखतच देह सोडून गेले. सूर्य विश्वाचा डोळा आहे. सूर्य सर्वात श्रेष्ठ आहे. सूर्य अपार आकाशमार्ग चालतो. श्रीरामाचा तर तो पूर्वज आहे. सूर्य नमस्काराने सर्व दोष जातात, सूर्य दर्शनाने स्फूर्ति वाढत जाते.

## दशक सोळावा - विचार 788 ते 789

## समास तिसरा - पृथ्वीस्तवन निरुपण 16/3

788. सर्व प्राणी पृथ्वीच्या आधाराने राहतात. कारण पृथ्वीतत्वाचा देह बनलेला आहे. आणि देहावाचून जीव जगू शकत नाही. सर्व पृथ्वी खणतात, नांगरतात, जाळतात मलटाकतात. अंतकाळी देह पृथ्वीवर पडतो. पृथ्वी अनेक धातू, रत्ने, पाषाण, परिस, पशु, पक्षी, प्राणी राहतात. - 8

789. वायूला आधार आहे घट्ट व कठीण अहंकाराचा. हा अहंकार जड पृथ्वीचा बनलेला आहे. पृथ्वी विविधतेने नटलेली आहे. तिला वसुंधरा म्हणतात. पृथ्वी विशाल, नाना बीजाची खाण आहे. अंतरात्म्याची ही मोठी विलक्षण करणी होय. अशी पृथ्वी पुन्हा होणार नाही. काही लोक जमिन माझी म्हणतात व मरुन जातात. ब्रह्मापासून आपणापर्यंत सर्वांना पृथ्वीचाच आधार आहे. - 30

## दशक सोळावा विचार 790 ते 791

## समास चवथा - आपनिरुपण

790.पाणी हे सर्वांचे जन्मस्थान, जीवाचे जीवन आहे. पाण्यास आपोनारायण म्हणतात, पृथ्वीला आवरणोदकाचा आधार आहे. पृथ्वीवर सर्वत्र पाणी आहे. समुद्राचे, पावसाचे पाणी, प्रचंड जलाशये आहे. प्रवित्र नद्याचे तीर्थे पाणी आहे गरम थंड पाण्याचे झरे आहे. - 12

791. देह पाण्यापासूनच बनतात. पृथ्वी पाण्यापासूनच झाली आहे. खारा, दुधाचा, दारुचा, तुपाचा समुद्र असे. मुळापासून शेंड्यापर्यंत पाणी जाते. पाणी तारक तसे मारक आहे. पृथ्वीचे मुळ पाणी. पाण्याचे मुळ अग्नि, अग्निचे मुळ वायु, वायुहून थोर परमेश्वर म्हणजे अंतरात्मा, त्याहून सर्वश्रेष्ठ परब्रह्म, श्रेष्ठात श्रेष्ठ आहे. - 31

## दशक सोळावा विचार 792 ते 794

## समास पांचवा - अग्नि निरुपण 16/5

792.अग्नि हा सीतेचा पिता आणि रामाचा सासरा आहे. सीतेने अग्निदिव्य केले. तेव्हां अग्नि प्रकट होऊन "रामा ही माझी कन्या अत्यंत पवित्र आहे" अग्नि मुखाने यज्ञामधील हविर्भाग सर्व देवाना पोहचवितो, अग्नि थंडी वारा आणि रोग निवारतो सर्व जीवाना साभांळतो पोसतो. - 2

793.अग्निमुळे सृष्टी चालते, सर्व लहानमोठे प्राणी जिवंत राहतात. अग्निमुळे पाणी आटते व पृथ्वी तयार होते. माणसात जठराग्नि आहे. शुद्राच्या घरचा अग्नि आणला तरी चालेल. त्याला दोष नाही, असे शास्त्र सांगते. सर्व घरांतील अग्नि नित्य पवित्र आहे, असे समजतात.-12

794. रोगावर उष्ण औषध घेतात. सूर्य आणि अग्नि हेच ब्राह्मणाचे सर्वस्व होय. अग्निच्या मुखाने परमेश्वर संतोष पावतो. माणूस जिवंत असताना अग्नि सुख देतो. मेल्यावर भस्म करतो प्रलयकाळी तोच सृष्टीचा संहार करतो. अग्निला चार शिंगे, तीन पाय, दोन डोकी, सात हात आहेत. असे शास्त्र सांगते. - 29

## दशक सोळावा विचार 795 ते 797

## समास सहावा - वायु स्तवन 16/6

795. वायूमुळे श्वास चालतो व शरीराचे सर्व चलनवलन चालते प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान पांच वायु माणसाच्या शरीरात वावरतो. नाग कुर्म, कृकल देवदत्त आणि धनंजय पांच उपप्राण वायू आहेत. वायु प्रभा ब्रह्मांडामध्ये प्रकटला, त्याने देव, देवता मानव, सगळे प्राणी पक्षी निर्माण केले. - 8

796. वायूच्या पाठीशी अंतरात्म्याची सत्ता आहे. तीच वायूचे रुपाने शरीरात खरोखर काम करते. ज्या सुक्ष्म कमळामध्ये ब्रह्मदेव राहतो तो कमलकोश वायुरुप आहे. पाण्यांस त्याचाच आधार आहे. त्याच आधारे शेषाने डोक्यावर भूगोल धरला आहे.

ब्रह्मा, विष्णू, महेश आणि चौथा स्वत: अगदी जगदीश्वर अंतरात्मा हे सारे वायुस्वरुपीच आहेत. - 19

797. सर्व देव, देवी, दैवते, भुते, अनेक शक्ति वायुरुप घेऊनच प्रकट होतात, वायुचा मुलगा हनुमंत होय. बाप लेकात भेद नाही. इंद्राने हनुमंतावर व्रज फेकले. वायुने त्यास सोडविले. हनुमंत ईश्वरी अवतार आहे. रावणाच्या कैदेतील सर्व देव त्यानेच सोडविले.- 30

## दशक सोळावा विचार 798 ते 802

## समास सातवा महद्भूत निरुपण 16/7

798. एक परब्रह्म निश्चल बाकीचे सर्व चंचल अंतरात्मा. हा वायूचे मुळ आहे. सर्व गुणामध्ये तो चंचल आहे. अंतरात्मा येतो व जातो पण दिसत नाही. तो स्थिर बसत नाही. वेदाना त्याची कल्पना करता येत नाही. मुळ परब्रह्मचे अगदी पहिले स्फूरण झाले तेच अंतरात्म्याचे लक्षण होय. - 4

799. अंतरात्म्यातून जगदीश्वर, पुढे तीन गुण, पुढे पंचमहाभूते व्यक्तआणि अव्यक्त स्वरुपातच ओळखावे. पंचमहाभूतामध्ये आकाश मुख्य आहे. सर्व भूतामध्ये विष्णू हे महदभूत आहे. - 7

800. अष्टधा मधील पंचमहाभूते आणि तीन गुण त्याना अंतरात्म्यामुळे व्यक्त रुप प्राप्त होते. अंतरात्म्याच्या पलीकडे निर्विकार परब्रह्म आहे. अंतरात्मा देहांत राहतो आणि इंद्रियांना चेतना देतो, सुखदु:ख भोगतो पिंडामधील अतिसुक्ष्म अंतरात्मा विवेकाने ओळखावा. - 15

801. आत्मा गरम थंड जाणतो, वस्तूची मनाने परीक्षा घेणे, दृष्टीने पाहणे, स्वाद ओळखणे नाना प्रकारचे व्यापार त्रिभुवनामध्ये एकटा अंतरात्माच करतो. सर्व विद्या कला, वेदाचे रहस्य सर्व गोष्टी अंतरात्म्यामुळे हस्तगत होऊ शकतात. जगांतील आचार परमार्थातील सारासार विचार, प्रपंच परमार्थ याचे निश्चित ज्ञान अंतरात्माच देतो. - 26

802. अंतरात्मा आनंदी, सुखी, दु:खी, कष्टी होतो. अनेक देह धरतो आणि सोडतो. एक अंतरात्मा अनेक देह धारण करतो. स्थूल देहाचे मूळ लिंग देहामध्ये वासनात्मक सुक्ष्म देहांत असते, वासतेच देहनिर्मित होते. जग निर्माण होते. - 35.

## दशक सोळावा - विचार 803 ते 807

## समास आठवा - आत्माराम निरुपण 16/8

803. मंगलमूर्ती गणपतीस मी वंदन करतो. त्याच्या शक्तिने बुध्दीन स्फुर्ति येते, लोक आत्म्याचे भजन स्तवन करतात. बुध्दीने आत्म्याचे अपरोक्ष ज्ञान होते, वाणीची स्वामिनी, ज्ञानप्रकाश देणारी शारदेला वंदन करतो. आत्मज्ञानामध्ये बुध्दी प्रतिभामय बनते तदाकार होते, ज्ञानाचा व्यवहार झाल्याशिवाय ज्ञानपरंपरा टिकणार नाही. - 2

804. रामनाम उत्मोत्तम आहे. त्यामुळे श्रीशंकराचा शीण गेला व त्याला विश्रांती मिळाली. नामाचा महिमा फार थोर आहे. भगवंताचे रुप नामास प्राप्त होते. नाम व रुप अंतरात्म्याची दोन अंगे आहेत. नाम स्थुलांत असते तोपर्यंत देवतांची अंतरात्मा सगुण रुपाने दिसतो, सुक्ष्म झाले की विशाल बनते. त्रैलोक्य व्यापते परमेश्वराचा ओंकार रुपी नादब्रहम असा अनुभव येतो. नामच परब्रहम बनते. - 4

805. जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा, विश्वात्मा, गुप्तात्मा, आत्मा अंतरात्मा, सुक्षात्मा हे सर्व अंतरात्म्यास नांवे आढळतात त्याशिवाय नादरुप, ज्योतिरुप साक्षीरुप, सत्तारुप, चैतन्यरुप, स्स्वरुप नरोत्तम, वीरोत्तम, पुरुषोत्तम, रघुत्तम, सर्वोत्तम त्रैलोकवासी असेही ओळखतात, मानवाच्या सर्व कर्माचे कारण मूळ अंतरात्मा आहे. - 10

806. आत्मज्ञानी पुरुष अंतरात्म्याचे कर्तृत्व जाणतो. तोच जिवंतपणाचे, चैतन्याचे मूळ आहे, तोच सारासार जाणतो ज्ञानमय, सदैव तत्पर असतो. रंक वा ब्रहमदेव सर्वात तो एकच कार्य करतो. तरी नित्यनित्य विवेक करुन त्यास पाहावा म्हणजे समजेल. - 15

807. अंतरात्म्यामुळे वासना, कल्पना भावना निर्माण होतात. त्यास भेदाभेद नाही. तो भेदाने राहतो जसे स्त्री, पुरुष, शत्रु, मित्र, पशु पक्षी प्राणी. निराळा असुन तो तो एकच आहे. आपणास सुक्ष्म दृष्टीने पाहिले तरी आपल्या शरीराचा अंत लागत नाही. देह व आत्मा याचा संयोग आहे. देहाच्या संबंधाने अंतरात्म्याची थोडीशी कल्पना येते. आत्मा अत्यंत सुक्ष्म व देह स्थूल असे. - 30

## दशक सोळावा - विचार 808 ते 810

## समास नववा - नाना उपासना निरुपण 16/9

808. जगांत अनेक लोक आपापल्या देवांना निरनिराळे प्रकारे उपासना करतात, भजतात, स्तुती करतात सारे उपासक आपल्या अपासनेला निर्गुण (म्हणजे बहुगुणी) म्हणतात. अंतरात्म्याचे अंश उपास्य असते. - 4

809. प्रत्येकाचे अंतर्यामी अंतरात्म्याचे वस्तीस्थान आहे. त्याची उपासना एका अंतरात्म्यास पोहचते, जसे झाडाच्या मूळाशी घातलेले पाणी शेंड्याकडे पोहचते. मूळ सांपडले सर्वांना शक्य नसते. साधुजनास ते समजते. शेंड्या पाणी घालणे हे उपास्य देवाचे भजन केल्यासारखे तर मुळास पाणी घालणे म्हणजे अंतर आत्माचीच उपासना होय. त्यासाठी सुक्ष्म मन लागते त्यासाठी पूर्व पुण्याई लागते. सर्वांना तो अधिकार प्राप्त होत नाही. - 11

810. जे जे चंचल, अशाश्वत विकार पावते त्यास सगुण म्हणतात. सगुण सोडून जे राहते त्या निर्गुण म्हणतात. सगुण खरे वाटत नाही. जसे खरोखरच सिंहसानावरील राजाव दुसरा राजा नांवाचा सेवक तो खरा राजा नसतो. फक्त नांवाचा. प्रलय नंतरही राहील ते निर्गुण बाकी सर्व माया असे. - 16

## दशक सोळावा विचार 811 ते 813

## समास दहावा - गुणभूत निरुपण 16/10

811. स्वामी सांगतात अंतरात्मा हे पांचवे भूत समजावे त्याच्यांतच त्रिगुणाचा समावेश होतो. चित्त स्थिर करुन पहा सर्व पदार्थामध्ये पांचही भूते हजर असतात.- 5

812. सर्वत्र पाणी होते. सूर्याच्या उष्णतेने ते घट्ट झाले. अशाप्रकारे अग्नि आणि वायु पासून पृथ्वी झाली. ज्या भूताचे वर्म ते दुस-या भूतांच्या वर्माने नरम पडते म्हणून दृश्याचा मोठा पसारा झाला. याच युक्तीने प्राणी मात्राचे देह तयार झाले. अग्नि, पाणी, सूर्य परस्पर समतोलाने गुणधर्मांनी जिवंत पिंड तयार होतो. - 9.

813. भगवंताचे गुण अगाध आहेत. अंतरात्मा सर्वांचे पालन करतो, त्रैलोक्य तोच सांभाळतो. त्याच्यावाचून जिवंतपण नाही. अंतरात्मा आपल्या अंतर्यामी आहे. हे जाणून त्याचेच भजन, साधन आणि अभ्यास या त्रयीने माणसाला परमार्थ साधतो. - 31

## दशक सतरावा - प्रकृति पुरुष विचार 814 ते 821

## समास पहिला देवबळात्कार 17/1

814. निश्चल परब्रह्माने संकल्प उठला, सद्वस्तूला स्व:ची जाणिव झाली. याची दोन अंगे एक ज्ञानमय अंतरात्मा अथवा चैतन्य, जगाचा स्वामी जगदीश्वर व दुसरे अंग अष्टधा प्रकृती. - 3

815. क्षेत्रज्ञ, द्रष्टा, साक्षी अंतरात्मा सर्व कांही पाहणारा, शुध्द सत्व महत्तत्व या सर्वांना यथार्थ जाणतो. तोच खरा साधु होय. साधुची दृष्टी सर्व प्राण्याच्या अंतर्यामी राहणाऱ्या अंतरात्म्याकडे असते. - 5

816. अंतरात्मा देहरुपी देवळांत बसलेला असतो. त्याची सेवा केली नाही, इंद्रिय भोग दिला नाही. देहांत रोग इतर कोणास कळत नाही. देवाचे दर्शन हवे तर देवालये पहावी लागतात. एकाद्या आत्मज्ञानीस तो आढळतो. नाना शरीरे नाना देह, भेद अनेक परंतु अंतरी एक जीवेश्वर राहतो. - 14

817. हे अशाश्वत विश्व ज्याने निर्माण केले व चालविले तो अंतरात्मा अशाश्वताचा राजा आहे. तोच सर्व द्रश्याचा असल्याने सहज अनुभवास येत नाही. त्याचा महिमा जाणणारा कोणी नाही. तुझी लीला फक्त तुलाच माहीत. - 20

818. जीवनामध्ये नित्यानित्य विवेक करावा आणि त्याच्या बळावर इहलोक व परलोक यात यश मिळवावे. तरच जन्माचे सार्थक होईल. - 21

819. चिंतनशील माणसापाशी देव अखंड चोवीस तास राहतो ही पूर्व पुण्याई होय. तोच योगी होय. ज्याचा भगवंताशी अखंड योग असतो. नसेल तर तो वियोगी. चिंतनाने वियोगी देखील योगी बनतो. - 23

820. थोर पुरुष जो लोकांना सन्मार्गास लावतो. जो स्वत: पोहणारा आहे. त्याने बुडणाऱ्यास बुडू देत नाही. जो स्थूल आणि सुक्ष्म याचा शोध घेतो आणि पिंड व ब्रह्मांड याचे विवरण करतो. जो वेदाचे अखंड विवरण हरतो व आपल्या अंतकरणांतील महावाक्याचा शोध घेतो यांच्याकडून परमार्थ श्रवण केल्यास उत्तम गती प्राप्त होते. - 27

821. संताची संगत यांच्याकडून सत् शास्त्राचे श्रवणाचा योग मिळतो. अखंड आत्मानात्म विवरण चालते. अखंड चिंतनशील असणारे कीर्तीमान पुरुष ईश्वराचेअंश असतात. ते मीपणाचा त्याग करुन चिरंजीव स्वरुपमय होऊन जातात. - 30

## दशक सतरावा विचार 822 ते 826

## समास दुसरा - शिवशक्ति निरुपण 17/2

822. ब्रह्म आकाशाप्रमाणे निर्मळ, निश्चल, निराकार, निर्विकार आहे. ते सर्वकाळ अनंत आहे.ब्रह्माच्या ठिकाणी ज्ञानी, अज्ञान, स्मरण विस्मरण काहीही नाही, विश्वाचे अस्थित्व चंद्र सूर्य होत नाहीत, ब्रह्माचे स्वत:चे स्फुरले ते चित् स्वरुप आहे. ही कल्पना केली. मुळ संकल्यांत गुणाचा समतोल असल्याने गुणसाम्य असते. - 6

823. आकाशात जसे ढग येतात तसे ब्रह्मामध्ये माया उत्पन्न झाली. संकल्परुप गुणविकार निर्माण झाला तेच अर्धनारीनटेश्वर झाला. मूळ मायेतून शुध्द रुप त्याच्यामध्ये रजो तमागुण वास करतात. मुळ मायेत व्यक्ति नसते आकार नसतो, शिवशक्ती असणार. - 11

824. ब्रह्मांडाचा शोध घेऊन पिंड ओळखावा, पिंडाचा शोध घेऊन ब्रह्मांड ओळखावे, स्थूलाकडून सुक्ष्माकडे किंवा सूक्ष्माकडून स्थूलाकडे विचार करावा म्हणजे कळते. जसे फळात बी. ते पेरले की झाडे फळे परत बी असे चक्र चालते. म्हणून स्थलाहून सुक्ष्म़ वेगळे नाही. कल्पनेतून सृष्टी निर्माण झाली असे वेद सांगतात. जीव व ब्रह्म याचेमध्ये अनेक पडदे आहेत. प्रत्येक जन्माचा एक पडदा असे पडदयामुळे विश्व सुक्ष्मच आहे. हे रहस्य आहे. गुढ हा निसर्गाचा नियम आहे. - 19

825. स्त्री, पुरुष प्रत्येकाचा देहभाव वेगळा परंतु जीव मात्र एकच असतो. मूळ वासनेमध्ये स्त्रीपुरुष भेद नाही. केवळ देह संबंधाने भेद दिसते, देहाचा संबंध सुटला की भेद नाहीसा होते. भेदाचे कारण शिवशक्ती मध्येच आहे. देह आकारा आल्यानंतर समजते. - 24

826. आई मुलाला वाढविते, पुरुष नाही. आईलाच माया असते. पुरुषाला स्त्रियाचा विश्वास असतो.स्त्रीला पुरुषाचा संतोष असतो. वासना एकमेकांस एक ठिकाणी बांधून ठेवतो, ही ईश्वराची युक्ती आहे. हे सुक्ष्म विवेकाने समजून घ्यावा.

## दशक सतरावा विचार 827 ते 831

## समास तिसरा श्रवण निरुपण 17/3

827. आत्मस्वरुपाबदल श्रवण करावे, श्रवण केल्यानंतर मनन करावे. विचार वाढवावा. त्यानंतर निदिध्याय करुन साक्षात्कार करुन घ्यावा. यात उधार नाही. रोकडा आहे आत्मसाक्षात्कार - 3

828. रत्नाची परीक्षा करताना, मौल्यवान वस्तुचे वजन करताना उत्तम सोने आटताना, अतिशय सावध राहाव, रक्कम मोजून घेताना, वस्तुची परीक्षा करताना, विवेकी माणसाशी बोलताना सावधपणा बाळगावा देवास धान्य निवडून वाहिले. नाहीतर देवाचा क्षोभ होतो. एकांतांत नाजुक गुप्त गोष्टीची चर्चा करताना मन अगदी दक्ष व सावध असावे. तसाच अध्यात्मिक ग्रंथातील सुक्ष्म विचार करताना करावे. - 7

829. अध्यात्मात जसजसा अनुभव येतो तशी कल्पना नाश पावते. आत्म्याचा शोधासाठी मोठ लोक होऊन गेले. त्याचा महिमा कोणास सांगता आला नाही. त्याचा पुन्हा पुन्हा शोध घ्यावा. सर्वास अंतरात्म्याची प्रेरणा असते. तो प्रगट होतो. तेथे ज्ञान करुन घेण्याची शक्यता असते. - 14

830. जगांत अंतरात्मा श्रेष्ठ आहे. विवेकी सज्जन तेच जाणतात. अंतरात्मा वायुच्या पलीकडे जातो, त्याला स्वत: अंतरात्मा सांपडतो. जो सुक्ष्माचा विचार करतो त्याचे अज्ञान नाहीसे होते. "मी ब्रह्म आहे" याची जाणीव देहांत असणे त्याचे भान जाता, विदेह होता येते तो साधु धन्य होय. - 20

831. दृश्य पदार्थाचे ज्ञान सोडावे, कल्पना सोडून स्वच्छ ब्रह्म शोधावे. अष्टांग योग पिंडदान हे खरे ज्ञान, त्याहून तत्वज्ञान श्रेष्ठ. त्याहून आत्मज्ञान श्रेष्ठ ते प्राप्त करावे. अत्यंत सुक्ष्म विचाराने पिंड ब्रह्मांडाचा निराश झाला म्हणे ते ब्रह्म कळते. सर्व तत्वाचा शोध घ्यावा सारासार विचार करुन सार निवडावे. मग सावधपणे ग्रंथ बाजूस ठेवून सुखी व्हावे. - 30

## दशक सतरावा - विचार 832 ते 835

## समास चवथा - अनुमान निरसन 17/4

832.जो पोहणारा स्वत: गटांगळ्या खातो, तो बुडणाऱ्यांस बाहेर काढू शकत नाही. विषय नीट आकलन न झाल्याने त्याच्या भाषणांत घोटाळा असतो. लोकांच्या शंका राहतात व वक्त्याचे भाषण असे असावे की त्याच्या योगे मायानदी पार करता येईल. - 5

833.ब्रह्म, मुळमाया अष्टधा प्रकृती आणि शिवशक्ती कक्षा आहेत. अर्धनटनारीश्वर, प्रकृती पुरुष, गुणत्रय याचा तो सुक्ष्म विचार करतो, तो साधु धन्य होय. तो अध्यात्म सांगताना पाल्हाळ लावत नाही. ब्रह्मस्वरुप श्रोत्याच्या कल्पनेत आणून देतो. - 10

834. वैधाच्या मात्रेची तारीफ त्या मात्रेचा गुण न आल्यास तारीफ व्यर्थ असते. प्रत्यक्ष अनुभव नसेल तर ज्ञानाची अवस्था त्या मात्रेसारखी होते. सारासारविचाराचा अभाव म्हणजे सगळा अंधार होय. - 19

835. सार आणि असार भेद नाहीसा होऊन एकंकार झाला. तेथे विचार उरत नाही. अविचाराचे प्राबल्य होते. तेव्हां नशेतील माणसाप्रमाणे ज्ञानी बरगळतात, ज्यांनी अनुभव घेऊन आत्म्याचे ज्ञान संपादन केले जो सावध असतो त्याचेच निरुपण ऐकावे. हे त्याच्या प्रत्यक्ष वागण्यावरुन ओळखावे. - 31

## दशक सतरावा - विचार 836 ते 841

## समास पांचवा - अजपा निरुपण 17/5

836. दिवसाच्या चोवीस तासात माणसाचे एकवीस हजार सहाशे श्वास होतात म्हणजे एका मिनिटांस पंधरा. तोंड व नाक यामध्ये प्राण सारखा जातो व येतो याविषयी सक्ष्म विचार करावा जिवंत असेपर्यंत अखंड चालते या गुढाचा विचार व्हावा असे श्री समर्थ सांगतात. -2

837. मुळामध्ये स्वर एकच आहे. तार म्हणजे उच्च स्वर, मंद म्हणजे मध्य स्वर आणि घोर म्हणजे खालचा स्वर, खालच्या स्वराहून अजपा अधिक सुक्ष्म असते. नाभीच्या ठिकाणी परावाणी, मध्ये अतिसुक्ष्म स्फुरण त्यास उन्मेश म्हणतात. ते स्फुरण हृदयांत आले म्हणजे पश्यांतित उतरसे त्यास ध्वनि म्हणतात. ध्वनी कंठांत आला म्हणजे शब्द होतात, तो तार होय, आणि मुखात वैखरी मधून प्रकट शब्द होतात. - 3

838. एकांत स्थळी मौन धरुन सावध बसावे. श्वासाकडे लक्ष दिल्यास त्याच्या जाण्या येण्यात सोहं सोहं शब्द होतात. सहज हे शब्द ऐकण्याची वृत्ति लीन करुन जो निवृत्त बनतो तो उत्तम मौनी होय. यासाठी योगाभ्यास करावा. - 9

839. श्वास घेताना सो व सोडताना हं असा सुक्ष्म आवाज होतो, सर्व देहधारकाना व वनस्पतींना प्राणवायुची गरज भासते. सर्वात अजप चालू असतो. ही साधना सोडून कष्टाच्या साधनामागे जाऊ नये. - 13

840. अंतर्यामीपणाने अंतरात्म्याचे दर्शन सहज घडण्यासाठी अखंड त्याचे ध्यान राहणे, हेच त्याचे दर्शन होय. त्याच्या अस्त्विाची अखंड जाणीव राखावी. दृश्यांत आपण देहबुध्दीने कार्यकारण भाव शोधतो. हे भ्रामक असून केवळ एक अंतरात्मा आहे. याचा प्रत्यय घेणे तेच साधकाचे साधन आहे. साऱ्या घटना त्याच्या इच्छेने घडतात हेच ज्ञान होय. - 15

841. आपला अंतर्यामी अंतरात्मा अगदी सहज आहे. त्याचा जप, ध्यान, सहज चालले पाहिजे. सहज बोलणे, चालणे हीच त्याची स्तुती स्तवन होणे. अवश्य आहे. सहजपणामध्ये कर्तेपणाचा अभिमान नाही. कोणताही आग्रह नाही. तळमळ नाही. बिना तक्रार राहावे. जीवन प्रवाहात भगवंताच्या इच्छेने रहावे, तेव्हां खरे समाधान मिळते. विवेकाने रहावे. ज्याने अंतरात्मा वश केला त्याला काही कमी पडत नाही. - 24

## दशक सतरावा - विचार 842 ते 845

## समास सहावा - देहात्म निरुपण 17/6

842. परब्रह्म मानवी कल्पनेपलीकडे आहे. आत्मा देहांत राहतो. सुखदु:खे भोगतो, अखेर तो देह सोडून जातो, म्हातारपणी शक्ती क्षीण होते, अनेक दु:खे भोगावी लागतात. देह सुटतांना जीव चरफडून मरतो - 4

843. सुख दु:खाचा जन्माचा संबंध असतो. प्राण्यांत एकमेकात वैर असते, त्यामुळे दु:ख भोगावे लागते. परब्रह्म शाश्वत असल्याने ते कधी जात नाही ते कोणास दु:ख देणार नाही. त्याच्या ठिकाणी निंदा आणि स्तुती दोन्ही स्पर्श करु शकणार नाही. - 18

844. सर्वांना वैभव भोगायला मिळत नाही याचा अर्थ भगवंताने प्रत्येकाचे स्थान ठरवून त्यास निर्माण केले आहे. भाग्यवंतासच उत्तम वस्तु मिळतात. अन्न, वस्त्र, देवपूजा आणि ब्रह्मज्ञान नियतीवर अवलंबून असतात. - 24

845. माणसाचे रुप, सौदर्य हे सगळे नष्ट होते, सामर्थ्य जाते, जवळ कोणी असत नाही, अशा परिस्थीतीत यातना भोगीत माणूस मरतो. अंतकाळ सर्वांना सारखाच असतो.

अशाश्वताचे दु:ख कारक अवलक्षण असते. जो देह दु:ख साठी भगवंतास दोष देत नाही तो साधक स्थिर समजावा. - 31

## दशक सतरावा - विचार 846 ते 850

## समास सातवा - जगजीवन निरुपण 17/7

846. अंतरात्मा स्वच्छ व शुध्द आहे. पाणी मुळांत स्वच्छ असते. अनंक वनस्पतीच्या सहवासने संगतीने ते आंबट तिखट किंवा कडू बनते. आत्मा देहाचे संगतीने त्याचे शुध्दपण लोपते, अभिमानाने भलताच भरीला पडतो. - 2

847. पाणी ऊसाचे संगतीने गोड होते. विषारी वेलीमुळे प्राणघातक रस होतो. संत संगतीने विवेकामुळे देहाभिमान ज्ञात, अंतरात्मा अविनाशी असतो तो विचाराने ओळखावा. जो स्वत:ला सांभाळतो तो स्वत:चा मित्र, जो नाश करतो तो शत्रु समजावा. - 8

848. आत्मानात्मा विवेक करणारा साधु धन्य होय. संगतीमुळेच उत्तम अथवा अधोगती प्राप्त होते. त्या अनुसार उद्योगी व शहाणी लोकांची संगत करावी. मुर्ख आळशी माणसाची संगत धरु नये. संगतीप्रमाणे सुख, दु:ख हे फळ मिळते. - 17

849. अनपेक्षित संकट आल्यास न घाबरता विवेकाने आपण त्यातून बाहेर पडावे. यांत मोठे समाधान लाभते. दुर्जनांच्या संगतीने मानभंग होतो. मनाविरुध्द गोष्टी घडतात. शहाणपणानेच राहावे, सुखसंतोष व गौरव होईल. - 22

850. जगांत परिस्थिती अशीच राहणार त्याला इलाज नाही जो समजून जगतो तो सुखी होतो. आपण आपला विचार करावा. श्रीमंत, वेडा, विव्दान, दरिद्री हा भेद राहणारच. - 25

## दशक सतरावा विचार 851 ते 855

## समास आठवा तत्व निरुपण 17/8

851. परावाणी ही बेंबीपाशी स्फुरण पाऊन, हृदयांत येऊन ध्वनी रुप होते तेव्हां तिला पश्यन्ती म्हणतात. हृदयांमधील ध्वनी कंठांत येऊन नादाचे रुप धारण करतो. त्यास मध्यमा वाणी म्हणतात. जिभेने नादाचा शब्दरुप उच्चार होतो त्यास वैखरी वाणी म्हणतात. - 2

852. सहज एखादी आठवण कल्पना येते ते अंत:करण जाणावे. जाणिवेचे स्वच्छ स्वरुप म्हणजे अंत:करण. अशा जाणिवेची दोलायमान स्थिती होणे, तेच मन होय. संकल्प विकल्प जाणीव तेच मन समजावे. याचे अंतरी अनुमान करुन निश्चय घडतो. या जाणिवेला बुध्दी समजावे. बुध्दीच्या निर्णयाचे पुढे चिंतन होते, ते चित्त होय. आपला हट्ट किंवा आग्रह हा अहंकार होय. - 9

853. पंचप्राण हे वायूचे विभाग आहेत.व्यान - सर्वांग व्यापून असते. समान - नाभीच्या ठिकाणी असतो. उदात - कठांत असतो. अपान, गुदस्थानी व प्राण नाकांत राहतो. पांच ज्ञानेंद्रिये - कान, त्वचा, डोळे, जीभ आणि नाक, पांच कर्मेंद्रिये वाणी, हात, पाय, जननद्रिये आणि गुद. विषय पंचकशब्द, स्पर्श, रुप, रस व गंध हे होय. अंत:करण पंचक - अंत:करण, मन, बुध्दी चित्त व अहंकार.मुळ अंत:करण एकच आहे. -14

854. पंचमहाभूताचे संबंध - 1. आकाश. काम, क्रोध, शोक, मोह आणि भय 2. वायु - चलणे, वलणे, प्रसारणे. निराध व आकुंचन 3. तेज - भूक, तहान, आळस, झोप व मिथून 4. आप (पाणी) रेत, रक्त, लाळ, मुत्र व घाम 5. पृथ्वी - हाडे, मांस, त्वचा, नाडी व रोम हे पांच पृथ्वीचे धर्म आहेत. - 28

855. स्थूल, सुक्ष्म, कारण व महाकारण हे चार देह निरसन केले म्हणजे विज्ञान प्राप्त होते. जीव परब्रह्मत रुपच बनते. विचाराने चौदेहावेगळे व्हावे. तत्वाच्या बरोबर मीपण नाहींसे करावे. म्हणजे परब्रह्माशी आत्मनिवेदन साधने व जन्म मृत्युच्या चक्रातून सुटका होते. - 32




## दशक सतरावा विचार 856 फक्त

## समास नववा तनुचतुष्टय निरुपण 17/9

856 - पिंडातील बत्तीस तत्वे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चार देह | स्थूल | सुक्ष्म | कारण | महांकारण |
| चार अवस्था | जागृती | स्वप्न | सुषुत्री | तुर्या |
| चार अभिमान | विश्व | तेजस | प्राज्ञ | प्रत्यगात्मा |
| चार स्थाने | नेत्र | कंठ | हृदय | मूर्धन |
| चार भोग | स्थूल | प्रतिविक्त | आनंद | आनंदावभास |
| चार मात्रा | अकार | उकार | मकार | अर्धमात्रा |
| चार गुण | तम | रज | सत्व | शुध्द सत्व |
| चार शक्ति | क्रिया | द्रव्य | इच्छा | ज्ञान |

वरील बत्तीस तत्वे अधिक स्थूल देहाची पंचवीस तत्वे व सुक्ष्म देहाची पंचवीस तत्वे मिळून 32 + 25 + 35 = 82 तत्वे अधिक अज्ञान आणि ज्ञान मिळून तत्वे होतात. ज्ञानाने अज्ञान ओळखावे. - 9

## दशक सतरावा विचार 857 ते 860

## समास दहावा टोणपासिध्द लक्षण 17/10

857.परब्रह्म पाताळलिंगासारखे आहे. तेथे स्थूल देहाने जाता येत नाही विवेकानी त्याची सत्यता करावी लागते. डोळ्याने दिसत नाही. ज्ञानदृष्टीने पाहवे लागते. विवरण करावे. परब्रह्म अनंत, अमर्याद आणि दृश्यरहित आहे. - 8

858.परब्रह्म म्हणजे गुणाचे योगाने निर्गुणाचा अनुभव घ्यावा. शाश्वत तत्व सुक्ष्म ज्ञान दृष्टीने आकलन होते. गुणाचा नाश होतो. निर्गुण ते अविनाशी असते. स्थूल दृष्टीश दिसत नाही. त्याच्याबदल श्रवण आणि मनन करुन सर्व आकलन करता येते. - 13

859. ईश्वराने भेद केले आहेत. त्याचेवर जग चालते परीक्षा करणारेच आंधळे असतील ते दृश्य जगाची परीक्षा कसे करणार. त्यासाठी ज्ञानदृष्टीच पाहिजे. विवेकी साधुसंत असतील ते असार सोडून सार ग्रहण करतील. - 22

860. सत्संगाने जावे, सत् शास्त्राचे श्रवण करावे, आम गुणाचा अभ्यास करावा. परमार्थ खरा समजण्याचा संताकडून श्रवण करण्यासारखा राजमार्ग नाही. अर्थ ध्यानांत घ्यावा. स्वत: साधना करावी तर परमार्थ दूर नाही. - 30

## दशक अठरावा बहुजिनसी विचार 861 ते 863

## समास पहिला बहुदेवस्थान 18/1

861. लोक नाना प्रकारचे देव मानतात. गणपती विद्या व बुध्दी देतो, ब्रम्हदेव सृष्टी रचितो, विष्णु पालन करतो. शंकर निरंतर रामनाम जपतो. तुळजाभवात अनंत गुण आहेत. रामकृष्ण अवतार आहेत. सगळ्या देवाचे मुळ अंतरात्माच आहे. सारे भोग त्यालाच घडतात. - 16

862. अंतरात्मा अनेक देवाच्या रुपानी व शक्तीच्या व्यक्त होतो, सर्व वैभव भोगणारा फक्त तोच आहे. कीर्ति अपकीर्ति, निंदा, स्तुती त्यालाच भोगाव्या लागतात. निरनिराळ्या देहांत निरनिराळे भोग, त्याग अखेर तोच भोगतो. - 19

863. अंतरात्मा देहांत वास करीत असून लोक त्याला चुकतात. त्याला जाणणारा पुण्यवान थोडे फार अनुसंधान राखतो त्याचे पाप जळून जातात. अंतर्निष्ठ ज्ञानी होतो. अंतर्निष्ठ पुरुष तेवढेच तरतात इतर सारे बुडतात, वाया जातात. - 24

## दशक अठरावा विचार 864 ते 867

## समास दुसरा - सर्वज्ञसग निरुपण 18/2

864. यापुढे आपण जाणतेपणाने नीट वागावे, जाणत्याची संगत धरावी, सेवा करावी, त्याची सद्बुध्दी, आपलीशी करावी, सूक्ष्म ज्ञानदृष्टी म्हणजे सद्बुध्दी. जाणतयाच्या संगतीने भजन शिकावे, संगीत शिकावे, तो जसे ध्यान करतो तसे करण्याचा प्रयत्न करावा - 9

865. जाणत्याच्या अंतरंगातील जीवनच अधिक अभ्यासनीय असते. त्याचे भक्तिमार्ग, वैराग्यपध्दती, वागणे, ज्ञान ध्यान शिकावे. अंतरात्मा तेवढा एकटा खरा आहे. तो सत्य, ज्ञानमय आणि अनंत आहे. - 23

866. अंतरात्मारुपी परमेश्वराचे गुणगाण गावे. संभाषण करावे. त्यामुळे अतिशय आनंद अनुभवास येतो. सगळे जगदीश्वराने निर्माण केलेले आहे. पण तो सुक्ष्म असल्याने दिसत नाही. त्याचे अखंड ध्यान लागले तर तो योगक्षेम चालवितो. - 28

867. अंतरात्म्याचे ध्यान करतो भक्त. नाही करतो तो अभक्त. अंतरात्मा भक्ताला संस्कारातून मोकळा करतो. उपासना करता करता अखेर देवाची व भक्ताची अखंड ऐक्यता होते. ही अनुभवाची गोष्ट आहे ते अनुभवी लोक जाणतात. - 30

## दशक अठरावा - विचार 868 ते 869

## समास तिसरा - नि:स्पृह शिकवण 18/3

868. श्री समर्थ सांगतात आळस आणि वाईट संगती माणसाच्या आयुष्याचा नाश करतात. माणसाने नीट विचार केला नाही तर सारा अविचार होतो. विवेकहीन होतो असे घडून येण्यास आपणच जबाबदार असतो. वाईट संगतीने माणूस पाहता पाहता बुडतो. - 3

869. स्वत:स येत नाही दुसऱ्याचे आवडत नाही असा माणूस वेडा असतो तो सज्जनाचा दोष करतो. माणसाने मन एकाग्र करावे. आणि जबरदस्तीने परमार्थ साधना करण्यास लागावे. आळस, अवगुण सोडावे. आम गुणाचा अभ्यास करावा. - 13

## दशक अठरावा - विचार 870 ते 873

## समास चवथा - देहदुर्लभ निरुपण 18/4

870. देहामुळे महाज्ञानी, सिध्द, साधु व मुनी होतात. श्रवण मनन घडते वाढते, देहांतच मुळ परमात्मा आपलासा करुन घेता येतो. त्यामुळे कर्मयोग, उपासनामार्ग आणि ज्ञानमार्ग आचरता येतात. - 6

871. माणूस देहामुळे पुण्यशील बनतो, पापी बनतो, स्वैराचारी बनतो. देवाच्या साहयानेच अवतार होतात. देहाने विषयभोग भोगता येतो. त्यागही करता येतो. देहास रोग होतात बरे होतात. तसेच नवविधा भक्ति करता येते. मुक्ति साधता येते. - 13

872. मानव देह सर्वोत्तम. यात अंतरात्मा वास करतो यांत पुरुषोत्तम आहे. हे विवेकी पुरुष जाणतात. देहामुळे भ्रम होतात मोह होतात. देहांतून प्रकट होणारा आत्मा. देहाच्या अभावी नाहीसा होतो. हा देह म्हणजे ब्रह्मांड वृक्षाचें सर्वोत्तम फळ आहे.

देहाचे साहयाने लहान मोठी कर्मे करतात, भजन करुन पावन होतात. देहाशिवाय कांही करता येत नाही त्यासाठी देह सार्थक लावणे योग्य आहे. - 31

873. आत्मा धारण करण्यासाठी देह जन्मतो. देहाचे योगाने आत्मा जगतो. राहू शकतो, दोघाच्या संयोगाने जगात मोठे कार्य घडून येते. देहाच्या अभावी आत्म्याला पूजा पावत नाही. ज्या देहाकडून आत्मज्ञानाचा प्रसार होतो तो देह पुण्यमय पूज्यनीय आहे. - 36

## दशक अठरावा विचार 874 ते 878

## समास पाचवा - करंटपरीक्षा निरुपण 18/5

874. ग्रंथाची पारायणे करा, अभ्यास करा, जो माणूस विचार करत नाही त्याच्या ज्ञानाचा उपयोग नाही. ग्रंथातील स्वानुभवाची वचने ग्रहण करावी. नाम रुपानी भरलेले दृश्य जग मागे टाकावे. अनुभवाच्या मागे लागावे. दृश्य असार आहे. अदृश्य अंतरात्मा सार आहे. दोन्ही एक करणे मूर्ख आहे. - 4

875. भराभर घासावर घांस घेऊन अन्न पचन होत नाही. ज्ञान नीट घेऊन आत्मसात करावे, सर्वाचे अंत:करण संभळावे. सोने शुध्द पाहून घ्यावे, कसाला लावावे तापहून परीक्षा घ्यावी त्याचप्रमाणे श्रवण आणि मनन साधनगती प्रत्ययाची परीक्षा करावी. - 14

876. जे खोटे असते ते कुठेच चालत नाही. ते कुणालाच आवडत नाही, खरे आहे त्याचेच प्रतिपादन करावे, वक्त्याने बोलताना आपल्या अनुभवाच्या पुराव्याने बोलावे. जो स्वत:च घोटाळ्यांत अडकतो तो दुसऱ्यास नीट समजावून देण्यांत कठीण असणे. - 19

877. जे खरे म्हणून प्रचतिला येते त्याचे मोठया आदराने आपण ग्रहण करावे. अनुभवाशिवाय लिहिलेली, बोललेली वचन फुसकी समजावी. खोट्याची नेहमी निंदा होते व त्याची दुर्दशा होते. वेडी माणसे खोट्याच्या भरी पडतात. सत्य हेच स्वस्वरुप आहे. असत्य हेच पाप होय. - 26

878. सत्य म्हणजे स्वरुप दृश्याच्या पलीकडे आहे. त्यासाठी दृश्याच्या पलीकडे जावयास पाहिजे. शब्दाचा अर्थ समजून नंतर त्यावर मनन करावे. दृश्यविश्व मिथ्या असते.अलक्ष्य स्वरुप परब्रह्म ठिकाणी लक्ष्य द्‍यावे. मनाला स्थापित करावे. सुक्ष्मांत प्रवेश करुन स्वस्वरुपापर्यंत पोहचावे, आत्मनिवेदन करुन समाधनरुप व्होव. - 33

## दशक अठरावा विचार 879 ते 882

## समास सहावा - उत्तम पुरुष निरुपण 18/6

879. माणसाला शरीराचे व मनाचे असे दोन जीवने असतात. शरीर वस्त्रांनी तर मन विवेकाने चातुर्याने सुशोभित केले जाते. शरीर वस्त्राने भूषविले परंतु अंतर्यामी चतुरपणा नसेल ते शोभा देत नाही. - 2

880. जो नीतीचा विचार करत नाही. तो शीघ्रकोपी असतो तो राजकारणात जुळवून घेत नाही. तो बेभरवशी, दुष्ट खोटे बोलणारा राक्षस होय. वेळ सदैव सारखी नसते. यासाठी एकाच नियमाचा आग्रह धरु नये. हट्टीपणा सोडावा. प्रसंगानुसार वागावे. - 7

881. नेहमी विचार करुन कार्य करावे, सावध असावे, ईश्वर खरा सर्व कर्ता आहे. जेथे न्याय नीति, विवेक असते तेथे ईश्वरी कृपा होते. खबरादीने केलेला मोठा प्रयत्न, कठीण प्रसंगी धरलेला धीर ही ईश्वरी कृपा होय. - 16

882. जो देव, ब्राह्मण मानतो., आचार व विचार सांभाळतो प्रपंच आणि परमार्थ दोन्हीकडे लक्ष देतो. सतत सावधान असतो. तो ईश्वरी कृपेला प्राप्त असतो. जे धर्मस्थपतात. ते ईश्वराचे अवतार असतात. - 20

## दशक अठरवा - विचार 883 ते 886

## समास सातवा - जनस्वभाव निरुपण 18/7

883. सामान्य माणूस अत्यंत स्वार्थी असतो, घेण्याची वासना असते. देवाची भक्ति मुळीच करत नाही. काम न करता पगार मागतो. परंतु कष्ट केल्यावाचून फळ कोणतीच गोष्ट मिळत नाही. - 3

884. आळशीपणाने कार्याचा नाश होतो. हीन प्रतीचे लोक कष्ट करण्यात चुकारपणा करतात. जे कष्टाचे दु:ख सोसतात ते सुखाचे फळ भोगतात. प्रपंच की परमार्थ असो दोन्हीकडे विवेक सारखाच असतो. पुढची योजना आखून त्याप्रमाणे वागावे. - 6

885. मिळालेल्या पैशाची बचत न करता सर्व खर्च केले तर पुढील कठीण काळांत जगणे कठीण होते. सुखाने जगण्यासाठी साठविलेला पैसा उपयोगी पडतो. परलोकांत समाधान राहण्यास परमार्थ उपयोगी पडतो. ज्याचेकडे साठविलेला पैसा नाही तो जिवंत असून मेलेला असतो. - 8

886. ज्यापासी खरा आत्मानात्म विवेक असतो. त्याला परमात्मा सांपडतो, विवेकी पुरुषापाशी विवेकाचा लाभ होतो. खरे देव एकच आहे. सामान्य लोक अनेक मानतात. देवाचे मुळस्वरुप व कर्तेपण एकच आहे. हे समजून घ्यावे. जे मनस्वी कष्ट करतात तेच भाग्य भोगतात. - 16

## दशक अठरावा विचार 887 ते 891

## समास आठवा - अंतर्देव निरूपण 18/8

887. देवाचा पत्ता लागत नाही. खरा देव कळत नाही. विचाराने देव शोधावा. क्षेत्रातील देव पाषाणाचे असतात. ब्रह्म, विष्णु, महेश हे तीन देव थोर या तिन्ही देवावर अंतरात्माची सत्ता चालते. खरे तोच प्रत्यक्ष कर्ता व भोक्ता आहे. - 8

888. अंतरात्मा अनेक युगे तिन्ही लोक एकटाच चालवतो. तोच शरीर चालवितो, त्याला लोक सोडतात व तीर्थाकडे धांवतात व कष्टी होतात. सत्संगाने देव सापडलेला आहे. - 13

889.अंतर्मुख होऊन जो आंत बघायला शिकतो त्यालाच अंतरंगातुन सुक्ष्माचे ज्ञान होते. असे लोक विवेकी व शहाणे असतात. सत्संगात देव सांपडतो. सत अंतर्मुखाची कला शिकवतात. नीट समजून श्रध्दा ठेवणे हाच विवेक होय. प्रतिमा मुर्खाचा देव असतो.  - 16

890. आकारमय, अशाश्वताच्या पलीकडे राहणारे ते परब्रम्ह होय. देव चंचल तर परब्रह्म निश्चल आहे. भ्रम रहित होऊन ब्रह्माचा अनुभव घ्यावा. - 19

891. सगुणाला सगुणाची उपासना शक्य असते. यामुळे मीपणा क्षीण होतो व निर्गुणामध्ये प्रवेश होतो. अंतरात्म्याचे अखंड अनुसंधान लावण्याने मनुष्य पावत होतो. त्यास आत्मज्ञान होते. त्याचे विज्ञान होते. जीवाला भगवंतावाचून अन्य काही स्मरणच न उरणे या अनुसंधान म्हणतात. - 24

## दशक अठरावा विचार 892 ते 892

## समास नववा - निद्रानिरुपण 18/9

892. निद्रेच्या वेळी माणूस अज्ञानाच्या अंधकारात असतो. झोपेत सुस्ती येते. झोपेत तो बडबडतो, हसतच सुटतो. वाईट स्वप्न पाहून घाबरतो. अगर खुष होतो. गाढ झोपेत स्वस्थ पडून असतो. - 19

893. प्रात:काळी काहीजण हरीकीर्तन, जप, पाठांतर करतात. नवीन कला, गायन शिकतात. ज्ञानी पुरुष दृश्य व अशाश्वत तत्वे दुर सारतो. तुर्येच्या पलीकडे जातो आणि संपूर्ण आत्मनिवेदन करून ब्रह्मरुप होतो. - 24

# दशक अठरावा विचार 894 ते 888

# समास दहावा श्रोत्रा अवलक्षण निरुपण 18/10

894. अदृश्य आणि सुक्ष्म आत्म्याचे ज्ञान घेण्यास सतत मनन आणि एकाग्रता याची आवश्यकता असते. काळ काही प्रसंगी अनुकल तर कांही प्रसंगी प्रतिकुल असतो. - 4

895. श्रवण म्हणजे ऐकणे होय. मनन म्हणजे मनांत धरणे. याच उपायाने सर्व ज्ञान व्यवहार चालतात. फार ऐकण्याने मनात घोटाळे उत्पन्न होतात. प्रसंग ओळखून वागावे. आपले मन आपणच आवरावे. विवेकाने अर्थ शोधावा. - 17

896. जे खरे जाणते व शहाणे असतात ते स्वत:कडे नेणतेपणा घेतात. थोर लोकाच्या वागण्यांत क्षमा व शांती अवश्य असते. अवगुणी माणसाच्या संगतीला गुणवान राहिला तर त्याला अवगुण ताबडतोब ध्यानात येतात. विवेकी पुरुषाकडून विवेकीच वर्तन घडते. - 35

897. सज्जनांकडून लोकांना समाधान मिळते. सज्जन म्हणजे संत. संताना लोकाचे अंत:करण बरोबर कळते. प्रसंग काळवेळ त्याना बरोबर समजतात. ज्ञानी पुरुषाचा विवेक फार सामर्थ्यवान असतो. 45

898. एकांतामध्ये विवेक करावा, भगवंताला मनांत धारणेच्या जोरावर धरुन ठेवावा. लोकांत भेद करु नये. एकांतात यत्न कोणता करावा हे समजणे, स्मरण करावे म्हणजे आपल्या चुका समजात एकांतामध्ये आपणच अंतरात्म्या ऐवढे होऊन फिरावे, व्यापक व्हावे, जगदांतरी फिरावे. ज्यांना एकांत आवडला तो सर्वाच्या आधी ज्ञानी होतो. संत व विचारवंतानी एकांत सेवन केला. एकांतावर ज्याचे अति प्रेम तो मूर्तिमंत ज्ञानी होय. - 50

# दशक एकोणिसावा शिकवण विचार 899 ते 903

# समास पहिला लेखनक्रिया निरुपण 19/1

899. मानवी जीवनांत ज्ञानप्रसार होण्यास आणि ज्ञान कायम टिकण्यास लेखनक्रियेचा सर्वापेक्षा अधिक उपयोग झालेला आहे. अक्षरे घोटून घोटून सुंदर करावे. अक्षर पाहून सर्वांना समाधान वाटावे. ओळी अशा दिसाव्या जी जणू मोत्याच्या माळाच आहेत. - 2

900. ग्रंथातील अक्षरांचा काळेपणा आणि अक्षरांची वळणे व वाक्ये आरंभापासून अखेरपर्यंत सारखीच असावीत. ओळी एकमेकांस स्पर्श करु नयेत. शिशाने पानावर रेखा आखाव्यात. लिहिण्यांत चूक नसावी. - 8

901. ग्रंथ् जपून लिहावा. बाजूने समास सोडून लिहावे. निराळे प्राकरचे टांक असावे, पट्या, रुळ, शिशाच्या गोळ्या, सुऱ्या, कातऱ्या, खळ, घोटा, साहित्य जवळ ठेवाव. - 15

902.ग्रंथ् सुंदर दिसावे यासाठी चित्रे काढावित. कलाकुसर करावी. ग्रंथाचा आरंभ, शेवट व ग्रंथातील आंकडे यावर हिगुळ (लाल रंगाचा पदार्थ) गंधक व लाखेपासून निरनिराळ्या रंगासाठी त्या रंगाच्या चिंध्या भिजवून जवळ ठेवा - 19

903. ग्रंथ पुरा झाल्यावर शेवटी इतिश्री लिहावे. सागवानाच्या फळ्या समान व गुळगुळीत करुन त्याचेवर सुंदर चित्रे काढावीत. ग्रंथ पूर्ण झाल्यावर तो चांगल्या तऱ्हेने बांधुन ठेवावा. बांधण्यास अनेक प्रकारचे रेशमी वस्त्रे, दोर, मेणकापड वापरावे. - 20

# दशक एकोणिसावा विचार 904 ते 909

# समास दुसरा विवरण निरुपण 19/2

904. समाज नेता, पुढारी चांगल्यापैकी विव्दांन असावा. त्याचे ग्रंथावलोकन उत्तम प्रकारचे असावे. त्याने निरनिराळ्या कथा, शब्दाचे अर्थ, नाना प्रकारच्या शंका आणि त्याची उत्तरे, साक्षात्काराच्या घटना समजून घ्यावात. - 3

905. पुढारी, नेता यांनी अनेक प्रकारचे पूर्वपक्ष आणि सिध्दांत याचा स्वत: अनुभव घेतलेला असावा. त्यामुळे लोकास निश्चयाने सांगता येते. प्रकृती, निवृत्ती, प्रपंच व परमार्थ याचा अनुमान नको. अनुभव पाहिजे. - 5

906. पुढारी नेता यांनी प्रश्न विचारणाऱ्याचा हेतु ओळखून त्याचे उत्तर द्यावे. दुसऱ्याचे हृदगत समजून चतुरपणे वागावे. दुसऱ्याचे सर्व ऐकूण घ्यावे. मौन धरावे. लोकांचे समाधान करावे. - 9

907. पुढारी नेता यानी अजाणतेपण सोडू नये. वात्रट लोकांत बसू नये. ताठा धरुनये. गोड व मृदू बोलावे, प्रसंग पाहून तो बरोबर ओळखावा उगीचहुज्जत घालीत बसू नये. - 11

908. पुढारी नेता यांनी कोणत्याही गोष्टीचा शोध घेण्याचा कंटाळा करु नये. भ्रष्ट लोकांत बसू नये. दु:खी लोकांचे दु:ख हलके करावे. आपले उत्तम गुण प्रकट करावे. सज्जनाची संगत करावी. सर्वांचे चांगले संबंध ठेवावेत. - 16

909. पुढारी नेता जणांनी जगांत जगातील कायमचे व्हावे त्याचे वर्म जिभेपाशी आहे. आपण कोठेही गेलो तर तेथे उत्तम माणसे शोधून काढावी. सर्वांत उपायांमध्ये श्रवण श्रेष्ठ होय. श्रवणापेक्षा मनन श्रेष्ठ मननामुळे लोकांचे समाधान होते. - 22

## दशक एकोणिसावा विचार 910 ते 914

## समास तिसरा  करंट लक्षण निरुपण 19/3

910. समाजात दोन प्रकारची माणसे असतात. एक भाग्यवान आणि दुसरे भाग्यहीन. संत स्वत: भाग्यवान व ज्ञानवान असतात. दुसरे भाग्यहीन करंटे असतात पापी व दरिद्री असतात. - 2

911. करंटे, भाग्यहीन लोक आळसी असतात. त्यात प्रयत्न करणे आवडत नाही. ते भ्रमिष्ठ व झोपाळू असतात. त्याचे मित्र चावट असतात, वाईट कर्मे करतात, तो चोरटा, भांडखोर असतो. - 9

912. करंटा मनुष्य अत्यंत आळशी कामचुकार असतो. त्याला अन्न मिळत नाही. त्याला पवित्र लोकांमध्ये जाण्यास आवडत नाही. तो पुष्कळांना जीवे मारतो, लहरी आणि असंबध्द वागतो. त्याचा कोणावर विश्वास नसतो, सख्य नसते. - 17

913. शरीराने, मनाने व पैशाने झिजल्यावाचून जगांत कीर्ती मिळत नाही. जगाकडून मान्यता काही फुकट प्राप्त होत नाही. ज्याचे अंगी कुलक्षणे असतात. त्याची जिकडे तिकडे छी थू होते. - 24

914. जो माणूस चांगल्याशी संगत धरीत नाही. जो स्वत:ला शहाणा करत नाही. तो स्वत:च आपला वैरी होतो. आपण लोकांचे चांगले केले तर लोकही आपले चांगलेच करतात. माणसाने आपले अवगुण टाकावे. उत्तम गुण अभ्यास करावे. - 30

## दशक एकोणिसावा विचार 915 ते 920

## समास चवथा - सदेव लक्षण निरुपण 19/4

915. भाग्यवान पुरुष सुख देणारा, त्याची सात लक्षणे. एक मधुर मृदु भाषा, दोन कोणाचे अंत:करण न दुखविणे, तीन नम्रता, चार परोपकारी, पांच नि:स्पह, सहा आत्मज्ञानी, सात क्षमाशी असणे, असा परोपकारी सर्वांना आवडतो. - 2

916. भाग्यवान पुरुष कोणाचे मन मोडत नाही. सर्वांना तो हवासा वाटतो. लोकप्रिय असतो. उत्तम गुणी असणारा तो सपात्र असतो, जगमित्र असतो. - 6

917. सर्वांचे अंतकरण संभाळतो. नेहमी उत्तम क्रिया करतो, ज्याला सर्व लोक मानतात. जो सर्वांना हवासा वाटतो, जो तेजस्वी पुण्यवान, तोच भाग्यवान महापुरुष होय. 9

918. उत्तम पुरुष प्रपंचात व्यवहारचातुर्य जाणतो, परमार्थात आत्मनात्यविवेक आणि सारासार विचार जाणतो. तो रसिक असतो. वागण्यांत विवेक प्रगटतो. दुसऱ्याच्या दु:खाणे दु:खी होतो. सुखाने सुखी होते. सर्वांचे सुख इच्छ्तिो. - 23

919. उत्तम पुरुष आपले शरीर मिथ्या समजतो. मी आत्माच आहे हे जाणतो. ज्ञात्याला देहाची निंदा स्पर्श करु शकत नाही. ज्ञाता पुरुष देहापासून अलीप्त असतो. देहांत विदेहीपणाने राहतो. - 27

920. माणसाने लोकामध्ये आपले उत्तम गुण प्रगट करावेत. वाईट गुण माणसाना दु:ख देतात. देहबुध्दी नाहिशी करुन उत्तम गुणाची जोपासना करण्यासाठी ज्ञानी पुरुषास तीक्ष्ण व सुक्ष्म बुध्दी लागते. - 28

## दशक एकोणिसावा विचार 921 ते 928

## समास पांचवा देहमान्य निरुपण 19/5

921. मानवी जीवनांत एक प्रवृत्ती व दुसरी निवृत्ती असे दोन प्रधान दृष्टीकोण आढळतात. त्या मिश्र प्रयत्नांत असतात. प्रवृती दश्य जगतास, व देहाला मनाला महत्व देते. निवृत्ती देहाला महत्व देत नाही. अंतरात्मास मानते परंतु मानव देहामुळेच अंतरात्मयाचा पत्ता लागतो. मानवाने निरनिराळे देव मानले आहेत. पुजेचे, उपासनेचे प्रकार पुष्कळ आहेत. त्याची पूजा करतात. - 3

922.देहाच्या साधनाखेरीज भक्ति करतां येणार नाही, साधनेखेरीज देव पावत नाही. देह हाच देवाच्या भजनाचा मुळ आहे. भक्ति, दर्शन यासाठी देहाचे साधन पाहीजे. देह नसेल तर पूजा कर्मकांड, तीर्थयात्रा, मंच नाहीत. - 11

923. अनेक प्रकारच्या देवाचे भजन केले तरी ते अखेर मुळ पुरुषास जावून पोचते. या कारणे मुळ पुरुषाला जाणीव आहे तीच अखेर देहरुपी फळामध्ये प्रकट झाली. -15

924.अंतरात्म्याबदल जे काही पहावयाचे असेल ते येथेच या देहांत पहावे आणि विवेकाने तत्वाचा मेळ बसला की समाधान पावून मग स्वस्थ रहावे माणसे संसार सोडतात, देवाला धुंडतात व गोत्यामध्ये अडकतात. - 17

925.ब्रह्मा, विष्णु, महेश या क्षेत्राचे देव, देवाचे अवतार काय या सर्वापलीकडे असणारा जगदीश्वर अथवा परमात्मा पाहणे खरे अवश्य आहे. सगुण पुजा दर्शन भ्रामक समजून आहे. याचे रहस्य साधु पुरुषच जाणतात. (22)

926. मानवाचे देव मानवनिर्मित आहेत. या सर्वा निर्भयपणे बाजूस सारुन जो देवाचा शोध घेतो. त्यास खरा गुणांतीत देव सापडतो. माणसास स्वत:च्या कर्तेपणामुळे देवाचे कर्तत्व आकलन करणारी सुक्ष्म ज्ञान दृष्टी येत नाही. आपले कर्तेपणा बाजूस सारुन खरा देव पहावा. - 24

927. खरा देव परमात्मा इंदियांना दिसत नाही व मनाला भासत नाही. माणसाच्या मनात अनेक कल्पना येतात, वासना, इच्छा करीत राहतात, अनेक वृत्ति येतात तो पर्यत देव दर्शन नाही. म्हणून कल्पनारहीत तत्व आहे तेच शाश्वत वस्तु होय. तिला अनंत म्हणतात. - 27

928. खऱ्या देवाच्या दर्शनाची स्थिती व परिणामी अवस्था सुक्ष्म आहे ती सद्‌गुरु कृपेमुळे कळली तर अधोगती चुकते संतसंगतीमुळे उत्तम अवस्था येते. - 30

## दशक एकोणिसावा विचार 929 ते 933

## समास सहावा बुध्दीवाद निरुपण 19/6

929.महंतास स्थान मिळते. म्हणून परमार्थी लोकांच्या मनांत संदेह निर्माण होईल असे कोणतेही कर्म करीत नाही. विचार करुन आपल्या हातून चूक होऊ देत नाही. या सर्व गोष्टीचा परिणाम तो आधीच जाणतो. - 2

930. साधूने कोणापाशी काही मागु नये, त्याने भगवंताचे भजन करावे. विवेकाचे जोरावर लोकांना भजनाकडे वळवावे. आपल्या नि:स्पृहपणाने त्याने जगांत प्रसिध्द व्हावे. साधु दिव्य दृष्टीचा असावा. त्याच परिस्थिती अंदाज घेऊन काम करता आले पाहिजे. - 15

931.ज्याची दीक्षा छान असते, मैत्री सुरेख असते. राजकारणांत त्याची तीक्ष्ण बुध्दी छान चालते. असा पुरुष अलीप्त राहून स्वतास व इतरास संभाळतो. अशा महंताचा लोकसंग्रह मोठा असतो. त्याला अखंड हरीकथेचा व नामस्मरणाचा नाद असतो. - 18

932. खऱ्या महंताचा असलेला जनसमुह परमार्थाच्या अभ्यासाला मनापासून लागतो. महंताची भक्ति, ज्ञान उत्कट असते. त्याचे चातुर्य, भजन उत्कट असते. त्याचे योगा अनुष्ठान उत्कट असते. त्याच्या अंगी उत्कट नि:स्पृहता असते. त्याच्या भक्तिने पुष्कळ लोकांना शांती मिळते. - 23

933. पुढारी लोकांनी सावधपणाने असावे. आज जेवढे लोकासाठी करता येईल ते आजच करावे. भगवंताच्या कीर्तीने सारे जग भरुन टाकावे. एकांतात विवेक करावा, म्हणजे आपल्या हातून जे होत नाही ते अनुमानाच्या दृष्टीस येते. तसेच आत्मारामाचा साक्षात्कार करुन घ्यावा. 30

## दशक एकोणिसावा विचार 934 ते 937

## समास सातवा यत्ननिरुपण 19/7

934. माणसाचे दोन वर्ग पडतात एक ज्ञानी दुसरा अज्ञानी. महंताने थोडे बोलून सर्वांचे समाधान करावे. कोणावरही चिडचिडे करु नये. राग आला तरी तो दाबून श्रोत्याचे मन दुखवू नये. प्रत्येकाला आपणाकडे आकर्षित करावे. - 4

935. महंतानी लोकास जाणून घेण्यासाठी त्यांची वारंवार परीक्षा घ्यावी. महंताने आशाळभूत, लाचार भ्रष्ट व चातुर्यहीन नसावे. जगातील सर्व माणसे वाईट नसतात. जगाचा स्वामी इश्वर, हे सर्व मान्य करावे. - 13

936. ज्याला पोहता येत नाही त्याने लोकांना बुडवू नये. अपात्र महंताच्या नादी लागण्याने माणसाची परमार्थाची गोडी व आवड वाया जाते. शेत केले धान्य बाजारांत नेले नाही. वाया जाते. महंताने शिष्य गोळा केले. त्याचे अंत:करण संभाळले नाही तर त्याची फजिती होते. - 20

937. महंतानी अविवेक राज्य करतो तेथे राहणे चांगले नाही. जनतेची उपाधी आणि गडबड जर आपणास झेपत नसेल तर त्यापासून प्रथमच दूर रहावे. सर्व आपल्यावरच अवलंबून आहेत याचा आपण विचार करून, आपले वर्तन योग्य त्याप्रमाणे करावे. - 30

# दशक एकोणिसावा विचार 938 ते 943

## समास आठवा - उपाधी लक्षण निरुपण 19/8

938. जगांत कितीतरी चांगले लोक आहे. देशोदेशीचा प्रवास केल्याने ते आपणांस पहावयास त्याचे विचार नजरेस पडतात. प्रपंचात काही माणसे वृत्तीने अलिप्त असतात, सुखाने किंवा दु:खाने त्याचे समाधान ढळमळत नाही. त्याचा स्वभाव सयंमी असतो. जरुर तेवढेच बोलतात. संयमाने नीतीने वागतात.

939. आपल्या अवगुणाना गुण मानणे हा माणसाच्या अंगी असणाऱ्या सर्व अवगुणांमधील मोठा अवगुण होय. हे मोठ पाप आहे व यामुळे माणसाला करंटेपण चुकत नाही. एकादाच धाडसाने एक काम सहज करतो पण दुसऱ्यास प्रयत्न करुनही जमत नाही. हा भगवंताचा महिमा असे. - 10

940. पूर्व योजना न करता लोकसंग्रह जमवला तर तो संभाळता येत नाही. तेथे नेतेपण घसरत जाते. दुर दृष्टी करुन विवेकाने योग्य मर्यादा तेथे घालाव्यात. - 15

941. ज्याने त्यानेच आपल्या बुध्दीला आपल्या बुध्दीला घट्ट धरुन, बुध्दीला स्थिर करुन मनांतउसळणा-या कल्पनाना आवर घातला पाहिजे. घाई घाई ते काम कसेतरी करणे चांगले नाही. - 20

942. निर्मळ व निश्चल परब्रह्म ते एकच शुद्ध विश्रांतीची स्थळ आहे. तेथील चंचलांचे सगळे विकाराचे मुळी निर्विकार होऊन जातात. तेथे सर्व दु:खी नाहीशी होतात. आणि मनाला एकदम विश्रांती मिळते. दुर्लभ असणारी अशी ही परब्रह्मस्थिती ही विवेकाने सांभाळावी -26

943. आपण मुळ आत्म स्वरुपात आहोत. आपल्याला काही उपाधी नाही.नातेवाईक, सखे, मित्रसोयरे, ऋणानुबंधाने येतात जातात. क्षिती नाही वृत्ती अशी होणे जरूर आहे. जगात उपाधी साठी अडत नाही. मनाचे समाधानाइतकी श्रेष्ठ गोष्ट जगात दुसरी नाही. समाधान साधावे व टिकवावे - 30

# दशक एकोणिसावा विचार 944 ते 949

# समास नववा - राजकारण निरुपण 19/9

944. भिन्न प्रकृतिची माणसे एकत्र गोळा करुन प्रत्येकाडून काही तरी कार्य करुन घेण्याची कला म्हणजे राजकारण असे श्री समर्थ म्हणतात. काही निर्जीव पदार्थ हाताशी धरतात. त्यातून सुंदर कला कृती निर्माण करतात. ते शिल्पकार, दुसरे सजीव प्राणी हातात घेऊन त्या वर संस्कार करुन आपणांस हवे ते बदल करुन घ्यावयाचे हत्ती, घोडे, कुत्री, मांजरे इ. तसेच काही माणसांवर शक्य करतात. आत्मज्ञानी, पुढारी यांनी नेतेपण स्विकारुन कार्य करावे. - 1

945. एक जण विचाराने शहाणपणाने वागुण इनाम वतन मिळवतो. दुसरा अविचाराने व मुर्खपणाने वागुण आपले इनाम घालवितो. दुसऱ्याच्या मनातील हेतू ओळखून त्याचे कपट कळते. श्री समर्थ ज्ञानी मंहत प्राणी मात्राचे अंतरंग ओळखत असत. अशा मंहताने एकाच ठिकाणी राहू नये. सलगी वाढते व मान राहत नाही - 6

946. मंहताने चोराला भांडार प्रमुख नेमावा. त्याने चोरी केली तर त्यास सांभाळून घ्यावे. त्याचा मुर्ख पणा हळूहळू जाईल. काट्यानी काटा काढावा. दुर्जनाकडून दुर्जनाचा बंदोबस्त करावा - 12

947. महंतानी कोणत्याही कामात ढिलेपणा करु नये. जो दुसऱ्यावर विश्वासून राहतो त्याचा कार्यभाग नाश पावतो. जो आपण स्वत: कष्ट करतो तोच भला होय (16)

948. महंतानी कार्याचे मुख्य सत्र आपल्या हाती ठेवावे, जे काही करावयाचे ते लोकाकडून करवून घ्यावे, कार्यासाठी साधी माणसे पुढे आणावी त्यांना कार्यकर्ते बनवावे (18)

949. महंताने दुर्जनास ओळखून ठेवावे त्यास मोठेपणा द्यावे व आपलेसे करुन घ्यावे राजा परमार्थाचा कैवार घेणारा असावा. उगाच ढिलेपणांच्या भ्रमाने वागू नये - 27

# दशक एकोणिसावा विचार 950 ते 953

## समास दहावा - विवेक लक्षण निरुपण 19/10

950. महंत वैराग्य आवडणारा त्याने राजकीय समस्यावट चिंतन करावे, उपासनेने देवभक्तीत एकरुप व्हावे. त्यामुळे मीपणा विरघळतो, प्रतिभा उद्य पावते. प्रतिमाचे स्वरुप आकलन होते. - ते ज्ञान होय (4)

951. महंत वैराग्याचा असतो त्यास नेमक्या बोलण्याने योग्य वागण्याने शांती मिळते. तो स्वत: उपासना आचरतो व त्याचा प्रचार सगळीकडे करतो. श्रवण मननाचा मार्ग शिकवतो सावधपणे वागतो (13)

952. महंत आपले ज्ञान लोकांना धीमेपणाने शिकवून शहाणे करितो, आपण स्वत: कार्य धरतो, आणि इतरावा धरावयास लावतो, देहाचा अभ्यास बुडावी की महंत बुडाला. आळशी पणा सोडावा कारण त्याने कार्यनाश होतो (19)

953. महंताने जे शरीराने अशक्य आहेत. त्याच शरीरात व मनाने बलवान करावे. सुखासीनता वर्ज करावी. संसार विवेकाचे बळाने व्यवास्थीत केला तर त्यातील रस नाहींसा होत नाही. धीर सोडू नये (30)

# दशक विसावा पूर्णदशक विचार 954 ते 958

## समास पहिला पूर्णापूर्ण निरुपण 20/1

954. पिंडामध्ये आढणारी जाणीव हिला जीव म्हणतात व ब्रह्मांडामध्ये आढळणारी जाणीव तिला शिव किंवा ईश्वर म्हणतात या सर्वा पलीकडे अपरंपार जाणीव तिला परब्रह्म म्हणतात. निर्गुण ब्रह्म व्यापक आहे. - 2

955. मनाच्या व्यापकपणास मर्यादा आहे. पृथ्वी व्यापकतेला सीमा आहे. तसेच प्राणी, मन व पृथ्वी संपूर्ण व्यापक नाहीत. त्रिगुण आणि गुण, क्षोभिणी माया हे अपूर्ण, नाशवंत व एकदेशी असते. आत्मा आणि निरंजन एकच आहे. - 11

956. पाण्यातील सूर्य प्रतिबिंब म्हणजे सूर्य नव्हे. त्याचप्रमाणे माणसाच्या जाणिवेमध्ये ब्रह्माचे जे प्रतिबिंब पडते त्यास जीवात्मा म्हणतात. प्रतिबिंबरुप जीवात्मा निर्गुण ब्रह्मवस्तु होऊ शकत नाही. - 16

957. आकाशाचे निर्गुणाशी साम्य आहे. मुळ आकाश व्यापक आहे. घटाकाश आणि मठाकाश असा तात्पुरता भेद दिसतो. त्याचप्रमाणे जीव आणि शिवपरब्रह्मामध्ये भासतो. परंतु जीव व शिव नाहीसे झाले की मुळ परब्रह्म जसेसे तसे उरते. - 17

958. आकाश परब्रह्माचा अंश आहे आणि मन आत्म्याचा अंश आहे. परंतु आकाश आणि मन जीवात्म्याला धरुन असते पण आकाश नेहमी व्यक्ति निरपेक्ष असते म्हणून त्याची मनाशीबरोबरी होत नाही. - 19

959. ज्ञान म्हणजे वस्तु आहे तशी जाणणे, अज्ञान म्हणजे वस्तु न जाणणे दृष्टा, साक्षी व सर्व पिंडात समान आहे. एका पिंडापुरता पाहिल्यास जीवात्मा होय. तो देह बुध्दीतून बाहेर पडला की शिवात्मा बनतो. देहबुध्दीमुळे शिवात्मा साक्षीपण घालवतो, नंतर देहबुध्दी शिरुन जीवात्मा जन्मतो. जीवात्मा कर्माच अधीन होऊन देह धारण करतो. तसेच ईश्वर (शिवात्मा) देह धारण करुन अवतार होतो. - 27

## दशक विसावा विचार 960 ते 963

## समास दुसरा सृष्टि त्रिविध लक्षण निरुपण 20/2

960. चंचलाच्या मागे लागण्यानेदु:ख प्राप्त होते. तर निश्चलाच्या मागे लागण्याने पूर्ण विश्रांती मिळते. नित्यानित्य विवेक करुन दृश्य नाहीसे करावे. मग सर्वच परब्रह्माचा अनुभव येईल. त्याची कल्पना कोणासच करता येत नाही. - 5

961. दृश्य मनाला कळते. आकलन होते, तर ब्रह्म मनाला कळत नाही. आकलन होत नाही, दृश्य कल्पतेने कळते. तर ब्रह्म नाही. - 7

962. परब्रह्मासारखे श्रेष्ठ कोणीही नाही. श्रवणसारखे श्रेष्ठ साधत नाही. जो मुंगीच्या पावलाने जातो. ते हस्तगत करणाऱ्यास वेळ लागातो. (पिपीलीका मार्ग) जो एकदम सुक्ष्मात जातो. मननाची वाढ करतो. तो पक्षाप्रमाणे लवकर हस्तगत करतो. (विहंगम मार्ग). - 10

963. मुळ मायाच अष्टधा प्रकृतीचे मुळ आहे. मुळ माया नुसती स्फुरण असते. जी चेतना देते. म्हणून चैतन्य म्हणतात. प्रकृती पुरुषाचा विचार, अर्धनारी नटेश्वर, अष्टधा प्रकृती विचार मुळ मायेनेच येतात. - 22

## दशक विसावा विचार 964 ते 968

## समास तिसरा सुक्ष्मनामाभिधान 20/3

964. परमात्म स्वरुप अतिसुक्ष्म आणि अद्रश्य आहे त्यास समजण्यासाठी अपली दृष्टी सुक्ष्म आणि अद्रश्यांत शिरणारी पाहीजे. आपण विवेकाने सारे स्थूल मागे टाकत, वृत्ती माघारी फिरुन सुक्ष्मांत शिरावे. ती अखेर मुळमायेपर्यंत पोचवावी. - 1

965. जेवढे सुक्ष्म आहे तेवढे सगळे टाकून द्यावे जे सुक्ष्म आहे त्याचे गुणधर्म ओळखावे. गुणापासून मुळमायेपर्यंत वारंवार सुक्ष्म दृष्टीने चिंतन करीत जावे तरच परमात्मापर्यंत जाता येईल. - 5

966.सत्वगुण म्हणजे शुध्द ज्ञान, तमोगुण म्हणजे अज्ञान रजोगुण म्हणजे ज्ञान व अज्ञान यांचे मिश्रण. हे तिन्ही गुण ज्या ठिकाणी अत्यंत गुप्तपणाने राहतात. त्या अवस्थेला महत्तत्व म्हणतात. तेच प्रकृती पुरुष, शिवशक्ति, अर्धनारीनटेश्वर होय. - 10

967. मुळमाया म्हणजे ब्रह्मांडाचा महाकारण देह होय. जो अत्यंत सुक्ष्म मनन करुन मुळ मायेचे व त्रिगुणाचे स्वरुप समजून घेतो. त्यास कोणताही संदेश उरत नाही. विश्वाचे बीज मुळ मायेत आहे. आणि ते नीटपणे कळले तर परमात्म कळते. - 18

968. परब्रह्माच्या साक्षात्काराने माया नाश पावते. जो सर्वसंग सोडून अलिप्तपणाने निर्गुणाशी समरस होतो त्यालाच महायोगी म्हणतात. माया, खरी नाही. तिचे दडपण जीवावर पडू नये. साधकाने रात्रंदिवस अर्थाचे मनन करावे खरा अर्थ शोधावा. त्यालाच परमात्मामधील आत्मज्ञान मिळते. - 29

## दशक विसावा विचार 969 ते 973

## समास चवथा - आत्मनिरुपण 20/4

969. विश्वांत सर्व घडामोडी एका अंतरात्म्याच्या सत्तेने चालतात. व्यवस्था, अवव्यवस्था सर्व ठिकाणी ईश्वरी सत्ता कार्य करते. हे खरे आहे. प्रत्येक शरीरात भगवंत राहतो. तोच जगाचे रक्षण करतो. - 5

970.ईश्वरी सत्ता जाणीव स्वरुप आहे. सर्व देहामध्ये जाणीव स्वरुपानें आहे, कौशल्य व चातुर्य त्या सत्तेचा परिणाम आहे. जगाचा स्वामी तोच आहे. या विलक्षण विस्मयामध्येच ज्ञानोपासनेचे मुळ आहे. - 11

971. अंतर्यामी ईश्वरी सत्ता कार्य करत असे. सतत भान ठेवणे. हे भगवंताचे अनुसंधान होय. या अनुसंधानामध्ये स्वत:चा विसर पडू लागणे हे ध्यान आहे. पूर्ण विसर पडून ध्यान परिपक्व होते तेच ज्ञान होय, ज्ञान आणि ध्यान एकरुपच आहेत. - 12

972. उपासनेत वासना प्रधान नको. अनंतरुपाची द्रष्टेपणा व साक्षीपणा दाखवणारा अनंत अंतरात्मा आपण ओळखावा. संताची संगत ठेवावी, कथा निरुपण ऐकावे. अनुभवाचे ज्ञान असावे, समाधान मिळेल. - 18

973. मुळ माया ज्ञानस्वरुप आहे. तोच उपासनेचा ईश्वर होय. संकल्पाचा त्याग केल्यास मुळ माया बाजूस सरते व परब्रह्म अनुभवास येते. ज्ञानाने निरंजर ब्रह्माची प्राप्ती होते. - 21

# दशक विसावा विचार 974 ते 979

# समास पाचवा चत्वारजिनस 20/5

974. परब्रह्म सर्वश्रेष्ठ आहे. मानवी कल्पनेपासून ते निराळे आहे. ते निर्मळ, निश्चल निर्विकार आणि अखंड आहे. परब्रह्माचे ठिकाणी जे मूळ स्फुरण झाले त्यास मुळमाया म्हणतात - 5

975. सर्वांच्या अंतर्यामी वास करणारा आत्माराम अथवा अंतरात्मा तोच हाच होय. चैतन्य, गुणसाम्य, अर्धनारी नटेश्वर, षडगुणेश्वर, प्रकतिपुरुष, शिवशक्ती, शुध्द सत्वगुण, गुणक्षेभिणी, सत्व, रज, तम, मन, मायाआणि अंतरात्मा चौदा नावे आहेत. - 8

976. माणसामध्ये जाणिवेचा परमोत्कर्ष आढळतो. जो देहाचा नीट उपयोग करील तर परमेश्वररुप बनते. त्यासाठी विवेक पाहिजे. परंतु मनुष्य सृष्टीचा अनेक प्रकारे भोग घेतो. - 23

977. माणूस सर्व प्राण्याला ताब्यांत ठेवतो पण माणसाला देव पाळतो, सांभाळतो, आपल्या ताब्यात ठेवतो. या साऱ्या गोष्टी मानव देहातच कळतात. - 24

978. मानवदेह अत्यंत दुर्लभ असे त्याचा संपूर्ण फायदा घेण्यासाठी विशाल विवेक केला. पाहीजे. पण तो आळसीपणाने वागतो. तो सर्व बाजूनी बुडतो. त्यासाठी विवेकाने देवाची ओळख करुन घेतली पाहीजे. - 27

979. श्रवण केलेल्याचा जो प्रत्यक्ष अनुभव घेतो तो देहाने माणुस असला तरी देवपदाला पोहचते. - 28

## दशक विसावा विचार 980 ते 983

## समास सहावा आत्मागुण निरुपण 20/6

980. मी त्याला जाणतो हा अनुभव ओलांडून तदाकार पणाने परब्रह्म ओळखावे. तेथे संदेह व अनुमान यांना स्थान नाही. चौऱ्याशी लक्ष योनी. माणसे 4 पशु 20, कृमी 11 पक्षी 10 जलचर 9, स्थावर 30 असे शास्त्र सांगते. सर्व प्राण्याला जाणतेपणा आहे. - 5

981.जेथे चंचलपणा तेथे अंतरात्मा आहे असे ओळखावे. सुख दु:खाची जाणीव जीवात्म असते, तशीच जगदेश्वराला पण असते. मन, बुध्दी, चित्त आणि अहंकार हा अंतरात्म्याचा अंश होय. - 10

982. परमात्मा व परमेश्वरी, जगदात्मा व जगदीश्वरी, महेश व महेश्वरी हे सर्व प्रकार आत्म्याचे गुण आहेत. सुक्ष्म नामरुप आहेत. - 19

983. ब्रह्म निर्गुण आणि निव्रिकार आहे. जाणणे किंवा जाणीव असणे हा खरा अंतरात्म्याचा गुण आहे अनेक गुणांनी अंतरात्मा भरलेला आहे. असे त्याला पाहणे ही त्याची उपासना होतेश् त्यासच ब्रह्म प्राप्त होईल. 30

## दशक विसावा विचार 984 ते 987

## समास सातवा आत्मनिरुपण 20/7

984. आत्मसाक्ष करावे समाधान प्राप्त करुन घेण्यासाठी काही सोडावे लागत नाही व काही नवीन मांडावे लागत नाही. एक विचाराने शोध घेतला. म्हणजे ते कळते. (2) बारा ज्योर्तीलिंगे, त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी निरनिराळे शक्तिचे चमत्कार दृष्टीश पडतात ते आत्म्याचे गुण आहेत. - 5

985. अनेक सिध्द पुरुषाचे सामर्थ्य, अनेक वनस्पतीचे समार्थ्य तीर्थाचे व क्षेत्राचे सामर्थ्य, जगातील अनेक वनस्पतीचे सामर्थ्य आत्म्याचे गुण आहेत. आत्मा शुध्द

असला म्हणजे उत्तम गुण आहेत. आत्मा शुध्द असला म्हणजे उत्तम गुण प्रगट करतो. तोच आत्मा निश्चित असला की अवलक्षणे प्रगट करतो. - 9

986. देहामधील चंचलपणा किंवा जाणीव हा अंतरात्म्याचा गुण आहे, निश्चल ब्रह्म सर्वव्यापी आहे. सर्वत्र असते. आपला पिंड जड देह, चंचल अंतरात्मा आणि निश्चल परब्रह्म या तीन तत्वे मिळून बनतो. याचा निवाडा पिंडातच घ्यावा. - 13

987. पिंडाचे व बह्मांडाच्या बाबतीत जड आणि चंचल नाहीसे झाले तर ब्रह्मांडाच्या बाबतीत जड आणि चंचल नाहीसे झाले तर परब्रह्मच उरते. माया व अंतरात्मा सर्व बदल घडवून आणतात. विवेकाने विचार केला तर मायाजाळ खरेपणा कोठेच नाही. अशी खात्री होते. - 25

## दशक विसावा विचार 988 ते 991

## समास आठवा देहेक्षेत्रनिरुपण 20/8

988.ब्रह्म्देवाचा प्रपंचाचा वृक्ष वाढला, अनेक रसाळ फळे लागली ती गोडी चाखण्यासाठी अनेक शरीरे निर्माण झाली. उत्तम विषय निर्माण झाले तरी शरीरावाचून त्याचा भोग घेता येत नाही. त्यासाठी शरीरे झाली. - 3

989. जगदीश्वराने विवेकाने गुणविचार करुन ही शरीरे निर्माण केली. ज्या शरीरात ज्ञान जेवढे असते तेवढेच त्याला कला साध्य होतात. त्यामध्ये भेदही असतात पण त्या भेदाचाही उपयोग मोठा होतो. त्याच्या योगानेच सर्व व्यवहार चालतात. - 15

990. सृष्टी निर्माण करावयाची म्हणजे भेदाभेद पाहीजे. माया आहे तोपर्यंत भेद व अभेद भाषा संभवते. मुळ मायेतच अंतरात्मा आहे. त्याचा महिमा कळत नाही. विश्वकर्त्याचा महिमा कळत नाही. 5 18

991. आवाहन आणि विसर्जन हेच भजनाचे लक्षण आहे. हे संत सज्जन जाणतात. पुजेसाठी देवास बोलविणे हे आवाहन आणि पूजा झाल्यावर देवास स्वस्थानी पोहचवणे हे विसर्जन होय. - 30

## दशक विसावा विचार 992 ते 995

## समास नववा सुक्ष्मनिरुपण 20/9

992.देवाची पूजा करावयची त्यालाच टाकून द्यावयाचे हे माणसाला प्रशस्त वाटत नाही. याचा विचार करावा देव देह धारण करतो नंतर टाकून देतो. कसा ते विवेकाने ओळखावे. देव कसा शोधावा ते आपल्या अंतकरणाने समजून घेतले पाहीजे. - 5

993. आपल्या कल्पनेने सामान्य माणसे देवाची मूर्ती करतात. पण खरा देव साध्य होत नाही. मातीच्या मूर्तीच्या उपासनेने खरे समाधान प्राप्त होणार नाही. - 10

994.अज्ञानी जणास ज्ञान मानवत नाही. ज्ञानी जनास तर्कवाद मानवत नाही म्हणून जे साक्षात्कारी सिध्द आहेत. त्याचे अनुमान प्रमाण धरुन त्यांच्या संकेतानीआपण वागले पाहिजे. साधनेचे अनेक प्रकार आहेत. त्यांत साधकाने श्रवण मनन करीत अनुभव घ्यावा हे उत्तम. - 14

995. खरे पुढे खोटे टिकत नाही. खोटयांतील गुंतलेले मन खऱ्याकडे नेण्यासाठी त्यास उरफाटे करावे. बर्हिमुख मन अंतर्मुख करावे. मायेत गुंतलेले मन या क्रमाने तेथून सोडवावे त्यास अंतर्मुख करुन त्यास परब्रम्हाकडे लावावे. - 19

## दशक विसावा विचार 996 ते 1000

## समास दहावा विमल ब्रम्हनिरुपण 20/10

996.परब्रह्मअतींद्रिय आहे. कल्पनांतील, दुर्बोध आहे. ते धरता, टाकता येत नाही. जसे आकाश कोठे नाही. तसे ब्रह्म सर्व देशी आहे. सर्व अवस्था मध्ये असते. - 8

997. संत, साधु, महात्मे, देव, दानव आणि मानव सर्वांचे परब्रह्म हेच खऱ्या विश्रांतीचे ठिकाण आहे. त्यास आदि, अंत नाही. स्थूल नाही. सुक्ष्म नाही. कोणत्याच वस्तुसारखे नाही म्हणून जे ज्ञानदृष्टीने पहावे व मनाचे समाधान करावे. - 21

998. पिंड व ब्रह्मांड दोन्ही भासरुपच आहेत. नुसता रिकामा अवकाश अनुभवास येतो. मानवी मन ब्रह्माची कल्पना करु शकत नाही. कल्पनातीत निरंजन स्वरुपाला विवेकाने ओळखावे. - 24

999. ज्याला उन्मती साधते त्यास साधनेचे फळ मिळते. दृश्य विश्वाचे स्वप्न पाहणारा जीव आत्मज्ञानाच्या जागेपणात आल्यावर सगळा दृश्यभास विसरतो. तो अनिर्वाच्या परब्रह्मांत स्थिर होतो. हे सर्व विवेकाने जाणावे अनुभव घ्यावा. तो अमृतपदास पोहचतो. -29

1000. श्री रामरायाने भक्ताचा अभिमान धरला आणि त्याच्यावर कृपा केली. त्या समर्थाच्या कृपेने ही वचने स्फुरली त्या वचनाचा संग्रह म्हणजेच हा दासबोध होय. दासबोध श्रवण व मनन करणाऱ्यास परमार्थ स्पष्टपणे कळेल ग्रंथामध्ये सांगितलेल्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहावा. -33

समाप्त





श्री रामदास स्वामींचे समाधीस्थान

